नोव्हेंबर / November
गुरूवार / Thursday
दि.०५ / Dt: 05
२०२६ / 2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ६ पाने Pages 6

३ किंमत रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com

● मा.संपादक : कृष्णा कडबाने 7030908787 ● निवासी संपादक : मकरंद जहागीरदार 9422216061, 9371591760 ● कार्यकारी संपादक : शेख बिलाल 9422404740

www.jagmitra.com

● बीड/Beed ● वर्ष १७ वे/Year 17 ● अंक १७/Issue 17 ● आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

बीडकरांच्या घामाच्या पैशांवर ठेकेदाराचा दरोडा!

नगराध्यक्षांचा चाबूक, तरीही प्रशासन ढिम्म; मुख्याधिकाऱ्यांच्या डोळ्यांवर लाचारीची पट्टी का?

नियम धाब्यावर, अंदाजपत्रक कचऱ्यात; बीडमध्ये रस्त्यांच्या नावाखाली कोट्यवधींची उघड लूट!

दाल में कुछ काला नव्हे, पूरी दाल ही काली; महिना उलटला तरी बोगस ठेकेदारावर गुन्हा का नाही?







संतप्त बीडकरांचा एल्गार, या आहेत प्रमुख मागण्या!

शहरातील जागरूक नागरिक आणि संघटनांनी आता या भ्रष्टाचाराविरुद्ध आरपारची लढाई छेडण्याचा इशारा दिला असून प्रशासनासमोर थेट मागण्या ठेवल्या आहेत. शहरातील सर्व सिमेंट काँक्रीट रस्त्यांची तपासणी उच्चस्तरीय 'क्वालिटी कंट्रोल बोर्डा'मार्फत तत्काळ व्हावी. झालेल्या व सुरू असलेल्या सर्व बांधकामांचे निष्पक्ष 'थर्ड पार्टी ऑडिट' अनिवार्य करावे. तांत्रिक तज्ज्ञांचा समावेश असलेली त्रिसदस्यीय समिती नेमून कामाची सखोल चौकशी व्हावी. जोपर्यंत तपासणी आणि ऑडिटचे अंतिम अहवाल येत नाहीत, तोपर्यंत सिताई कंस्ट्रक्शनचे एकही बिल अदा करू नये; तसेच अदा केलेली जुनी देयके तत्काळ वसूल करावीत. नियमभंग करणाऱ्या सिताई कंस्ट्रक्शनला तात्काळ काळ्या यादीत टाकून फौजदारी कारवाई करावी.जर प्रशासनाने तात्काळ हालचाल करून दोषींवर कारवाई केली नाही, तर बीडकर रस्त्यावर उतरून भ्रष्टाचाऱ्यांचे पितळ उघडे पाडल्याशिवाय शांत बसणार नाहीत!

परक्यांवर वाघ, स्वकीयांवर मेहेरबान? आमदार साहेब, सिताई कन्स्ट्रक्शनवर मंत्रालयात तक्रार ठोकणार का?

बीड/जगमित्र न्यूज

शहराच्या विकासाचा आव आणत बीड नगरपरिषदेच्या माध्यमातून सुरू असलेला कोट्यवधी रुपयांचा रस्ते घोटाळा आता चव्हाट्यावर आला आहे. बीडकरांच्या घामाच्या पैशांवर ठेकेदार आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांची टोळी अक्षरशः डल्ला मारत असून 'सिताई कंस्ट्रक्शन'च्या मनमानी कारभाराने नियम धाब्यावर बसवले आहेत. प्रत्यक्ष पाहणीनंतर नगराध्यक्षा प्रेमलता पारवे यांनी निकृष्ट कामांवर बोट ठेवत गंभीर तांत्रिक त्रुटी उघड केल्या; मात्र एवढा मोठा भांडाफोड होऊनही नगरपरिषद प्रशासन ढिम्म का? मुख्याधिकाऱ्यांनी डोळ्यांवर पट्टी बांधली आहे की कोणाच्या दबावाखाली हे प्रकरण थंडबस्त्यात टाकले आहे, असा संतप्त सवाल संपूर्ण बीड शहरातून विचारला जात आहे.बीड नगरपरिषदेच्या अधिकृत नियमावली व अंदाजपत्रकानुसार सिमेंट रस्त्यांची कामे दर्जेदार होण्यासाठी काही ठोस तांत्रिक निकष बंधनकारक आहेत. रस्ता तयार करण्यापूर्वी शास्त्रोक्त पद्धतीने खोदकाम करणे. मशीनच्या साहाय्याने ६ इंचाचे मजबूत पीसीसी व डीएलसी थर देणे. त्यावर १२ इंची भक्कम सोलिंग करणे. शेवटी १० इंचाचे मेन काँक्रीट टाकून ५० फुटांपर्यंत एकसमान रुंदीचा टिकाऊ रस्ता बांधणे. मात्र, जमिनीवरचे वास्तव धक्कादायक आहे. नियमाप्रमाणे ५० फुटांचा एकसमान रस्ता होण्याऐवजी मनमानी पद्धतीने रस्ता कुठे रुंद तर कुठे संकुचित करून अक्षरशः घोळ करण्यात आला आहे. रस्त्यासोबतच नाल्यांचे बांधकाम एका पातळीत होणे गरजेचे असताना, त्या कुठे अर्धवट तर कुठे उलटी पातळी देऊन सोडून दिल्या आहेत. परिणामी, पावसाळ्यात शहरात पूरस्थिती निर्माण होऊन पाणी तुंबण्याचा धोका ठेकेदाराने ओढवून ठेवला आहे. गत २८ सप्टेंबर रोजी नगराध्यक्षा प्रेमलता पारवे यांनी थेट रस्त्यावर उतरून सिताई कंस्ट्रक्शनच्या सुरू असलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीत निकृष्ट दर्जा, अंदाजपत्रकाचे उघड उल्लंघन आणि प्रचंड तांत्रिक त्रुटी समोर आल्या. नगराध्यक्षांनी तात्काळ लेखी तक्रार नोंदवून कारवाईची मागणी केली.परंतु, एक महिना उलटूनही निकृष्ट काम करणाऱ्या त्या ठेकेदारावर गुन्हे का दाखल झाले नाहीत?संबंधित वॉर्ड इंजिनिअर व जबाबदार अधिकाऱ्यांना पाठीशी का घातले जात आहे?कारवाईचे कागद कोणाच्या कपाटात धूळ खात पडून आहेत? मुख्याधिकाऱ्यांचे हे संशयास्पद मौन 'दाल में कुछ काला' नव्हे, तर 'पूरी दाल ही काली' असल्याचे स्पष्ट करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

आ.विजयसिंह पंडित महावितरणप्रमाणे येथेही आक्रमक होणार का?



सध्या बीड नगरपरिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सत्ता आहे. नगरसेवक, अधिकारी आणि सिताई कंस्ट्रक्शनचा ठेकेदार यांच्या अभद्र संगनमतानेच हा महाघोटाळा पोसला जात असल्याची चर्चा चौकाचौकात रंगत आहे. या पार्श्वभूमीवर बीडकरांचा थेट सवाल आहे.ज्या आक्रमकतेने आमदार विजयसिंह पंडित यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांविरुद्ध वरिष्ठ पातळीवर तक्रार ठोकून कारवाईची जोरदार मागणी लावून धरली होती, त्याच आक्रमकतेने ते स्वपक्षीय सत्ता असलेल्या नगरपरिषदेतील या कोट्यवधींच्या घोटाळ्याची दखल घेणार का?नगराध्यक्षांच्या स्फोटक तक्रारीनंतरही सिताई कंस्ट्रक्शनच्या ठेकेदाराविरुद्ध आमदार पंडित मंत्रालयापर्यंत तक्रार करणार का? की आपल्याच सत्ताकाळातील घोटाळ्यावर पडदा टाकणार? यावर आमदारांनी तात्काळ पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका जाहीर करावी, असा जाहीर तगादा आता बीडच्या जनतेने लावला आहे.

नगरपरिषदेच्या सभेतील कारभारावर तीव्र संताप व्यक्त करताना खुर्शिद आलम यांनी प्रशासकीय प्रक्रियेवर बोट ठेवले. सभेमध्ये नियमांनुसार चर्चा घडवून न आणता, सदस्यांचे म्हणणे ऐकून न घेता केवळ औपचारिकता दाखवून ठराव मंजूर करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. ज्या विषयांवर सभागृहात एकमत झाले नाही किंवा नियमबाह्य पद्धतीने मंजुरी दाखवली गेली, अशा सर्व वादग्रस्त ठरावांची प्रत्यक्ष अंमलबजावणी तात्काळ थांबवण्यात यावी. शहराशी संबंधित सर्व विषयांवर लोकप्रतिनिधींना सविस्तर बोलण्याची संधी मिळावी यासाठी नव्याने सभा बोलावून प्रत्येक ठरावावर पारदर्शक चर्चा घडवून आणण्यात यावी. पालिकेने बहुमताच्या किंवा प्रशासकीय अधिकाराचा गैरवापर करून हे ठराव कायम ठेवल्यास उच्च न्यायालयात याचिका दाखल करून या बेकायदेशीर कारभाराला आव्हान दिले जाईल, असा थेट इशारा त्यांनी दिला. नगरपरिषद ही जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी असते, मनमानी निर्णय लादण्यासाठी नाही. लोकशाहीचे नियम धाब्यावर बसवून घेतलेले ठराव शहराच्या हिताचे नाहीत. प्रशासनाने या वादग्रस्त ठरावांना स्थगिती देऊन तातडीने नव्याने सभा बोलवावी, अन्यथा आम्हाला नाईलाजाने न्यायालयाचे दरवाजे ठोठावावे लागतील.



खुर्शिद आलम, गटनेते, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

बीड पालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना सारिकाताई क्षीरसागर यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर आक्षेप नोंदवले आहेत.पालिकेने दोन कोटी रुपयांचा हा मुरूम कधी आणि कोणत्या प्रभागात टाकण्यात आला, याची कोण–तीही ठोस माहिती स्थानिक नागरिकांकडे किंवा लोकप्रतिनिधींकडे उपलब्ध नाही.जिल्हा दुष्काळी परिस्थितीशी सामना करत असताना, जनतेच्या पैशांची अशी उधळपट्टी मुरुमावर कशासाठी करण्यात आली? मूलभूत नागरी सुविधा, पाणीपुरवठा आणि दुष्काळी उपाययोजनांना प्राधान्य देण्याऐवजी मुरुमाच्या नावाखाली कोट्यवधी रुपये खर्च करणे संशयास्पद असल्याचा आरोप त्यांनी केला. मुरुमाची खरेदी, त्याची वाहतूक, प्रत्यक्ष कामाच्या नोंदी आणि संबंधित प्रभागांची यादी मुख्याधिकाऱ्यांनी सार्वजनिक करावी व संपूर्ण खर्चाचा हिशोब सभागृहाला सादर करावा, शहरातील नागरिकांच्या हक्काच्या निधीची विल्हेवाट लावली जात असून, दोन कोटींचा मुरूम कागदावरच जिरवला गेला का, असा संशय निर्माण होत आहे. प्रशासनाने तात्काळ प्रभावनिहाय मुरुमाच्या कामांचा सविस्तर लेखाजोखा सादर करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.



सारिकाताई क्षीरसागर, गटनेत्या, भाजप



पालिकेच्या सर्वसाधारण सभांमध्ये होणाऱ्या राजकीय चिखलफेकीवर नाराजी व्यक्त करताना ॲड. गंडले यांनी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींना आत्मपरीक्षणाचा सल्ला दिला. नगरपालिकेचे सभागृह हे शहराच्या विकासाची दिशा ठरवणारे पवित्र व्यासपीठ आहे. तिथे वैयक्तिक हेवेदावे आणि राजकीय द्वेष घेऊन येणे चुकीचे आहे. सभेत चर्चा करताना कायदेशीर चौकटीत राहून आणि संविधानिक, सुसंस्कृत भाषेचाच वापर झाला पाहिजे. राजकीय कुरघोडीत शहराचे मूळ प्रश्न बाजूला पडत असून, लोकप्रतिनिधींनी दुष्काळ, पाणीटंचाई आणि मूलभूत नागरी सुविधांवर सकारात्मक चर्चा करावी.बीड शहरात सुरू असलेले कोट्यवधींचे सिमेंट रस्ते पूर्णपणे अंदाजपत्रकानुसार आणि दर्जेदार झालेच पाहिजेत. यात हलगर्जीपणा झाल्यास जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी व एजन्सीवर थेट जबाबदारी निश्चित केली जाईल. तसेच, लोकप्रतिनिधींनी आपले राजकीय मतभेद सभागृहाबाहेर ठेवून शहराच्या विकासावर संविधानिक भाषेत मंथन करावे.

ॲड.अविनाश गंडले

शहरात निर्माण झालेली भीषण पाणीटंचाई, दुष्काळी परिस्थिती आणि नागरिकांचे हाल यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी ही सभा अत्यंत महत्त्वाची मानली जात होती. मात्र, सभेत दुष्काळाच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा घडवून आणण्याऐवजी भलत्याच विषयांना मंजुरी देण्याची घाई करण्यात आल्याचा आरोप डॉ. योगेश क्षीरसागर यांनी केला. शहराला नियमित पाणीपुरवठा, टँकर नियोजन आणि स्वच्छता यांसारख्या गंभीर प्रश्नांवर ठोस निर्णय अपेक्षित असताना, प्रशासनाने मूळ विषयांना बगल देत अनावश्यक विषयांवर वेळकाढूपणा केला. लोकप्रतिनिधींना चर्चेची पुरेशी संधी न देता, बहुमताच्या जोरावर अथवा गोंधळात नियमबाह्य पद्धतीने विषय मंजूर दाखवले जात असल्याचा आक्षेप त्यांनी घेतला. दुष्काळात जनतेला दिलासा देण्याऐवजी स्वतःच्या मर्जीतील कामांचे ठराव दामटण्याचा हा प्रयत्न असून, अशा कोणत्याही जनविरोधी ठरावाला मान्यता दिली जाणार नाही, अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली. दुष्काळाच्या नावाखाली सभा बोलवायची आणि तिथे जनतेच्या मूळ समस्या बाजूला ठेवून स्वतःचे सोयीचे विषय रेटायचे, ही बीडकरांची निव्वळ फसवणूक आहे. लोकशाहीत नियम आणि कायद्याला धरून कामकाज चालते; अशा दडपशाहीने ठराव मंजूर होत नसतात. या मनमानी कारभाराला आमचा ठाम विरोध राहील.



डॉ.योगेश क्षीरसागर

शहरातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पालिकेच्या वतीने करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती देताना उपनगराध्यक्ष विनोद मुळूक यांनी नागरिकांना आश्वस्त केले. उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून शहरात नियमित व योग्य दाबाने पाणीपुरवठा करण्यासाठी पाणीपुरवठा विभागाला विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. ज्या प्रभागांमध्ये किंवा उंच सखल भागात पाईपलाईनद्वारे पाणी पोहोचण्यात अडचण येईल, तिथे तात्काळ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. दुष्काळ कितीही गंभीर असला, तरी नागरिकांचे हाल होऊ नयेत यासाठी पालिका प्रशासन, तांत्रिक विभाग आणि सर्व कर्मचारी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. राजकारण बाजूला ठेवून सध्याच्या काळात बीडकरांना मूलभूत सुविधा, विशेषतः पिण्याचे पाणी सुरळीत पुरवणे हेच प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.दुष्काळ कितीही गंभीर असला तरी त्याचा सामना करण्यासाठी बीड नगरपालिका प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करेल. प्रत्येक नागरिकापर्यंत पाणी पोहोचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून, शहरात कुठेही पाण्याची तीव्र टंचाई जाणवू दिली जाणार नाही.



विनोद मुळूक, उपनगराध्यक्ष, बीड नगरपरिषद

बीड नगरपरिषदेमध्ये सर्वसाधारण सभेत झालेला अभुतपुर्व गोंधळ हा बीडकरांसाठी लज्जास्पद बाब असुन सत्ताधाऱ्यांनी विरोधी बाकावरील नगरसेवकांना विश्वासात न घेता त्यांना कोणतीही पुर्व कल्पना न देताच ठराव पास करण्याचा घाट घालणे यातुन नगरपरिषदेच्या पारदर्शक कामाविषयी प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. कामामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी सभेचे लाईव्ह प्रक्षेपण बीडकरांसाठी डोकेदुखी ठरत असुन कामापेक्षा वादविवादाचीच जास्त चर्चा होताना दिसत आहे. सत्ताधारी नगरसेवकांनी महिला गटनेत्या विषयी केलेली वैयक्तिक टीकाटिप्पणी निषेधार्थ असुन वैचारिक मतभेद असु शकतात. सत्ताधारी आणि विरोधक यांची रणनिती असु शकते मात्र यामध्ये महिलांवर व्यक्तिगत पातळीवर टीकाटिप्पणी भविष्यात कोणीही करू नये एवढीच माफक अपेक्षा.. दुष्काळ असल्याने लोकांच्या पाणी, स्वच्छता आदी मुलभूत प्रश्नांऐवजी तब्बल अडीच कोटी रुपयांच्या मुरूमाचे काम वादाची ठिणगी पडण्यास कारणीभूत ठरले असुन यामुळे सर्वसामान्य बीडकरांच्या महत्वांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत आहे.




डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर

'सत्तेचा अहंकार उतरवलाच पाहिजे'!

शहरातील जागरूक नागरिक आणि राजकीय विश्लेषकांमध्ये सध्या या संभाव्य सत्ता समीकरणाचीच जोरदार चर्चा रंगली आहे: ''सत्ता ही जनतेची सेवा करण्यासाठी असते, सत्तेची मस्ती दाखवण्यासाठी नाही. गेल्या काही दिवसांत नगरपालिकेत ज्या पद्धतीने कामकाज चालवले गेले, त्यामुळे नगरसेवकांमध्ये तीव्र असंतोष आहे. भाजप आणि तुतारीचे २८ नगरसेवक एकत्र येऊन सत्तेचा हा अहंकार येत्या काही दिवसांत नक्कीच मोडून काढतील, अशी स्पष्ट चर्चा आता जोर धरू लागली आहे. भाजप आणि तुतारीच्या या अनपेक्षित एकत्र येण्याच्या शक्यतेमुळे सध्या सत्तेत बसलेल्या गटाचे धाबे चांगलेच दणाणले असून, बीडच्या राजकारणात मोठा राजकीय भूकंप होणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

शहरात सुरू असलेल्या आणि प्रस्तावित विकासकामांच्या गुणवत्तेबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले. शहरात खर्च होणारा प्रत्येक रुपया हा जनतेच्या करातून जमा झालेला निधी आहे. त्यामुळे कोणतेही काम करताना मंजूर अंदाजपत्रकातील निकषांचे १०० टक्के पालन झालेच पाहिजे. रस्त्यांची कामे असोत, पाईपलाईनचे काम असो वा इतर नागरी सुविधा, दर्जाबाबत कोणतीही तडजोड चालणार नाही. निकृष्ट दर्जाची कामे करून जनतेच्या पैशांची नासाडी करणाऱ्यांवर पालिकेने कडक नजर ठेवावी.मतदारांनी लोकप्रतिनिधींना सभागृहात पाठवले ते भांडण्यासाठी नाही, तर शहरातील विकासाचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी. सभागृह हे केवळ विकासाच्या मुद्द्यांवर मंथन करण्यासाठी असते. लोकप्रतिनिधींनी शहरासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत सोयी–सुविधांसाठी लढावे. तसेच शहरात होणारी सर्व कामे नियमांनुसार व दर्जेदार झाली पाहिजेत याची जबाबदारी नगर प्रशासनाची असते



ॲड.शफिक भाऊ

05 Nov 2026 page 2_Layout 1 11/4/2026 11:06 PM Page 1

दुष्काळाच्या संकटात ७० कुटुंबांना मदतीचा आधार; सलाम इंडिया फाउंडेशन व होनिस्टी मल्टिपर्पज सोसायटीचा स्तुत्य उपक्रम

पिली बस्ती येथे जीवनावश्यक राशन किटचे वाटप; मदतीमुळे गरजू कुटुंबांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

सध्या महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, सर्वसामान्य कुटुंबांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होत आहे. अशा कठीण परिस्थितीत समाजातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आधार देण्याच्या सामाजिक बांधिलकीतून सलाम इंडिया फाउंडेशन आणि होनिस्टी मल्टिपर्पज सोसायटी, परळी यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाजोगाई रोडवरील पिली बस्ती येथील ७० गरजू कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंच्या राशन किटचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत समाजसेवक तथा जामा मस्जिदचे सचिव इम्रान सर आणि माजी नगरसेवक अनवर मिस्कीन यांच्या हस्ते लाभार्थी कुटुंबांना राशन किटचे वाटप करण्यात आले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या कुटुंबांना या मदतीमुळे मोठा दिलासा मिळाला. रोजच्या गरजा भागविण्यासाठी संघर्ष करणाऱ्या या कुटुंबांना आवश्यक किराणा साहित्याची मदत मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसून येत होता. राशन किट स्वीकारताना अनेक कुटुंबांनी संस्थांच्या या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून आभार मानले. मदतीचा हात मिळाल्याने त्यांच्या



चेहऱ्यावर उमटलेले हास्य हेच या सामाजिक उपक्रमाचे खरे यश ठरले. समाजसेवा ही केवळ आर्थिक मदत करण्यापुरती मर्यादित नसून, अडचणीच्या काळात गरजू माणसाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे म्हणजे खरी माणुसकी होय. समाजातील वंचित आणि गरजू घटकांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना आवश्यक ती मदत पोहोचविण्याचा सलाम इंडिया फाउंडेशन व होनिस्टी मल्टिपर्पज सोसायटीचा हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे. यावेळी होनिस्टी मल्टिपर्पज सोसायटी, परळीचे अध्यक्ष इकबाल मिल्ली, मौलाना रेहान काजी यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. या उपक्रमातून सामाजिक एकोपा, सहकार्य आणि माणुसकीचा संदेश देण्यात आला. गरजूंच्या घरात अन्नधान्य पोहोचविणे, त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे आणि संकटाच्या काळात त्यांना आधार देणे, हीच खऱ्या अर्थाने समाजसेवेची ओळख आहे.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदतीचा दिलासा

बीड/जिमाका

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती आणि नापिकीमुळे हतबल होऊन आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक व सामाजिक आधार देण्यासाठी प्रशासनाने विशेष पुढाकार घेतला आहे. यात निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या पाठपुरावा आणि प्रयत्नांना यश आले असून, पुणे येथील श्री शिव गोरक्ष आश्रम ट्रस्ट (आंबेगाव बु.) यांच्या वतीने जिल्ह्यातील २५ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांतील वारसांना प्रत्येकी २५ हजार रुपयांच्या आर्थिक मदतीचे वाटप करण्यात आले. बीड जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित एका विशेष कार्यक्रमात परिविक्षाधीन सहाय्यक जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता, अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक आणि निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत या धनादेशांचे वाटप करण्यात आले. ट्रस्टचे अध्यक्ष किशोर मंडलिक, राजेंद्र अडगळे आणि राजेंद्र दीक्षित यांच्या सौजन्याने दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ही मदत उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मदतीसाठी केज, माजलगाव, आष्टी, पाटोदा, अंबाजोगाई, धारूर, गेवराई, बीड, शिरूर कासार आणि वडवणी या तालुक्यातील २५ कुटुंबांची प्रशासनाकडून निवड करण्यात आली होती.

साई तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या उद्घाटन सोहळ्याचे माजी राष्ट्रपती रामनाथजी कोविंद यांना निमंत्रन

पाथरी/आवडाजी ढवळे

पाथरी येथील साई तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या उद्घाटन सोहळ्याचे माजी राष्ट्रपती रामनाथजी कोविंद यांना विशेष निमंत्रण, पाथरी नगर परीषद व साई विश्वस्त समीतीच्या शिष्टमंडळाने माजी राष्ट्रपती रामनाथजी कोविंद यांची दिल्ली येथे घेतली महत्व पुर्ण भेट आ.सईद खान यांच्या नियोजनात होणार भव्यदिव्य उध्दघाटन सोहळा

सविस्तर वृत्त आसे कि पाथरीच्या साई तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी मंजूर झालेला ९१ कोटी ८० लाख ९४ हजार रुपयांचा निधी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आ. सईद खान यांच्या विशेष प्रयत्न व पाठपुराव्यामुळे मंजूर झाला. या विकास आराखड्याच्या मंजुरीच्या प्रक्रियेत तत्कालीन राष्ट्रपती रामनाथजी कोविंद यांचेही विशेष योगदान राहिले आहे.

या विकास आराखड्या मुळे पाथरी



शहराच्या विकासाचा हा महत्व पुर्ण ठप्पा ठरणार

या विकास आराखड्याच्या उध्दघाटन सोहळ्याचे विषेश निमंत्रन देशाचे माजी राष्ट्रपती रामनाथजी कोविंद यांना देण्यात आले आहे व पाथरी नगरीच्या वतीने माजी राष्ट्रपती रामनाथजी कोविंद यांचा सत्कार ही कराण्यात आला या वेळी माजी राष्ट्रपती रामनाथजी कोविंद यांनी पाथरी भेटी वेळी च्या आठवणीला उजाळा दिला. याप्रसंगी नगराध्यक्ष आसिफ भैय्या खान, उपनगराध्यक्ष आलोक चौधरी, मुख्याधिकारी काकासाहेब डोईफोडे, नगरसेवक आनिलराव ढवळे, उद्धवराव नाईक,खालिद बिन हावेल, गोविंदराव हरकळ, अमोल भालेपाटील, साजेद अली राज तसेच साई विश्वस्त समितीचे अध्यक्ष ॲड.अतुल चौधरी व विश्वस्त संजय भुसारी उपस्थित होते. पाथरीच्या विकासाचा ऐतिहासिक क्षण जवळ आला आहे आ.सईद खान यांच्या नेतृत्वाखाली लवकरच हा भव्य-दिव्य उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न होणार असून, हा क्षण समस्त पाथरीकरांसाठी अभिमानाचा ठरणार आहे.

दुष्काळस्थितीत भुजलपातळी वाढीसाठी भुमीपुत्र अनिलराव नखाते यांनी स्वखर्चातून शोधला उपाय



पाथरी/आवडाजी ढवळे

पावसातील मोठा खंड, घटता जलसाठा आणि खालावलेली भूजलपातळी यामुळे पाथरी तालुक्यातील हादगाव बुद्रुक येथे आतापासूनच दुष्काळाच्या झळा जाणवू लागल्या आहेत. या गंभीर परिस्थितीवर मात करण्यासाठी जायकवाडी धरणातून सोडण्यात येणारे पाणी हादगाव बु.या ठिकाणी लेंडीनदी नाल्यात अडवणे, जिरवणे आणि भूजलपातळी वाढवणे यासाठी भुमीपुत्र म्हणून अनिलराव नखाते यांनी कोणत्याही शासकीय निधीची वाट न बघता स्वखर्चातून जेसीबीच्या सहाय्याने येथील नाला खोलीकरण व नवीन बंधारा निर्मितीचा शुभारंभ बुधवारी केला आहे. यावेळी बाजार समीतीचे माजी सभापती अनिलराव नखाते, सरपंच बिभीषण नखाते, चेअरमन बाबासाहेब नखाते, ग्रा. प. सदस्य प्रशांत नखाते, बि. टी. कदम, शेख अशपाक यांचेसह शिवाजी नखाते, महाविर गोंगे, बालाजी लालझरे, विष्णू नखाते, शेक हाकीम, जयराज नखाते, भरत शिंदे, रामेश्वर नखाते, वसंत ढोले यांची उपस्थीती होती. स्वखर्चातून नाला खोलीकरण व नवीन बंधारा निर्मितीचा भुमीपुत्र अनिलराव नखाते यांचा हा दूरदर्शी व प्रेरणादायी उपाय गावकऱ्यांसाठी मोठा दिलासा ठरणारा आहे.

जलसंधारणाला प्राधान्य आणि जायकवाडीचे पाणी ठरणार संजीवन

सध्या दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करणाऱ्या हादगाव बु. जिल्हा परिषद सर्कल मध्ये मृद व जलसंधारणाची विविध कामे हाती घेतली जाणार आहेत.प्रत्येक गावात किमान १०० जलशोषक खड्डे तयार करणे, जुन्या बंधाऱ्यांची दुरुस्ती करणे, गाळ उपसा करणे तसेच नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण यांसारख्या कामांना प्राधान्य दिले जाणार आहे. विशेषतः जायकवाडीतून सोडण्यात आलेले पाणी हादगाव बु. येथे तातडीने अडवून त्याचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवण्यासाठी अनिलराव नखाते यांनी घेतलेला पुढाकार संपूर्ण परिसरासाठी आदर्शवत ठरणारा आहे. हा बंधारा गावाच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. जायकवाडी चे वाहणाऱ्या पाण्याचा वेग कमी करून तो लेंडीनदी नाला च्या माध्यमातून या भागात आणत स्थानिक पातळीवर अडविण्यासाठी हा बंधारा उभारण्यात आला आहे. बंधाऱ्यातील पाण्याचा प्रत्येक थेंब पिण्याच्या पाण्यासाठी आणि जनावरासाठी उपयोगात आणला जाईल.

शेवटच्या पानावरून...

प्रश्न ऐरणीवर!

निश्चित करून नियमानुसार योग्य ती प्रशासकीय कारवाई झालीच पाहिजे. मनुष्यबळाची कमतरता दूर झाली पाहिजे आणि उपलब्ध मनुष्यबळाची कार्यक्षमताही वाढली पाहिजे. आगामी सर्वसाधारण सभेत या विषयावर सविस्तर चर्चा घडवून आणून शासनस्तरावर ठोस पाठपुरावा करण्याबरोबरच नगर परिषद प्रशासनाकडूनही आवश्यक सुधारणा आणि जबाबदारी निश्चित करण्यासाठी आम्ही आग्रही राहणार आहोत. परळीच्या सर्वांगीण विकासासाठी सक्षम प्रशासन, पुरेसे मनुष्यबळ आणि उत्तरदायी कार्यसंस्कृती ही काळाची गरज आहे!

.....

लोकार्पण

भागातील आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या मदतीसाठी आपत्ती व्यवस्थापनाची बोट महत्त्वाची भूमिका बजावू शकते. याशिवाय बुलेटमुळे आपत्कालीन कामकाज आणि क्षेत्रीय पातळीवरील हालचालींना मदत होणार आहे. शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेता नगर परिषदेकडे आवश्यक यंत्रसामग्री आणि साधनसामग्री उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे. नव्याने दाखल झालेल्या या वाहनांमुळे स्वच्छता व आपत्ती व्यवस्थापनाच्या कामकाजाला अधिक बळ मिळणार आहे. यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजा खान पठाण, मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे, यांच्यासह सर्व सभापती, गटनेते, नगरसेवक आणि नगर परिषद अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

.....

राजेभाऊ फड

अंबलवाडी तलाव ते कन्हेरवाडी शिवार या ५ किलोमीटरच्या अंतरामध्ये नदीचे खोलीकरण आणि रुंदीकरण केले जाणार आहे. या कामामुळे पावसाळ्यात वाहून जाणारे लाखो लिटर पाणी नदीपात्रात साठवले जाईल, ज्याचा थेट फायदा स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थांना होईल. शेतीला बारमाही पाणी उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास मोठी मदत होणार आहे.''

२६ बोअरवेल ठरणार जलसंधारणाचा मैलाचा दगड!

या जलसंधारण प्रकल्पाचे सर्वात मोठे आणि आधुनिक वैशिष्ट्य म्हणजे, केवळ नदीचे खोलीकरण न करता नदीच्या पात्रात तब्बल २६ बोअरवेल (बोअर) घेण्यात येणार आहेत. या अभिनव प्रयोगामुळे पावसाचे पाणी थेट जमिनीच्या खोलवर मुळात जाऊन मुरेल. परिणामी, भूगर्भातील पाण्याची पातळी अत्यंत वेगाने वाढेल आणि परिसरातील विहिरी, कूपनलिका (बोअरवेल्स) भर उन्हाळ्यातही ओसंडून वाहतील, असा विश्वास राजेभाऊ फड यांनी व्यक्त केला.

दुष्काळाची जाणीव ठेवून लोकवाटा १५ व्या वित्त आयोगातून भरणार!

अशा मोठ्या लोककल्याणकारी कामांसाठी नियमानुसार गावकऱ्यांकडून लोकवाटा म्हणून गाववर्गणी गोळा करावी लागते. परंतु, सध्याची दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन मा. राजेभाऊ फड यांनी एक अत्यंत मोठा आणि दिलासादायक निर्णय जाहीर केला. ''सध्याचा दुष्काळ पाहता ग्रामस्थांवर कोणताही आर्थिक भार टाकला जाणार नाही. या कामासाठी लागणारी लोकवाट्याची संपूर्ण रक्कम ग्रामपंचायत तर्फे १५ व्या वित्त आयोगातून भरली जाईल,'' असे त्यांनी स्पष्टपणे जाहीर करताच उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात या निर्णयाचे स्वागत केले.

जलनायक मयंक गांधी यांचे कौतुक व आभार

याप्रसंगी बोलताना राजेभाऊ फड यांनी जलसंधारण क्षेत्रात अतुलनीय कार्य करणाऱ्या ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक आणि जलनायक श्री. मयंक गांधी यांची मुक्तकंठाने कौतुक करत असतांना गेल्या अनेक वर्षापासुन या भागाचे आम्ही हरितक्रांतीचे स्वप्न पाहिले होते ते केवळ जलनायक श्री मयंक गांधी यांच्या माध्यमातून पुर्ण होत आहे यांचा आम्हाला व गावकऱ्यांना आनंद होत आहे. हे फक्त मयंक गांधी यांच्या दूरदृष्टीमुळे आणि संस्थेच्या भक्कम पाठिंब्यामुळेच हे काम एवढ्या मोठ्या प्रमाणावर शक्य होत असल्याचे सांगत त्यांनी विशेष आभार मानले.

आपल्या सरपंच पदाच्या काळात जे स्वप्न पाहीले ते पुर्ण झाले

यावेळी राजेभाऊ फड बोलतांना असे ही म्हणाले की कन्हेरवाडी गावात हरित क्रांती धवल क्रांती होणार आहे आपल्या सरपंच पदाच्या काळात जे स्वप्न पाहीले होते ते सत्यात उतरतय याचा मनापासून आनंद आहे, यामुळे गावातील व परिसरातील सामान्य शेतकरी शेतमजुरांचे जिवणमान उंचावण्यासाठी मदत होणार असल्याने मला मनापासुन आनंद होत आहे. या कार्यक्रमास परिसरातील शेतकरी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

.....

सर्वसाधारण सभा

घेण्यात आला. सुधारित निकषांनुसार जिल्हा नियोजन समितीकडे आवश्यक प्रस्ताव सादर करण्याबाबत चर्चा झाली. पाणीपुरवठ्याच्या प्रश्नाबरोबरच शहरातील विकासकामे सुरू ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर भर देण्यात आला. शहरातील प्रस्तावित रस्त्यांसाठी बाधित होणाऱ्या जागांची मोजणी करून संबंधित शेतकऱ्यांना नियमानुसार विकास हक्क हस्तांतरण (टीडीआर) देण्याची कार्यवाही करण्याचे निश्चित करण्यात आले. तहसील कार्यालयामागील सर्व्हे क्रमांक २० आणि २१ मधील प्रस्तावित ३० मीटर रुंदीच्या रस्त्यासाठी भूसंपादनाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचाही निर्णय झाला.

कचऱ्यापासून इंधननिर्मितीचा प्रस्ताव

घनकचरा व्यवस्थापनाच्या दृष्टीने २५ टन प्रतिदिन क्षमतेचा आधुनिक व्हॅक्यूम डिहायड्रेटेड प्रोसेस सिस्टीम प्रकल्प उभारण्याबाबत सभेत निर्णय घेण्यात आला. शहरातून संकलित होणाऱ्या कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून त्यापासून इंधन म्हणून वापरता येणाऱ्या पॅलेट्सची निर्मिती करण्याची या प्रकल्पामागील संकल्पना आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी झाल्यास कचरा व्यवस्थापनासोबतच त्याचा पुनर्वापर करण्याची संधी उपलब्ध होऊ शकते.

पथविक्रेता आराखड्याबाबत निर्णय

मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत पालिका तेथे मत्स्यबाजार ही संकल्पना राबविण्यासाठी आराखडा तयार करण्यावर चर्चा झाली. स्थानिक मत्स्यव्यावसायिकांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा त्यामागील उद्देश आहे. शहरातील पथविक्रेत्यांच्या व्यवस्थापनासाठी तयार केलेल्या आराखड्याला मान्यता देण्याबाबतही निर्णय घेण्यात आला.

निवासी अतिक्रमणांच्या नियमनासाठी चर्चा

१ जानेवारी २०११ पूर्वीची शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे शासनाच्या प्रचलित नियमांनुसार नियमानुकूल करण्याच्या प्रक्रियेसाठी विधिज्ञ सल्लागार नियुक्त करण्याचे ठरले. नगर परिषदेच्या मालकीच्या जागेवर व्यवसाय करणाऱ्या भाजीपाला आडत व्यावसायिकांनी कृषी उत्पन्न बाजार समितीकडून आवश्यक परवाने घेण्याबाबतही चर्चा झाली. तसेच अग्निशमन विभागाच्या जुन्या वाहनावर १२ हजार लिटर क्षमतेचा पाण्याचा टँकर बसविणे, नगर परिषदेच्या वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग शेड उभारणे आणि पाणीटंचाई व दुष्काळजन्य परिस्थितीमुळे अडचणी येणाऱ्या विकासकामांना आवश्यकतेनुसार मुदतवाढ देण्याचे प्रस्तावही सभेत संमत करण्यात आले.

गौरव: नगराध्यक्षांच्या निवडीबद्दल अभिनंदन ठराव

दरम्यान, नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांची अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या गव्हर्निंग कौन्सिल सदस्यपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल सभागृहाच्या वतीने अभिनंदनाचा ठराव संमत करण्यात आला. राष्ट्रीय स्तरावरील संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात सर्वसाधारण सभा

विषय सूचीप्रमाणे साधक बाधक चर्चा व शहर विकासाच्या दृष्टीने केंद्रित मुद्द्यांवर चर्चा करत अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात ही सर्वसाधारण सभा पार पडली. या सभेत न.प.ची वाटचाल व शहर विकासाचा दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेत ठराव सर्वानुमते सभागृहात मंजूर करण्यात आले.या सर्वसाधारण सभेचे अध्यक्षपद नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी भूषवले. यावेळी उपनगराध्यक्ष खैसर राजा खान पठाण, मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांची पीठसनावर प्रमुख उपस्थिती होती. या सभेला सर्व सन्माननीय सभापती, न. प. सदस्य, सदस्या उपस्थित होते.

.....

निवेदन

सर्वसामान्य नागरिक आणि सहकार क्षेत्राच्या अडचणी समजून घेऊन सकारात्मक भूमिका घेत आहे. याच सहकार्याच्या भावनेतून पतसंस्था क्षेत्रातील काही प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करून समन्वयाने मार्ग काढण्याची भूमिका फेडरेशनने मांडली. पतसंस्था या सर्वसामान्य नागरिक, छोटे व्यावसायिक आणि ठेवीदारांसाठी आर्थिक आधाराचे महत्त्वपूर्ण माध्यम आहेत. ठेवीदारांच्या ठेवींचे संरक्षण करणे आणि थकीत कर्जाची वसुली करणे ही संस्थांची महत्त्वाची जबाबदारी आहे. कर्जवसुलीची प्रक्रिया कायदेशीर मार्गाने राबविताना पदाधिकारी व कर्मचाऱ्यांना काही अडचणींचा सामना करावा लागतो. अशा वेळी पोलीस प्रशासनाचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाल्यास हे प्रश्न अधिक सुलभतेने सोडविण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. कर्जवसुलीच्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या तक्रारी व वादांमध्ये दोन्ही बाजूंची वस्तुस्थिती समजून घेऊन कायद्याच्या चौकटीत निष्पक्ष कार्यवाही व्हावी. पतसंस्थांचे कामकाज सुरळीत चालावे, कर्मचाऱ्यांना निर्भयपणे काम करता यावे आणि ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण व्हावे, यासाठी पोलीस प्रशासन व पतसंस्था फेडरेशन यांच्यात सातत्यपूर्ण संवाद आणि समन्वय राहावा, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली. पोलीस प्रशासन आणि सहकार क्षेत्र यांच्यातील परस्पर सहकार्यामुळे जिल्ह्यातील पतसंस्था क्षेत्रातील प्रश्न सकारात्मक पद्धतीने मार्गी लागतील, असा विश्वास फेडरेशनच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

यावेळी फेडरेशनचे उपाध्यक्ष ॲड प्रकाश कवठेकर, संचालक शिवाजी देसाई, अर्जुन राऊत, संतोष सपकाळ, राहुल शिंदे,अशोक राऊत,सखाराम राऊत, चक्रधर कदम, नवनाथ खरसाडे, अंतराम गात, सखाराम शिंदे, रमेश मदने, संजय घरत, अशोक उगले,राजेंद्र ढोले,अजय धांडे,गौरीशंकर धर्माधिकारी,मुकुंद रनखांबे,सुनिल चव्हाण, मुकेश भांडवलकर,पांडुरंग घोडके, लक्षदीप पतसंस्था आदी पदाधिकारी उपस्थित होते

.....

कपिलधार

नियोजन करणे आवश्यक आहे. विशेषतः महिला, वृद्ध आणि लहान मुलांच्या आरोग्याचा व सुरक्षिततेचा विचार करून पाण्याचे टँकर आणि पुरेसा वाहतूक पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.ही यात्रा धार्मिक व सामाजिक श्रद्धेचे महत्त्वपूर्ण केंद्र असल्याने प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन भाविकांसाठी आवश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, असे आवाहनही श्री. शिवकुमार केदारी यांनी केले आहे.

.....

मन्मथआप्पा हालगे

करण्यात आला. यावेळी उपस्थित सर्वांनी मन्मथआप्पांचे आशीर्वाद घेऊन त्यांना शतायुषी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. परळी येथील वीरशैव-लिंगायत समाजाच्या जडणघडणीत, सामाजिक एकोप्याच्या वृद्धीत तसेच समाजाच्या विविध उपक्रमांत मन्मथआप्पा हालगे यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे व चिरस्मरणीय आहे. आपल्या प्रदीर्घ आयुष्यात त्यांनी समाजाशी जपलेली नाळ, समाजाप्रती असलेली आत्मीयता आणि धार्मिक व आध्यात्मिक परंपरेवरील निष्ठा यामुळे त्यांनी समाजात आदराचे स्थान निर्माण केले आहे. विशेष म्हणजे, लिंगैक्य ष. ब्र. श्री १०८ तपोरत्न प्रभुपंडिताराध्य शिवाचार्य महाराज, माजलगावकर यांच्यावरील त्यांची निस्सीम श्रद्धा, अढळ भक्ती आणि महाराजांची त्यांनी मनोभावे केलेली सेवा ही त्यांच्या जीवनातील अत्यंत प्रेरणादायी बाब आहे. गुरूंवरील श्रद्धा, गुरूसेवेतील समर्पण आणि वीरशैव धर्मपरंपरेशी असलेली त्यांची बांधिलकी ही आजच्या तसेच भावी पिढ्यांसाठी आदर्शवत आहे. या सन्मान सोहळ्याप्रसंगी प्रतिष्ठानचे ज्येष्ठ मार्गदर्शक आदरणीय श्री. दत्ताप्पा इटके गुरुजी व श्री. सोमनाथप्पा हालगे यांच्या शुभहस्ते मन्मथआप्पा हालगे यांना शाल, श्रीफळ, पुष्पहार व सन्मानपत्र प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. शतकपूर्ती वर्षाच्या प्रारंभीच समाजातील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्वाचा सन्मान करण्याचा हा उपक्रम उपस्थितांसाठी भावनिक व अभिमानास्पद क्षण ठरला. यावेळी उपस्थित सर्व पदाधिकारी व सदस्यांनी मन्मथआप्पांना आदरपूर्वक अभिवादन करून त्यांच्या चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेतले. शंभर वर्षांच्या प्रदीर्घ जीवनप्रवासात त्यांनी जपलेली श्रद्धा, संस्कार, गुरुभक्ती आणि समाजसेवेची भावना यांचा आदर्श आम्हाला सदैव प्रेरणा देत राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. याप्रसंगी मन्मथआप्पांनी आपल्या आयुष्यातील अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला. समाजाची पूर्वीची वाटचाल, धार्मिक परंपरा, गुरूंचा सहवास आणि त्या काळातील अनुभव सांगताना त्यांनी उपस्थितांशी मनमोकळा संवाद साधला. त्यांच्या अनुभवातून मिळालेले मार्गदर्शन अत्यंत मोलाचे व प्रेरणादायी ठरले. त्यांच्या बोलण्यातून गुरुभक्ती, समाजाविषयीची तळमळ आणि नव्या पिढीने समाजाशी जोडलेले राहण्याची भावना प्रकर्षाने जाणवली. उपस्थितांनीही त्यांचे मार्गदर्शन आत्मीयतेने ऐकून घेतले. या सन्मान सोहळ्याप्रसंगी वीरशैव विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. शाम बुद्रे, उपाध्यक्ष श्री. शिवकुमार केदारी, सचिव श्री. सुधीर फुलारी, कोषाध्यक्ष श्री. महेश निर्मळे, सदस्य श्री. संजय स्वामी, श्री. शिवशंकर झाडे, श्री. नागेश हालगे, श्री. श्रीहरी साखरे आदी उपस्थित होते. वीरशैव-लिंगायत समाजातील ज्येष्ठ व्यक्तींच्या अनुभवांचा, समाजकार्यातील योगदानाचा आणि त्यांच्या संस्कारांचा गौरव होणे ही काळाची गरज आहे. मन्मथआप्पा हालगे यांचे शतपूर्तीच्या दिशेने वाटचाल करणारे जीवन, त्यांची गुरुनिष्ठा, समाजाप्रती असलेली आत्मीयता आणि सेवाभावी वृत्ती ही संपूर्ण समाजासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या जीवनातील अनुभव व कार्याचा आदर्श भावी पिढ्यांनी जपावा, हीच या सन्मानामागील भावना असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. प्रभू वैद्यनाथ व सद्गुरूंच्या कृपेने आदरणीय मन्मथआप्पा हालगे यांना उत्तम आरोग्य, सुख, समाधान आणि दीर्घायुष्य लाभो. त्यांचे प्रेमळ आशीर्वाद व मार्गदर्शन समाजाला यापुढेही लाभत राहो, हीच सर्वांच्या वतीने मनःपूर्वक प्रार्थना करण्यात आली. त्यांच्या शतायुषी जीवनास विनम्र अभिवादन!

.....

लॅपटॉप चे वितरण

असतील तर सदस्यांनी कळवाव्यात असेही त्यांनी सांगितले. कु. मिनाक्षी अमोल (जगदीशजी) सारस्वत हीने पुणे येथील डी वाय पाटील इंजिनिअरिंग कॉलेजात मेरीट मध्ये प्रवेश मिळवला आहे. शिक्षणासाठी तीला लॅपटॉप ची आवश्यकता होती परंतु घरची परिस्थिती साधारण असल्याने ती पूर्णत्वास नेणे अवघड होते. ही जाणीव समजून महेश सिनियर सिटीझन ग्रुपच्या वतीने सर्व सदस्यांनी आर्थिक मदतीचा हात पुढे करून तीला याच बैठकी मध्ये लॅपटॉप चे वितरण करण्यात आले. लॅपटॉप मिळाल्याचा आनंद तीच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता. कु. मिनाक्षी ने आपल्या मनोगतात महेश सिनियर सिटीझन ग्रुप चे आभार व्यक्त केले. बैठकीचे सूत्रसंचालन ग्रुप चे सहसचिव श्री प्रा. बैजुलालजी भंडारी सर यांनी केले तर आभार प्रदर्शन सचिव श्री ओमप्रकाशजी भुतडा यांनी व्यक्त केले.

.....

मोफत साखर वाटप

साहेब यांचा प्राण असून व मा. पंकजाताई मुंडे साहेब मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली हा कारखाना अविरत चालू ठेवला जाईल. तरी परिसरातील शेतक-यांनी जास्तीत जास्त ऊस देऊन सहकार्य करावे. तसेच ऊस दराबाबत कसलीही शंका मनात ठेऊ नये. बीड जिल्ह्यातील इतर कारखान्यांच्या तुलनेत उच्चांकी दर दिला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. दिनांक ४ नोव्हेंबर ते ८ नोव्हेंबर २०२६ या दरम्यान मागील हंगामातील सर्व ऊस पुरवठादार शेतक-यांना मोफत साखर वाटप करण्यात येणार आहे. कार्यक्रमास मोठ्या प्रमाणावर शेतकरी, ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार कारखान्याचे कर्मचारी, आधिकारी उपस्थित होते.

05 Nov 2026 jalna page 3_Layout 1 11/5/2026 12:20 AM Page 1

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना | गुरूवार दि.०५ नोव्हेंबर २०२६ | पान ३

मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह प्रवेशाची संधी; १३ नोव्हेंबरपर्यंत अर्ज करा

जालना/जिमाका

सन २०२६-२७ करीता राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयम योजनेंतर्गत व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमाच्या नियमित/विद्यमान (RENEWAL/EXISTING) विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक शासनस्तरावरून प्राप्त झाले आहे. तरी शासकीय वसतिगृह योजनेंतर्गत अर्ज करताना फक्त जि. जालना हद्दीतील महाविद्यालयातील (OBC, VJNT, EWS, SBC) नियमित/विद्यमान विद्यार्थ्यांनीच ऑनलाइन/ऑफलाईन पद्धतीने आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करावा तसेच त्याची प्रत विद्यार्थ्यांनी मुलांचे शासकीय वसतिगृह, निरामय हॉस्पिटल, निसर्ग गार्डन जवळ, जुना जालना व विद्यार्थिनी मुलींचे शासकीय वसतिगृह, वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळ यांची इमारत, छत्रपती कॉलनी, जुना जालना येथे जमा करावे. जालना तालुका वगळून इतर तालुक्यातील नियमित/विद्यमान विद्यार्थ्यांनी पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयम योजना (NT-C) व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना (OBC, VJNT, SBC) या योजनांचे अर्ज सादर करण्यासाठी दि. १३ नाव्हेंबर, २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयम योजनेंच्या नियमित/विद्यमान विद्यार्थ्यांनी ऑनलाइन/ऑफलाईन पद्धतीने आवश्यक कागदपत्रांसह इतर मागास बहुजन कल्याण, जालना या कार्यालयात अर्ज सादर करावा असे आवाहन सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, जालना यांनी केले आहे.

एसटी वाहतूक बंद असल्याने विद्यार्थी व ग्रामस्थांचे हाल; रस्ता पूर्ण झाल्यानंतर मोठा दिलासा मिळणार आ.बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन

मंठा/प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील वाटूर, लावणी, वैद्यवडगाव, जयपूर ते वझर सरकटे या गावांना जोडणाऱ्या महत्त्वपूर्ण रस्त्याच्या सुधारणा कामाचे उद्घाटन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून या रस्त्याच्या कामासाठी सुमारे १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर परिसरातील अनेक गावांचा दळणवळणाचा प्रश्न मार्गी लागणार असून विद्यार्थी, शेतकरी आणि ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे.यावेळी बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, विधानसभा निवडणुकीपूर्वी या परिसरातील रस्ते, पूल व अन्य विकासकामांसाठी तब्बल २७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. त्याच अनुषंगाने या महत्त्वपूर्ण रस्त्याचे काम हाती घेण्यात आले आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना चांगल्या रस्त्यांची सुविधा मिळावी आणि गावांचा शहराशी संपर्क अधिक सुलभ व्हावा, हा या कामामागील मुख्य उद्देश आहे.रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे या मार्गावरील एसटी बसची वाहतूक बंद झाली होती. त्यामुळे विद्यार्थ्यांना, विशेषतः शाळेत जाणाऱ्या मुलींना तसेच ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. नागरिकांची ही गैरसोय लक्षात घेऊन रस्त्याच्या कामाला प्राधान्य देण्यात आले आहे. येत्या आठ दिवसांत प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असून पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे आमदार लोणीकर यांनी सांगितले.ग्रामीण दळणवळणाला मिळणार नवी गती; शेतकरी, विद्यार्थी आणि ग्रामस्थांना दिलासावाटूर, लावणी, वैद्यवडगाव, जयपूर ते वझर सरकटे हा मार्ग परिसरातील अनेक गावांसाठी दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे नागरिकांना प्रवास करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः शेतकऱ्यांना शेतमालाची वाहतूक करताना मोठ्या अडचणी येत होत्या. तसेच विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयात जाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत होती.एसटी बसची वाहतूक बंद झाल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत होता. परिणामी विद्यार्थ्यांसह पालकांनाही गैरसोयीचा सामना करावा लागत होता. आता या रस्त्याच्या सुधारणा कामामुळे गावागावांतील संपर्क व्यवस्था अधिक सक्षम होणार असून शेतमालाची वाहतूक, नागरिकांचा प्रवास



आणि दैनंदिन व्यवहार अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे. रस्ता पूर्ण झाल्यानंतर एसटी वाहतूक पुन्हा सुरळीत होण्याच्या दृष्टीनेही हा मार्ग महत्त्वाचा ठरणार आहे.पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट; विकासकामांना प्राधान्यरस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबरोबरच प्रत्यक्ष काम वेळेत पूर्ण व्हावे, यासाठी आमदार बबनराव लोणीकर यांनी विशेष लक्ष दिले आहे. येत्या आठ दिवसांत कामाला सुरुवात करून पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पावसाळ्यात ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था अधिक बिकट होत असल्याने त्यापूर्वी रस्त्याचे काम पूर्ण होणे आवश्यक आहे.या रस्त्याच्या विकासामुळे वाटूर, लावणी, वैद्यवडगाव, जयपूर आणि वझर सरकटे परिसरातील गावांना मोठा फायदा होणार आहे. ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांचा विकास, वाहतुकीची उपलब्धता आणि नागरिकांच्या दैनंदिन समस्या सोडविण्याच्या दृष्टीने हे काम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयात जाण्यासाठी आणि शेतकऱ्यांना बाजारपेठेशी जोडण्यासाठी हा रस्ता महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.या उद्घाटनप्रसंगी ज्ञानेश्वर शेजुळ, राजेश मोरे नवनाथ काकडे नाथराव काकडे दत्तात्रय काकडे आनंद जाधव मोहन आढे शहाजी राक्षे शरद पाटील विष्णुपंत काकडे सुरेश बाहेकर जगन टकले, दीपक दवणे प्रल्हाद सरकटे जितेंद्र सरकटे पांडुरंग काळे अशोक डोके रामप्रसाद सुरनर राहुल बाहेकर अंबादास टकले राजेश राठोड कृष्णा राठोड इंद्रजीत काकडे बाळासाहेब बाहेकर गणेश मुंडे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

मंठ्यात शासकीय रेशनच्या धान्याचा काळाबाजार उघड

२,५१० किलो गहू-तांदळ्यासह बोलेरो पिकअप जप्त

मंठा/प्रतिनिधी

सर्वसामान्य आणि गरजू कुटुंबांसाठी शासनाकडून सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या रेशनच्या धान्याचा काळाबाजार होत असल्याचा प्रकार मंठा तालुक्यात उघडकीस आला आहे. स्थानिक गुन्हे शाखा, जालना पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे मंठा-जिंतूर महामार्गावरील हळसवाडी परिसरात कारवाई करीत तब्बल २ हजार ५१० किलो गहू व तांदूळ जप्त केला. या कारवाईत धान्याची वाहतूक करणारी महिंद्रा बोलेरो पिकअप गाडीदेखील ताब्यात घेण्यात आली आहे.



धान्याची अवैध वाहतूक; ५.७२ लाखांचा मुद्देमाल जप्त!

दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी हळसवाडी परिसरात सापळा रचून कारवाई केली. यावेळी शासकीय सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत वितरित होणारा गहू व तांदूळ अवैधरित्या साठवून काळ्या बाजारात विक्री करण्याच्या उद्देशाने वाहनातून वाहतूक केला जात असल्याचे आढळून आले. पोलिसांनी घटनास्थळावरून ४८० किलो गहू (किंमत १२ हजार रुपये), २ हजार ३० किलो तांदूळ (किंमत ६० हजार ९०० रुपये) आणि ५ लाख रुपये किमतीची महिंद्रा बोलेरो पिकअप (क्रमांक चक-२८ अइ-४०२९) असा एकूण ५ लाख ७२ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

या प्रकरणी दत्तात्रय अर्जुन वाघ (वय २७, रा. हळसवाडी), नितीन भारतराव वडकुते व सचिन भारतराव वडकुते (दोघेही रा. मंठा) या तिघांविरुद्ध पोलीस ठाणे मंठा येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ६३९/२०२६ अन्वये जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ मधील कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. देशमुख करीत आहेत. रेशनचे धान्य नेमके कुठून आले आणि ते कोणाला विक्रीसाठी नेले जात होते, याचा तपास आता महत्त्वाचा ठरणार आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धान्याचा अपहार किंवा काळाबाजार होत असल्यास त्यामागील संपूर्ण साखळी उघड होणे गरजेचे आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या तपासातून धान्याच्या स्रोतापासून ते संभाव्य खरेदीदारांपर्यंतची माहिती समोर येते का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

जालना रहिवाशांसाठी एसआरपीएफच्या आरक्षित जागेवर भव्य

उद्यान व क्रीडांगण उभारण्याची नगरसेवक अश्विन भास्करराव अंबेकर यांची पालकमंत्री ना.पंकजाताई मुंढे यांच्याकडे मागणी

जालना/प्रतिनिधी

पालकमंत्री ना.पंकजाताई मुंढे या जालना दौऱ्यावर आल्या असता नगरसेवक अश्विन भास्करराव अंबेकर यांनी त्यांची आ.खोतकर यांच्या निवासस्थानी भेट घेऊन पालकमंत्री ना,पंकजाताई मुंढे व स्थानीक आमदार अर्जुनराव खोतकर यांना जालना शहरातील नवीन जालना भागात असलेल्या एसआरपीएफच्या आरक्षित जागेवर भव्य उद्यान, नाट्यगृह व क्रीडांगण यांची उभारणी करण्याची मागणी संपर्क प्रमुख भास्करराव अंबेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत निवेदनाद्वारे केली.

यावेळी जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे, माजी जि.प.सध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, पंडितराव भुतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, युवा नेते अभिमन्यू खोतकर, शहरप्रमुख विष्णू पाचफुले, पालिकेतील विरोधी पक्षनेते कमलेश खरे, नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले आदींची यावेळी उपस्थिती होती.

पालकमंत्री ना.पंकजाताई मुंढे व आमदार अर्जुनराव खोतकर यांना दिलेल्या निवेदनात नगरसेवक अश्विन अंबेकर यांनी म्हटले आहे की, जालना शहराची लोकसंख्या पाच लाखांहून अधिक झाली आहे. नगरपालिकेतून महानगरपालिकेत रुपांतर झालेल्या या शहरात एकच उद्यान



आहे.

भौगोलिकदृष्ट्या जालना शहर हे अर्धे नवीन जालना व अर्धे जुना जालना असे दोन भागात विभागलेले आहे. नवीन जालना भागात अडीच लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या आहे व मोठे खेळाचे मैदान नाही. महानगरपालिकेने विकास आराखड्यात नवीन जालन्यात च्या दीडशे एकरहून अधिक असलेल्या जागेपैकी २० एकर जागेवर उद्यान व खेळाचे मैदान प्रस्तावित केलेले आहे. शहरालगत असलेल्या मंठा चौफुली या भागातील जागेत संबंधित आरक्षण विकसित करून तेथे एक मोठे उद्यान, जलतरण तलाव, १२०० आसन क्षमतेचे भव्य नाट्यगृह-सभागृह व मोठे खेळाचे मैदान इ. सुविधा उभारण्यासाठी महानगरपालिकेला ५० कोटींचे विशेष अनुदान देण्यात यावे.

सदरील महानगरपालिकेने उद्यान व इतर सुविधा विकसित केल्यावर देखभाल-दुरुस्तीसाठी कडेच हस्तांतर करून शहरातील नागरिकांसाठी ते खुले ठेवावे. जेणेकरून जालना शहराच्या वैभवात भर पडेल व नागरिकांना या सर्व सुविधांचा लाभ घेता येईल. देखभाल दुरुस्ती कडे राहत असल्यामुळे व नाममात्र दरात नागरिकांना प्रवेशिका लावल्यास निश्चित स्वरूपाचे उत्पन्नही मिळेल. करिता जालना शहराच्या विकासासाठी व नागरिकांच्या सुविधेसाठी आपण ५० कोटी रुपयांचा निधी विशेष बाब म्हणून महानगरपालिकेला द्यावा अशी विनंतीही नगरसेवक अश्विन भास्करराव अंबेकर यांनी केली.

यापूर्वीही त्यांनी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत याबाबत मागणी करून उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री, आमदार लोकप्रतिनिधी अशा विविध स्तरावर ते सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. उद्यान, क्रीडांगण व इतर विकास कामांचा त्यांनी स्वखर्चाने पुणे येथून आराखडा तयार करून घेतला असून ना.पंकजाताई मुंढे यांनी सदरील आराखडा पाहून मंत्रालय स्तरावर यासंदर्भात नगरविकास व गृह विभागाची बैठक घेण्यात येईल असा शब्द दिला.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर वाढदिवस व दिवाळी स्नेहमिलन रद्द; ए. जे. पाटील बोराडे यांचा सामाजिक बांधिलकीचा निर्णय!

मंठा/प्रतिनिधी

यंदा निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटात सापडले आहेत. अनेक कुटुंबांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असून शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे. या परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तथा मंठा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ए. जे. पाटील बोराडे यांनी आपला वाढदिवस आणि दिवाळी स्नेहमिलनाचा कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. उत्सवापेक्षा संकटात सापडलेल्या शेतकरी आणि गरजू कुटुंबांना मदतीचा हात देणे महत्त्वाचे असल्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून दुष्काळग्रस्त भागातील गोरगरीब शेतमजूर, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अत्यंत गरजू कुटुंबांना दिवाळीनिमित्त जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप करण्यात येणार आहे. त्याचबरोबर दुष्काळामुळे जनावरांच्या चारा-पाण्याचा निर्माण झालेला प्रश्न लक्षात घेता जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था करण्यास प्राधान्य दिले जाणार आहे.

यासंदर्भात शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीत बोलताना ए. जे. पाटील बोराडे यांनी गावोगावी जाऊन दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर आणि गरजू कुटुंबांना मदत करण्याचे आवाहन केले. केवळ सण-उत्सव साजरे करण्यापेक्षा अडचणीत असलेल्या बांधवांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

'दुष्काळाच्या संकटात शेतकरी आणि सर्वसामान्य जनता होरपळत असताना उत्सव साजरे करण्यापेक्षा त्यांच्या दुःखात सहभागी होऊन त्यांना आधार देणे हेच आपले कर्तव्य आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे,' अशी भावना ए. जे. पाटील बोराडे यांनी व्यक्त केली. या निर्णयातून सामाजिक संवेदनशीलतेचा संदेश देत संकटाच्या काळात शेतकरी आणि गरजू नागरिकांना मदतीचा हात देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

तुरीवरील शेंग पोखरणारी अळी व शेंगमाशीचे वेळीच व्यवस्थापन करा

सहाय्यक कृषी अधिकारी चंद्रशेखर इरलेवाड याचे शेतकऱ्यांना आवाहन

यंदा एल निनोच्या प्रभावामुळे खरीप हंगामात मराठवाड्यातील अनेक भागांत अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झाला आहे. तथापि, संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध असलेल्या भागांत तुरीचे पीक चांगल्या अवस्थेत असून काही ठिकाणी कळ्या लागण्यास सुरुवात झाली आहे, तर काही क्षेत्रांत तुरळक फुलोरा दिसून येत आहे. आगामी काळात बहुतांश क्षेत्रावर तुरीचे पीक फुलोऱ्याच्या अवस्थेत येण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर तुरीवरील शेंग पोखरणारी अळी (हेलिकोवर्पा) व शेंगमाशी या किडींचा संभाव्य प्रादुर्भाव लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी वेळीच व्यवस्थापन करावे, असे आवाहन साहेब कृषी अधिकारी श्री चंद्रशेखर इर्लेवाड यांनी केले

सध्या काही भागांत ढगाळ वातावरण असल्याने तुरीच्या पिकाचे नियमित निरीक्षण करणे आवश्यक आहे. शेंग पोखरणारी अळी कळ्या, फुले व शेंगांचे नुकसान करते. तर शेंगा तयार होण्याच्या अवस्थेत शेंगमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. त्यामुळे सुरुवातीच्या अवस्थेतच किडींची लक्षणे ओळखून नियंत्रणाचे उपाय योजावेत. शेंग पोखरणाऱ्या अळीचे व्यवस्थापन अळीच्या नियंत्रणासाठी पूर्ण वाढ झालेल्या अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्यात. प्रादुर्भावाचे



निरीक्षण करण्यासाठी प्रति एकर दोन कामगंध (फेरोमोन) सापळे लावावेत. पक्ष्यांच्या मदतीने अळ्यांचे नियंत्रण होण्यासाठी प्रति एकर २० इंग्रजी टी आकाराचे पक्षी थांबे उभारावेत तसेच झाडाखाली पोते अंथरून झाडे हलवावीत व खाली पडलेल्या अळ्या गोळा करून नष्ट कराव्यात. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पाच टक्के निंबोळी अर्क किंवा अझाडिरेक्टिन घटक असलेल्या जैविक कीटकनाशकाची फवारणी करावी. किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपर्यंत पोहोचल्यास इमामेक्टिन बेंझोएट ५ टक्के एसजी (४.४ ग्रॅम), स्पिनोसॅड ४५ टक्के एससी (३ मिली), इंडाक्झाकार्ब १४.५ टक्के एससी (८ मिली), क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल १८.५ टक्के एससी (३ मिली), फ्लुबेंडामाईड २० टक्के डब्ल्यूजी (५ ग्रॅम) किंवा क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल ९.३ टक्के + लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ४.६ टक्के झेडसी (४ मिली) यापैकी कोणत्याही एका शिफारस केलेल्या कीटकनाशकाची प्रति १० लिटर पाण्यात योग्य मात्रा मिसळून फवारणी करावी

शेंगमाशीचे व्यवस्थापन

तुरीला शेंगा तयार होण्याच्या अवस्थेत पिकाचे नियमित निरीक्षण करावे. शेंगमाशीचा प्रादुर्भाव आढळल्यास लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के ईसी (८ मिली) किंवा ल्युफेन्युरॉन ५.४ टक्के ईसी (१२ मिली) यापैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची प्रति १० लिटर पाण्यात योग्य मात्रा मिसळून फवारणी करावी फवारणी करताना घ्यावयाची काळजी एकाच वेळी अनेक कीटकनाशके एकत्र मिसळून फवारणी करू नये. कीटकनाशकांसोबत बुरशीनाशके, विद्राव्य खते किंवा सूक्ष्म अन्नद्रव्ये अनावश्यकपणे मिसळणे टाळावे. एकाच कीटकनाशकाची वारंवार फवारणी न करता गरजेनुसार वेगवेगळ्या कार्यपद्धतीच्या शिफारस केलेल्या कीटकनाशकांचा वापर करावा. फवारणीपूर्वी उत्पादनाच्या लेबलवरील पिकाचे नाव, लक्ष्य कीड, मात्रा व वापरासंबंधी सूचना तपासाव्यात.

२७ डिसेंबरला माळी समाजाच्या उपवर-वधू परिचय मेळावा व सामूहिक विवाह सोहळा

जालना/प्रतिनिधी

माळी समाजाच्या वतीने आगामी २७ डिसेंबर २०२६ रोजी चिखली शहरात कृष्णप्रिय मंगल कार्यालय व लॉन येथे आयोजित करण्यात येणाऱ्या उपवर-वधू पालक परिचय मेळावा व सामूहिक विवाह सोहळ्याच्या नियोजनासाठी जालना शहरात शासकीय विश्रामगृह जालना येथे दि. १ नोव्हेंबर रोजी बैठक घेण्यात येवून, विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. हा मेळावा व विवाह सोहळा यशस्वी करण्यासाठी सर्व पदाधिकारी व समाजबांधवांनी एकजुटीने प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला.



यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष शंकरराव लिंगे, कार्याध्यक्ष रमेशभाऊ हिरळकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. बैठकीची सुरुवात महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. यावेळी आगामी मेळावा व सामूहिक विवाह सोहळ्याच्या आयोजनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पदाधिकाऱ्यांवर सोपविण्यात येणाऱ्या जबाबदाऱ्या, नियोजन आणि कामकाज याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी माळी समाजाची सामाजिक, आर्थिक व औद्योगिक क्षेत्रातील प्रगती, तसेच दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर समाजासमोरील विविध प्रश्नांवर उपस्थित विचारवंतांनी आपले विचार मांडले.

यावेळी आयोजन समिती अध्यक्ष श्रीराम झारे, मधुकरराव जाधव, अभय तायडे, केशवराव दळवी, प्रा. दिपक नन्हई, कोषाध्यक्ष श्रीधरराव पुंड, जालना जिल्हाध्यक्ष गणेशराव हरकळ, मॉ सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब शिवाजीराव वानखेडे, बबनराव घायाळ, कर्मचारी आघाडी अध्यक्ष रमाकांत वाघमारे, सचिव इंजि. सुरेश खांडेभराड, महिला आघाडीच्या अध्यक्षा मंगलताई खांडेभराड, उपाध्यक्षा संगिता फुलझाडे, शिक्षक आघाडीचे सचिव राजाभाऊ घोडके, सरचिटणीस महेश खरात, शहराध्यक्ष गजानन खांडेभराड, कोषाध्यक्ष कैलास रसाळ, सहसचिव बाबासाहेब गाडेकर, तालुका संघटक रामेश्वर अनारसे, शहर उपाध्यक्ष रुपेश बारवकर, जालना तालुकाध्यक्ष छगन किटाळे, विजय खैरे, रूपेश बारवकर, मंठा तालुकाध्यक्ष महादेव हजारे,मालतीताई जमधडे, रेखा जमधडे यांच्यासह महिला व पुरूष समाजबांधव उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन माळी महासंघ कर्मचारी आघाडीचे अध्यक्ष बाळासाहेब ठाकरे यांनी केले, तर सावता तिडके यांनी आभार प्रदर्शन केले.

दैनिक जगमित्र आवृत्ती कार्यालय मंमादेवी शॉपिंग सेंटर दु. नं.१ रेल्वे स्टेशन रोड मस्तगड जुना जालना मो. ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — गुरुवार दि.०५ नोव्हेंबर २०२६ — पान नं.४



चाकूरमध्ये चंदन तस्करांवर पोलीस उपमहानिरीक्षकांच्या विशेष पथकाचा छापा; ५४० किलो चंदन जप्त!

आनंदवाडी शिवारात ११ लाख ७० हजारांचा चंदनसाठा हस्तगत; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

लातूर । प्रतिनिधी

लातूर जिल्ह्यातील चाकूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत, मोठ्या प्रमाणावर चंदनाचा अवैध साठा केला असल्याची माहिती पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांना प्राप्त झाली होती. सदर माहितीवरून, दिनांक ०३.११.२०२६ रोजी विशेष पथकाने लातूर जिल्ह्यातील चाकूर पोलीस ठाण्याचे हद्दीतील मौजे आनंदवाडी येथे चापोली-नायगाव रोडलगत असलेल्या शेतामध्ये छापा टाकला असता, सदर ठिकाणी प्रतिबंधित चंदनाचे लाकूड पांढऱ्या रंगाच्या पोत्यांमध्ये भरून ठेवलेले आढळून आले. सदर ठिकाणावरून पथकाने ११,७०,०००/- रुपयांचे ५४० किलो चंदन जप्त केले आहे. सदर प्रकरणात पथकाने, नरसिंग रामा बुंदराळे, वय ५० वर्ष, रा. आनंदवाडी, ता. चाकूर जि. लातूर, वसंत भानुदास चानकाणे, वय ४० वर्ष, रा. वाढवणा, ता. उदगीर, जि. लातूर, संतोष वैजनाथ चानकाणे, वय ३५ वर्ष, रा. वाढवणा, ता. उदगीर, जि. लातूर व बालाजी भानुदास चानकाणे, वय ४२ वर्ष, रा. वाढवणा ता. उदगीर जि. लातूर यांच्याविरुद्ध चाकूर पोलीस ठाणे येथे गुरनं ५९४/२०२६ कलम ३०३(२), ३(५) भारतीय न्याय संहिता, कलम ४१, ४२ भारतीय वन अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला असून, सध्या त्याचा तपास सुरू आहे.

सदर कारवाईत, पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ गणेश राठोड, पोहेकॉ संदिप वाघाडे व पोहेकॉ गजानन डवरे यांनी सहभाग घेतला.

पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक, शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

खबर हेल्पलाइन वरुन माहिती द्या: अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलीसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, सदर हेल्पलाइन वरून नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहचवावी,असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.



खेळाडूंना शासकीय नोकरीतील ५ टक्के आरक्षणासाठी पात्र खेळांची यादी जाहीर; 'क्रीडा ई-प्रमाण' प्रणालीचा वापर करावा

लातूर । प्रतिनिधी

राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर नोकऱ्यांमध्ये ५ टक्के आरक्षणाचे धोरण लागू करण्यात आले आहे. मात्र, हे आरक्षण नेमक्या कोणत्या खेळांसाठी लागू आहे, याबाबत खेळाडू तसेच नागरिकांमध्ये असलेला संभ्रम दूर करण्यासाठी शासनाच्या नियमानुसार पात्र खेळांची अधिकृत यादी जाहीर करण्यात आली आहे. शासन निर्णयातील तरतुदींनुसार सन २००५ ते २०२८ या कालावधीत सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये समाविष्ट असलेले खेळ, तसेच देशी व लोकप्रिय खेळांचा या आरक्षणात समावेश करण्यात आला आहे.

आरक्षणासाठी पात्र ठरलेल्या खेळांमध्ये जलक्रीडा, तिरंदाजी, थलेटिक्स, बॅडमिंटन, बास्केटबॉल, बॉक्सिंग, कॅनो/कयाक, सायकलिंग, घोडेस्वारी, तलवारबाजी, फुटबॉल, जिम्नॅस्टिक्स, हँडबॉल, हॉकी, ज्युदो, मॉडर्न पेंटॅथलॉन, रोईंग, सेलिंग, नेमबाजी, टेबल टेनिस, तायक्वांदो, टेनिस, ट्रायथलॉन, व्हॉलीबॉल, वेटलिफ्टिंग, कुस्ती, गोल्फ, रग्बी सेव्हन्स, स्केटबोर्डिंग, सर्फिंग, स्पोर्ट क्लाइंबिंग, कबड्डी, खो-खो, मल्लखांब, बुद्धिबळ आणि क्रिकेट या ३६ खेळांचा समावेश आहे.

'क्रीडा ई-प्रमाण' प्रणालीचा वापर करण्याचे आवाहन

क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून ब्लॉकचेन वर आधारित 'क्रीडा ई-प्रमाण' ही डिजिटल प्रणाली विकसित करण्यात आली आहे. राज्यातील सर्व प्राविण्यप्राप्त खेळाडूंनी आपल्या क्रीडा प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी या अत्याधुनिक प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी जयराज मुंढे यांनी केले आहे.

अवैध धंद्यांवर लातूर पोलिसांची धडाकेबाज कारवाई!

ऑक्टोबर महिन्यात जुगार व अवैध दारूविक्रीप्रकरणी २४३ गुन्हे दाखल; ३१० आरोपींवर कारवाई, ४५ लाख ४२ हजारांचा मुद्देमाल जप्त

लातूर । प्रतिनिधी

लातूर जिल्ह्यात अवैध जुगार आणि दारूविक्रीच्या व्यवसायाला आळा घालण्यासाठी लातूर पोलीस दलाने ऑक्टोबर महिन्यात धडाकेबाज कारवाई केली आहे. संपूर्ण महिन्यादरम्यान जिल्ह्यात जुगार व दारूसंबंधित एकूण २४३ गुन्हे दाखल करून ३१० आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. राज्यातील सर्व प्राविण्यप्राप्त खेळाडूंनी आपल्या क्रीडा प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी या अत्याधुनिक प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी जयराज मुंढे यांनी केले आहे.

जिल्ह्यातील अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तसेच या कारवायांचा दैनंदिन आढावा घेऊन अवैध व्यवसायांवर सातत्याने लक्ष ठेवण्याचे निर्देशही दिले होते. सध्या जिल्ह्यात पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील नागरिकांना कमी उत्पन्न आणि आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत नैराश्यातून नागरिक व्यसनाधीनतेकडे वळू नयेत, तसेच जुगार व अवैध दारूच्या व्यवसायामुळे सामाजिक आणि कौटुंबिक समस्या निर्माण होऊ नयेत, यासाठी अवैध धंद्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याचे धोरण लातूर पोलिसांनी स्वीकारले आहे.

जुगारविरोधी कारवाईत ३५ लाखांहून अधिक मुद्देमाल जप्त

ऑक्टोबर महिन्यात जुगारविरोधी कारवाईदरम्यान जिल्ह्यात एकूण ६२ गुन्हे दाखल करण्यात आले. या प्रकरणांमध्ये १२९ आरोपींवर कारवाई करण्यात आली असून, तब्बल ३५ लाख ४९ हजार ५५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अवैध दारूविक्रीविरोधात १८१ गुन्हे दाखल

अवैध दारूविक्री आणि दारूसंबंधित गैरप्रकारांविरोधातही लातूर पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर कारवाई केली. या मोहिमेत एकूण १८१ गुन्हे दाखल करून १८१ आरोपींवर कारवाई करण्यात आली. या कारवायांमध्ये ९ लाख ९२ हजार ७८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या माध्यमातून अवैध धंद्यांविरोधातील ही मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे. अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर केवळ अधूनमधून कारवाई न करता नियमितपणे लक्ष ठेवून कठोर कायदेशीर कारवाई करण्यास लातूर पोलीस दलाने प्राधान्य दिले आहे. अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी लातूर पोलिसांची ही कारवाई यापुढेही अधिक प्रभावीपणे आणि सातत्याने सुरू राहणार असून, जिल्ह्यात शांतता, सुव्यवस्था आणि सामाजिक स्वास्थ्य टिकवून ठेवण्यासाठी पोलीस दल कटिबद्ध आहे.

विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील 'ओपीडी' दिवाळी सणात दोन दिवस राहणार बंद

लातूर । प्रतिनिधी

दिवाळी सणानिमित्त विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) शुक्रवार, ६ नोव्हेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये घोषित करण्यात आलेल्या स्थानिक सुट्टीमुळे बंद राहील. तसेच मंगळवार, १० नोव्हेंबर २०२६ रोजी दीपावली पाडव्याची शासकीय सुट्टी असल्याने ओ.पी.डी. सेवा बंद राहील. रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ रोजी नेहमीप्रमाणे साप्ताहिक सुट्टीमुळे ओ.पी.डी. बंद राहणार आहे.

शनिवार, ७ नोव्हेंबर २०२६, सोमवार, ९ नोव्हेंबर २०२६ रोजी बाह्यरुग्ण विभाग नियमित वेळेत सुरू राहील. तसेच बुधवार, ११ नोव्हेंबर २०२६ पासून सर्व ओ.पी.डी. सेवा पूर्ववत आणि नियमित वेळेप्रमाणे सुरू राहतील. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहणार आहे, असे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरड यांनी कळविले आहे.

राष्ट्रीय स्तरावरील पर्यावरण मोहिमेत जेएसपीएम संचालित स्वामी विवेकानंद विद्यालयाची यशस्वी भरारी

पर्यावरण संवर्धन; ई-कचरा संकलनातून विद्यार्थ्यांनी गोळा केला तब्बल १०० किलो ई-कचरा!

लातूर । प्रतिनिधी

पर्यावरण संवर्धनासाठी केवळ जनजागृती न करता प्रत्यक्ष कृतीतून योगदान देण्याचा आदर्श जेएसपीएम संचालित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालय, लातूर येथील स्वराज्य सौदामिनी ताराराणी गाईड पथकाने घालून दिला आहे. राष्ट्रीय मुख्यालय, भारत स्काऊट्स अँड गाईड्स यांच्या पुढाकाराने राबविण्यात येणार्या 'हरित भारत उपक्रम' अंतर्गत हवामान बदलावर युवा नेतृत्वाची कृती प्रकल्पच्या माध्यमातून सुरू असलेल्या कचरा संकलन व वर्गीकरण मोहिमेत विद्यालयाने सक्रिय सहभाग नोंदविला आहे. या मोहिमेअंतर्गत दिनांक ३ नोव्हेंबर २०२६ रोजी शाळेत विशेष ई-कचरा संकलन अभियान उत्साहात संपन्न झाले. या अभियानातून विद्यार्थ्यांनी तब्बल १०० किलो ई-कचरा संकलित करून पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात मोलाचे योगदान दिले.



दिनांक १ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत राबविण्यात येत असलेली ही मोहीम मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी यांच्या प्रेरणेने व गाईड कॅप्टन शितल वाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या घरातील निरुपयोगी इलेक्ट्रॉनिक व विद्युत उपकरणे संकलित करून या अभियानात उत्स्फूर्त सहभाग घेतला. ई-कचर्याची अयोग्य विल्हेवाट पर्यावरणासाठी गंभीर धोका निर्माण करू शकते. त्यामुळे ई-कचर्याचे योग्य संकलन, वर्गीकरण आणि अधिकृत पुनर्चक्रण यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून समजावून देण्यात आले. या उपक्रमाला भारत स्काऊट्स अँड गाईड्स, जिल्हा कार्यालय, लातूरच्या जिल्हा गाईड संघटक माधवी दळवी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी संकलित ई-वेस्टचे व या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. तसेच कचरा व्यवस्थापन, ई-कचर्याची सुरक्षित विल्हेवाट आणि पर्यावरण संवर्धन याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सहभागातून राबविण्यात आलेल्या या मोहिमेने पर्यावरणाप्रती सामाजिक बांधिलकी, जबाबदार नागरिकत्व आणि कृतीशील नेतृत्वाचा सुंदर आदर्श निर्माण केला आहे. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ज्ञानेश्वर देशमुख यांना 'राजर्षी शाहू महाराज पुरस्कार' प्रदान!

लातूर । संतोष सोनवणे

लातूर तालुक्यातील बोरगाव काळे येथील रहिवासी तथा लातूर तालुका काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस ज्ञानेश्वर भगवानराव देशमुख यांना अध्यात्म, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रतिष्ठेचा 'राजर्षी शाहू महाराज पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. माटेफळ येथील संस्थापक अध्यक्ष बापू खोसे यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या राजर्षी शाहू महाराज सामाजिक दायित्व मंचाच्या आठव्या वर्धापन दिनानिमित्त लातूर येथील भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. लातूर जिल्हा मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, ॲड. अण्णाराव पाटील, श्रीमती पंचशीला डावकर आणि जिल्हा परिषद सदस्य सूरज शिंदे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुरस्कार देऊन ज्ञानेश्वर देशमुख यांचा गौरव करण्यात आला.

ज्ञानेश्वर देशमुख यांनी अल्पावधीतच अध्यात्म, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटवला आहे. सामाजिक उपक्रम, महापुरुषांच्या जयंती उत्सवांचे आयोजन, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे प्रश्न तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी ते सातत्याने पुढाकार घेतात. अध्यात्माच्या माध्यमातून गावातील धार्मिक कार्यक्रम, मंदिर व्यवस्थापन, कीर्तन आणि अखंड हरिनाम सप्ताह यासारख्या उपक्रमांतही त्यांचा सक्रिय सहभाग असतो. स्वर्गीय विलासरावजी देशमुख यांचे विचार तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम ते निष्ठेने करतात. तसेच सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख, अमितभैया देशमुख आणि धीरजभैया देशमुख यांच्यावरील निष्ठा व प्रेमातून पक्षाने सोपविलेली जबाबदारी ते निस्वार्थ भावनेने पार पाडतात. तालुका काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीसपदाच्या माध्यमातून शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न मांडून ते सोडविण्यासाठी त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न असतो.

राजकारणासोबतच समाजकारण आणि अध्यात्माची सांगड घालत जनसेवेचा वसा जपणाऱ्या ज्ञानेश्वर देशमुख यांच्या कार्याची दखल घेत त्यांना राजर्षी शाहू महाराज या पुरस्काराने सन्मानित केले आहे. या पुरस्कारामुळे त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याला नवी ऊर्जा मिळाली असून, बोरगाव काळे परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

फुलोरा विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची पाणी बचतीसाठी प्रभातफेरी; जनजागृतीतून दिला जलसंवर्धनाचा संदेश!

लातूर । प्रतिनिधी



वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाण्याचे महत्त्व, पाणी बचत आणि जलसंवर्धनाबाबत नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने दीप प्रतिष्ठान संचलित फुलोरा विद्यालय, लातूर यांच्या वतीने ४ नोव्हेंबर रोजी प्रभातफेरी व जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध घोषणांच्या माध्यमातून पाणी बचतीचा संदेश देत नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. गजानन गोंधळी आणि सचिव डॉ. यशपाल कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. प्रभाग क्रमांक १४ च्या नगरसेविका सौ. स्वाती घोरपडे यांच्या हस्ते प्रभातफेरीचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी बोलताना नगरसेविका स्वाती घोरपडे म्हणाल्या की, समाजामध्ये विविध विषयांवर जनजागृती मोहिमा राबविल्या जातात; मात्र सध्याच्या परिस्थितीत पाण्याबाबत जनजागृती करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रभाग क्रमांक १४ मध्ये फुलोरा विद्यालयाने हा उपक्रम राबविल्याबद्दल संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, नियोजक आणि विद्यार्थ्यांचे त्यांनी कौतुक केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. रोहिणी सावंत (वाकडे) यांनी पाणी बचतीचे महत्त्व विशद करताना सांगितले की, शहरातील नळगळती असो किंवा घराघरांमध्ये होणारा पाण्याचा अपव्यय असो, ही केवळ एका व्यक्तीची नव्हे तर सामाजिक आणि सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येक नागरिकाने पाणी बचतीचे गांभीर्य ओळखून त्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. या प्रभातफेरीचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी प्रत्येक घरापर्यंत पाणी बचतीचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न केला. यासाठी विद्यार्थ्यांनी मातीची छोटी मडकी तयार करून त्यावर 'पाणी जपा' असा संदेश लिहिला आणि गृहभेटी देत नागरिकांना पाणी वाचविण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी डोक्यावर कळशी व हंडे घेऊन, हातात 'पाणी वाचवा, जीवन वाचवा' असे संदेश असलेले फलक घेऊन जनजागृती केली. 'पाणी आहे तर जीवन आहे', 'थेंब थेंब वाचवूया', अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. तसेच एकांकिका आणि 'पाणी पाणी सारे म्हणती, पाणीविना सृष्टी रडती' या कवितेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी पाण्याचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी पाणी वाचविण्याची आणि पाण्याचा अपव्यय टाळण्याची सामूहिक शपथ घेतली. या उपक्रमात विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत जलसंवर्धनाचा संदेश पोहोचविणारा हा उपक्रम सामाजिक जाणीव निर्माण करणारा ठरला. थेंब थेंब पाण्याचा अमूल्य ठेवा जपला, तरच उद्याची पिढी सुरक्षित राहील, हा संदेश फुलोरा विद्यालयाच्या प्रभातफेरीतून देण्यात आला.

विविध क्षेत्रात कार्य केलेल्या मान्यवरांचे आमदार प्रभु चव्हाण यांच्या हस्ते सत्कार

औराद, उदगीर । प्रतिनिधी

औराद शहरातील क्रीडांगणावर तालुका प्रशासनाच्यावतीने आयोजित केलेल्या कन्नड राज्योत्सव कार्यक्रमात बोलताना आमदार प्रभु चव्हाण यांनी कन्नड भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नाही, ती आपल्या नाडाची अस्मिता, संस्कृती आणि परंपरेचे प्रतीक आहे. कन्नड भाषेचे जतन आणि विकासासाठी प्रत्येकाने जबाबदारीने कार्य केले पाहिजे. मुलांमध्ये बालपणापासूनच कन्नड भाषेबद्दल अभिमान निर्माण करण्यासोबतच घरात, शाळेत आणि सार्वजनिक जीवनात कन्नडला अधिक प्राधान्य दिले पाहिजे, असे प्रतिपादन आमदार प्रभू चव्हाण यांनी केले.



शहरातील क्रीडांगणावर तालुका प्रशासनाच्यावतीने आयोजित केलेल्या कन्नड राज्योत्सव कार्यक्रमात ते बोलत होते. कन्नड नाडूने अनेक महान व्यक्ती, साहित्यिक, कवी आणि स्वातंत्र्यसैनिक देशाला दिले आहेत. कन्नड भाषेला हजारो वर्षांचा इतिहास आणि विशेष साहित्य परंपरा लाभली आहे. अशा भाषेचा गौरव राखणे हे प्रत्येक कन्नडिगाचे कर्तव्य आहे, असे ते म्हणाले. यावेळी शिक्षक जगन्नाथ देशमुख यांनी व्याख्यान दिले. तालुका पंचायतीचे ई.बी. किरण पाटील, ए.आय. प्रेमसागर, ए.आय. मारुती राठोड, टी.ए.सी.बी. औराद शहरातील तालुका क्रीडांगणावर झालेल्या राज्योत्सवात मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

कन्नड राज्योत्सवा निमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय सेवा केलेल्या मान्यवरांना तालुका प्रशासनाच्यावतीने कन्नड राज्योत्सव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. ज्येष्ठ पत्रकार शरणप्पा चिटमे, शिक्षक गोविंद पाटील खेरडेकर, लोककलावंत चंद्रकांत ढबाले आणि सीपीआय रघुवीरसिंग ठाकूर यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचवेळी बुद्धिबळ खेळात राज्यस्तरावर निवड झालेला आदर्श विद्यालयाचा विद्यार्थी प्रशांत मादप्पा यांचाही व्यासपीठावर सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. या वेळी अनिलकुमार एकलारे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, शाळा-कॉलेजचे विद्यार्थी, शिक्षक, संघ-संस्थांचे प्रमुख आणि सार्वजनिक नागरिक उपस्थित होते. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तहसीलदार एडि शिवकुमार फाटे यांनी स्वागत करून वंदन केले.

रुद्रवाडी येथील उपक्रमशील शिक्षिका रेश्मा शेख यांचा 'आयडॉल शिक्षक' म्हणून गौरव



उदगीर । पाटील मनेश

शिक्षण क्षेत्रात आपल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांनी आणि सातत्यपूर्ण कार्याने वेगळा ठसा उमटवणाऱ्या जिल्हा परिषद प्रशाला, रुद्रवाडी येथील उपक्रमशील सहशिक्षिका रेश्मा इस्माईल शेख तांबोळी यांची राज्य शैक्षणिक व संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या वतीने 'आयडॉल शिक्षक' म्हणून निवड करण्यात आली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचा पतीसह विशेष सत्कार प्रसिद्ध साहित्यिका डॉ. वर्षाराणी मुस्कावाड यांनी केला. यावेळी श्री छत्रपती शाहू महाराज सैनिकी विद्यालयातील एनसीसी प्रमुख डॉ बालाजी मुस्कावाड हे उपस्थित होते.

रेश्मा शेख तांबोळी यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीची दखल राज्यस्तरावर घेण्यात आली आहे. या अभिमानास्पद निवडीबद्दल डॉ. वर्षाराणी मुस्कावाड यांनी रेश्मा तांबोळी यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव केला. यावेळी डॉ. वर्षा मुस्कावाड यांनी त्यांच्या उपक्रमशीलतेचे कौतुक केले आणि अशा शिक्षकांमुळेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यास मदत होत आहे, अशा भावना व्यक्त करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

डॉ. बालाजी मुस्कावाड यांनी शुभेच्छा देताना म्हटले, रेश्मा शेख तांबोळी यांच्या या यशामुळे जि. प. प्रशाला रुद्रवाडी आणि संपूर्ण तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. यात त्यांचे पती सहशिक्षक तांबोळी यांचेही मोलाचे योगदान आहे. रेश्मा शेख यांचे दहा पुस्तक प्रकाशित असून यापैकी डउएठढ पुणे तर्फे पर्यावरण या काव्यसंग्रहाची निवड झाली आहे. त्यांच्या उंच भरारी या काव्यसंग्रहाला जीवनगौरव आणि लातूरभूषण पुरस्कार मिळाला आहे. सामाजिक क्षेत्रात काम करताना त्यांनी सात अनाथ मुलींच्या शिक्षणाचा खर्च उचलून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संगिता काळे (धाराशिव जिल्हा प्रतिनिधी)
मो.9588601740 PRGI.NO.MHMAR/26/A0224

धाराशिव जिल्हा आवृत्ती | गुरूवार दि.०५ नोव्हेंबर २०२६ | पान नं. ५

आता संभाजी नगर, पुणे, मुंबई येथे जाण्याची गरज नाही

मुळव्याध : संडासच्या जागी आग होणे, दुखणे, कोंब येणे, रक्त जाणे, जागा लहान होणे, फिशर
सांधेदुखी : पाठीच्या मणक्याचे त्रास, चमक मारणे, गॅप पडणे, गुडघे दुखी, टाचदुखी, मानपाठ, कंबरदुखी, हातपायाला मुंग्या येणे, नस दबणे, डोकेदुखी, अंग दुखणे,
स्त्रीयांचे सर्व आजार : मुल बाळ होत नसल्यास वजन जास्त असणे, केस गळणे, चक्करयेणे, घबराहट, बैचेनी, झोप न येणे, पचनाचे व पित्ताचे त्रास, पोटदुखी, हाडीताप, मुतखडा, त्वचारोग, ॲलर्जि सर्दी, खोकला, दमा.

रविवारी दवाखाना बंद राहील

डॉ.रविंद्र ईटके
आयुर्वेद व पंचवर्ग तज्ञ (पुणे)

डॉ.सौ.भाग्यश्री ईटके
स्त्रीरोग व आयुर्वेद तज्ञ

वेळ : स. ११ ते २.३० संध्या : ६ ते ८
सोनोग्राफी सेंटर समोर पदमावती गल्ली, परळी. वै
मो.9822816010, 7588596838

विश्वश्री : आयुर्वेद हॉस्पिटल व पंचकर्म केंद्र

मोबाईलच्या व्यसनात अडकलेल्या तरुणाईला मैदानी खेळाचा विसर!

लोहगाव/निजाम शेख

मोबाईल आज गरज आहे की व्यसन? हा प्रश्न सध्याच्या काळात प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे. तंत्रज्ञानाने संपूर्ण जग जवळ आणले, माहितीचे भांडार हातात उपलब्ध करून दिले; मात्र त्याच मोबाईलच्या अतिवापरामुळे तरुणाईच्या जीवनशैलीत मोठे बदल घडताना दिसत आहेत.

पूर्वी मोकळ्या वेळेत मित्रांसोबत गप्पा मारणे, मैदानी खेळ खेळणे, वाचन करणे किंवा कुटुंबासोबत वेळ घालवणे याला महत्त्व दिले जात होते. आज मात्र अनेक तरुणांचा बहुतांश वेळ मोबाईलच्या स्क्रीनसमोर जात आहे. सोशल मीडिया, ऑनलाइन गेम्स, व्हिडिओ आणि सतत येणाऱ्या नोटिफिकेशनच्या आभासी जगात तरुणाई इतकी रमली आहे की, आजूबाजूच्या वास्तवाकडेही दुर्लक्ष होत आहे.

मोबाईलमुळे शिक्षण आणि ज्ञान मिळवणे निश्चितच सोपे झाले आहे. ऑनलाइन अभ्यासक्रम, शैक्षणिक व्हिडिओ, डिजिटल पुस्तके आणि विविध माहिती सहज उपलब्ध होत आहे. त्यामुळे मोबाईल हे स्वतःमध्ये वाईट साधन नाही. मात्र, त्याचा अतिरेक आणि अनियंत्रित वापर ही चिंतेची बाब बनली आहे.

मोबाईलच्या अतिवापरामुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष, झोपेच्या वेळेत बदल, एकाग्रतेचा अभाव आणि प्रत्यक्ष संवाद कमी होणे यांसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. सतत स्क्रीनकडे पाहण्याची सवय लागल्याने मैदानी खेळ, व्यायाम आणि आरोग्यदायी जीवनशैलीकडे दुर्लक्ष होत आहे.

विशेष म्हणजे, सोशल मीडियावरील आभासी जग आणि प्रत्यक्ष जीवन यातील फरक समजून घेणेही गरजेचे आहे. इतरांचे फोटो, यश आणि आकर्षक जीवनशैली पाहून स्वतःची त्यांच्याशी तुलना करण्याची सवय तरुणांनी टाळली पाहिजे. कारण सोशल मीडियावर दिसणारे प्रत्येक चित्र म्हणजे संपूर्ण वास्तव नसते.

या परिस्थितीत पालक आणि शिक्षकांची जबाबदारीही महत्त्वाची आहे. केवळ मोबाईल हिसकावून घेण्यापेक्षा तरुणांशी संवाद साधणे, त्यांना मैदानी खेळ, वाचन, कला आणि सामाजिक उपक्रमांकडे वळवणे अधिक गरजेचे आहे. घरातही ठरावीक वेळ मोबाईलमुक्त ठेवण्याची सवय लावली पाहिजे. आज गावोगावी मैदानांची उपलब्धता, क्रीडा साहित्य आणि खेळांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. स्थानिक पातळीवर कबड्डी, खो-खो, क्रिकेट, फुटबॉल यांसारख्या स्पर्धांचे आयोजन केल्यास तरुणाईला मोबाईलच्या आभासी जगातून बाहेर पडून मैदानी खेळांकडे वळण्याची संधी मिळू शकते.

तरुणाई ही देशाची खरी ताकद आहे. तिच्या हातातील मोबाईल ज्ञान, कौशल्य आणि प्रगतीचे साधन बनले पाहिजे; वेळ वाया घालवणारे व्यसन नव्हे.

मोबाईल आपल्या हातात असावा; मात्र आपल्या आयुष्याचा ताबा मोबाईलच्या हातात जाऊ नये. तंत्रज्ञानाचा वापर करा, पण त्याचे गुलाम होऊ नका! मैदानी खेळांना पुन्हा प्राधान्य द्या, कारण निरोगी तरुणाईतूनच सक्षम समाज आणि सशक्त राष्ट्राची निर्मिती होते.संपादकीय सूचना: हा लेख दैनिकाच्या विशेष लेख, रविवार विशेष किंवा जनजागृतीपर सदरासाठी योग्य आहे. शेवटी दिलेला मैदानी खेळांना प्राधान्य देण्याचा मुद्दा ग्रामीण भागातील वाचकांशी अधिक प्रभावीपणे जोडला जाईल.

शिष्यवृत्तीची रक्कम खर्चली ज्ञानवृद्धीसाठी; कनिष्ठ विद्यार्थ्यांसाठी पुस्तकांची अनमोल भेट!

अणदूर/सचिन तोग्गी

''दिले तर बरेच काही जाते, पण ज्ञानाची आणि मार्गदर्शनाची भेट ही सर्वोत्तम भेट असते,'' या विचाराचा प्रत्यय तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या कृतीतून घडवून आणला आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करून शिष्यवृत्तीधारक ठरलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या शिष्यवृत्तीच्या माध्यमातून मिळालेल्या यशाचा उपयोग इतर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी करण्याचा स्तुत्य उपक्रम राबविला आहे. त्यांच्या या सामाजिक जाणीवेतून आणि शाळेप्रती असलेल्या कृतज्ञतेतून परिसरात त्यांचे विशेष कौतुक होत आहे. मागील वर्षी इयत्ता सातवीमध्ये शिक्षण घेत असताना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची शिष्यवृत्ती परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण होऊन या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीधारक होण्याचा मान मिळविला होता. शासनाकडून त्यांच्या बँक खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा झाल्यानंतर त्यांनी या रकमेचा उपयोग केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता शाळेतील इतर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार यावर्षी शिष्यवृत्ती परीक्षेला बसणाऱ्या आपल्या कनिष्ठ विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी उपयुक्त ठरतील, अशा विविध नामांकित प्रकाशनांची अभ्यासपुस्तके त्यांनी शाळेला सप्रेम भेट दिली. शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करताना विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, विविध विषयांचा सराव करता यावा, तसेच नामांकित प्रकाशनांच्या पुस्तकांमधील अभ्यासाच्या सोप्या पद्धती, महत्त्वाचे प्रश्न आणि शॉर्टकट ट्रिक्स यांचा उपयोग करून परीक्षेत चांगले यश संपादन करता यावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. या पुस्तकांमुळे आगामी शिष्यवृत्ती परीक्षेला सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना निश्चितच मोठी मदत होणार आहे.

पवन घुगरे यांची शिवसेना शिंदे गटाच्या तुळजापूर तालुका गटप्रमुखपदी निवड!

सामाजिक व शेतकरी चळवळीतील कार्याची पक्षाकडून दखल; कार्यकर्त्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव

अणदूर/सचिन तोग्गी

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील सामाजिक कार्यकर्ते तथा शेतकरी संघटनेचे नेते पवन बसवराज घुगरे यांची शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या तुळजापूर तालुका गटप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि शेतकरी चळवळीतील कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे. या निवडीमुळे अणदूरसह परिसरातील शिवसैनिक आणि त्यांच्या समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या नियुक्तीचे अधिकृत पत्र तुळजापूर विधानसभा संपर्कप्रमुख शिवसेना शिंदे गटाचे गणेश देवानंद रोचकरी यांच्या हस्ते पवन घुगरे यांना प्रदान करण्यात आले. यावेळी शिवसेना शिंदे गटाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व मित्रपरिवार उपस्थित होते.



पवन बसवराज घुगरे हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात सक्रिय असून सर्वसामान्य जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी सातत्याने पुढाकार घेतला आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी त्यांनी गावपातळीवर विशेष प्रयत्न केले आहेत. शासकीय कार्यालयांमध्ये सर्वसामान्य नागरिकांची कामे मार्गी लावणे, गरजू लोकांना मदत करणे तसेच जनतेच्या प्रश्नांसाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करणे, अशा विविध माध्यमांतून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे.

विशेषतः शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत ते नेहमीच आक्रमक भूमिका घेत आले आहेत. शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, शेतीमालाचे प्रश्न आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी अनेक आंदोलने केली आहेत. शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवित त्यांनी परिसरात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

त्यांच्या सामाजिक कार्याची आणि जनसंपर्काची दखल घेत कार्यकर्ते व मित्रपरिवाराने त्यांना राजकीय क्षेत्रात सक्रिय होण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यांच्या आग्रहाखातर त्यांनी मागील पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीत अणदूर पंचायत समिती गणातून निवडणूकही लढवली होती. या माध्यमातून त्यांनी स्थानिक पातळीवरील राजकारणातही आपला सहभाग नोंदविला.

त्यांच्या आजवरच्या सामाजिक कार्याचा अनुभव, शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाण, सर्वसामान्य नागरिकांशी असलेला थेट संपर्क आणि संघटनात्मक कार्य करण्याची क्षमता लक्षात घेऊन गणेश देवानंद रोचकरी यांनी त्यांची तुळजापूर तालुका गटप्रमुखपदी नियुक्ती केली आहे.

या नियुक्तीमुळे तुळजापूर तालुक्यात शिवसेना शिंदे गटाची संघटनात्मक ताकद वाढविण्यास मदत होणार असून ग्रामीण भागातील नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याची संधी मिळणार असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. यावेळी माडजे भाऊजी, ॲड. उदय भोसले, लोमटे सर, सोमनाथ डांगे, लालसाहब शेख, कुंभार मामा यांच्यासह शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पवन बसवराज घुगरे यांच्या निवडीबद्दल शिवसेना शिंदे गटातील पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि अणदूर परिसरातील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

धाराशिव काँग्रेस कमिटीच्या वतीने प्रलंबित शेत रस्त्याच्या मागणीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

जळकोट/विजय पिसे

तुळजापूर तालुक्यातील रोखलेले/प्रलंबित शेत रस्ते तातडीने मंजूर करून द्यावेत यासाठी धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना धाराशिव जिल्हा राष्ट्रीय काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष उमेशराजे निंबाळकर व जिल्हा उपाध्यक्ष गोपाळ सत्यवान सुरवसे यांच्या वतीने निवेदन देण्यात आले. तुळजापूर तालुक्यातील प्रलंबित शेत रस्ते व पानंद रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन निवेदन सादर करण्यात आले .गेल्या सात वर्षांपासून अनेक गावातील शेतरस्ते व पानंद रस्त्याची कामे प्रलंबित आहेत . तसेच एकही रस्ता नवीन झालेला नाही.त्यामुळे शेतकऱ्यांना शेतात जाण्या-येण्यासाठी तसेच शेतमालाची वाहतूक करण्यासाठी शेतातील माल, खते बियाणे व कृषी अवजारे वाहून येण्यासाठी अतोनात अडचणीला सामोरे जावे लागत आहे. पावसाळ्यात तर परिस्थिती अतिशय बिकट होते. तसेच रस्त्या अभावी रहदारीवरून वहिवाटीवरून शेतकऱ्यां मध्ये भांडणे आणि गंभीर तंटे निर्माण होत आहेत यामुळे मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत



आहे. अशा या शेत रस्त्याच्या अडचणीमुळे बळीराजा अत्यंत बिकट आणि हवालदिल परिस्थितीत शेती करत आहे.सर्व प्रलंबित रस्त्यांना तातडीने मंजुरी देऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे. याकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्यास शेतकऱ्यासह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन व बेमुदत उपोषण करण्याचा इशारा ही देण्यात आला आहे.

जिल्हा प्रशासनाचे मायक्रो फायनान्स कंपन्या,बँका व पतसंस्थांना आवाहन

धाराशिव/जिमाका

आधीच दुष्काळाच्या संकटाने होरपळलेल्या शेतकऱ्यांपुढे आता आर्थिक अडचणींचा डोंगर उभा राहिला आहे.पावसाअभावी शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अशा कठीण परिस्थितीत कर्जवसुलीच्या तगाद्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडू नये, यासाठी जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. जिल्ह्यातील सर्व मायक्रो फायनान्स कंपन्या, मल्टीस्टेट पतसंस्था आणि बँकांनी दुष्काळग्रस्त शेतकरी व कर्जदारांकडून सक्तीची कर्जवसुली टाळावी. कर्जवसुलीसाठी कोणत्याही प्रकारचा मानसिक दबाव अथवा धमकी न देता शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या ४ ऑक्टोबर २०२६ आणि १४ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयांनुसार जिल्ह्यातील धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर, लोहारा, परांडा आणि उमरगा हे सर्व आठ तालुके दुष्काळी तालुके म्हणून घोषित करण्यात आले आहेत.या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शेतकरी आणि शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांसमोर उपजीविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सध्या राज्यात आणि विशेषतः धाराशिव जिल्ह्यात निर्माण झालेल्या गंभीर दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी बांधवांची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट झाली आहे. शेतीचे अतोनात नुकसान झाल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे.

श्री श्री गुरुकुल येथे राज्यस्तरीय व विभागीय स्पर्धेमधील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

अणदूर/प्रतिनिधी

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील श्री श्री गुरुकुल या शाळेतील विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धेमधील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ (बुधवारी दि.४) संपन्न झाला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य डॉ.जितेंद्र कानडे हे होते.



यावेळी संस्थेचे सचिव डॉ. नागनाथ कुंभार, शिवसेना नेते बाळकृष्ण घोडके- पाटील,ग्रामपंचायत सदस्य बालाजी घुगे, डॉ.हरिदास मुंडे ,संचालिका डॉ रुपाली कानडे, मुख्याध्यापक लक्ष्मण नरे,मुख्याध्यापक शिवराज भुजबळ यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत यश संपादन केलेल्या अर्णव कानडे व आर्यन नागनाथ शिंदे तर विभागीय स्पर्धेमध्ये यशस्वी झालेल्या श्रेयश गावित, ध्रुवराज मुळे, श्रेयश मुळे ,अर्णव मुळे व व महा टॅलेंट परीक्षेत यश संपादन केलेल्या तांबोळी नॉमिन नौशाद, भुजबळ विश्वराज शिवराज, घोडके विराज लक्ष्मीकांत, गवळी आयुष श्रीकांत यांचा सत्कार यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामेश्वर सावंत यांनी सूत्रसंचालन ज्ञानेश्वर बंडगर तर आभार अर्जुन माशाळकर यांनी मानले. आज मोबाईलच्या काळामध्ये मैदानी खेळ खेळण्याचे प्रमाण कमी झाले आहे प्रत्येक शाळांनी विद्यार्थ्यांच्या मैदानी खेळाकडे वैयक्तिक लक्ष देणे गरजेचे असून निरोगी आरोग्यासाठी खेळणी अत्यंत गरजेचे असून शाळेच्या माध्यमातून विविध खेळांना प्रोत्साहन दिले पाहिजे. पुढील काळात चांगल्या पद्धतीने इनडोअर स्टेडियम उभारून त्यामध्ये सर्व खेळांची तयारी करून घेण्याचा मानस असल्याचे डॉ. कानडे यांनी यावेळी बोलून दाखवले.

जवाहर मध्ये दिपावली निमित्त पर्यावरणपूरक आकाशकंदिल बनविणे कार्यशाळा



अणदूर/प्रतिनिधी

जवाहर विद्यालय, अणदूर येथे आज (४ नोव्हेंबर) रोजी प्रतिवर्षाप्रमाणे दिपावली सणानिमित्त पर्यावरणपूरक आकाशकंदिल बनविणे कार्यशाळा संपन्न झाली. इयत्ता पाचवी मधील चौऱ्याऐंशी विद्यार्थी मुला-मुलींनी पर्यावरणपूरक आकाशकंदिल बनविण्याच्या कार्यशाळेत सहभाग नोंदविला होता.विद्यालयाचे मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी व चित्र कलाशिक्षक किरण गायकवाड यांच्या संकल्पनेतून ही कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेतून उत्कृष्ट आकाशकंदिल साकारलेल्या सान्हवी चव्हाण, ओजल निसरगुंडे, निशिता वट्टे, श्रेया सातपुते, धनश्री मुळे, स्वरा राठोड, श्रेया मोकाशे, हरिओम भांगे, लोकेश म्हैत्रे, श्लोक कांबळे यांना प्रथम, व्दितीय, तृतीय, उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात येणार आहे. ही कार्यशाळा यशस्वीतेसाठी वर्गशिक्षिका पल्लवी मैत्री, प्रतिभा ऐकुंडे, आरती चौधरी यांनी परिश्रम घेतले.

जळकोट येथील समर्थ क्लासेसचा पालक मेळावा संपन्न

जळकोट/विजय पिसे

जळकोट येथील श्री केदारलिंगेश्वर मंदिराच्या सभागृहात समर्थ क्लासेसचा पालक मेळावा पार पडला. त्यावेळी विद्यार्थी व माता, पालकांना विद्यार्थ्यांची मानसिकता व पालकांची जबाबदारी या विषयावर मार्गदर्शन करताना आई-वडिलांनी आपल्या पाल्यांचे सर्व लाड जरूर पुरवावेत. परंतु त्यांना घडवण्यासाठी वेळप्रसंगी रागावले पाहिजे. असे विचार अणदूर येथील जवाहर महाविद्यालयाच्या माजी प्राचार्य प्रा.डॉ. अनिता मुदकन्ना यांनी जळकोट व्यक्त केले. यावेळी या कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशराव सोनटक्के, अणदूर येथील नालंदा एज्युकेशनचे मल्लिनाथ लंगडे, समर्थ क्लासेसचे संचालक रामशेट्टी पाटील हे होते.प्रथम समर्थ क्लासेसच्यावतीने मान्यवरांचा शाल व ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला.



या कार्यक्रमात समर्थ क्लासची विद्यार्थिनी कु. ज्योती खंडू चंदे हिची पवित्र पोर्टलद्वारे प्राथमिक शिक्षक पदावर कोकण विभागात निवड झाल्याबद्दल तिचे वडील खंडू चंदे यांचा व भोसगा येथील रहिवासी व हराळी येथील ज्ञान प्रबोधिनी येथील शिक्षक शिवराज नाईकवाडे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

मुदकन्ना पुढे म्हणाल्या की, केवळ क्लासवर पाल्यांची जबाबदारी टाकून चालणार नाही. पालकांचे कर्तव्य आहे की, त्यांनी वेळोवेळी आपल्या मुलाची प्रगती बघितली पाहिजे. मातांनी मोबाईलचा वापर कमी करावा. टीव्ही सिरीयल पाहू नेत. मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष द्यावे असा सल्ला त्यांनी यावेळी दिला. या पालक मेळाव्यास बालाजी पाठक, नागनाथ किलजे, मेघराज किलजे, विजय पिसे, बालाजी माळी, सतीश माळी, शिवानंद कारले, श्री. भैया किलजे, क्लासचे विद्यार्थी, माता, पालक उपस्थित होते.

मानमोडी शाळेच्या विद्यार्थ्यांना रंगोत्सवमध्ये गोल्ड, सिल्वर मेडल



जळकोट/विजय पिसे

जळकोट बीटमधील आयएसओ मानांकनप्राप्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मानमोडी येथील विद्यार्थ्यांनी रंगोत्सव सेलिब्रेशन अँड ऑर्गनायझेशन फॉर नॅशनल लेवल आर्ट कॉम्पिटिशन या स्पर्धेमध्ये भाग घेतला होता भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी ७ विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल, ६ विद्यार्थ्यांना सिल्वर मेडल आणि पाच विद्यार्थ्यांना देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जळकोट बीट विस्तार अधिकारी श्री. जट्टे एन.जी, प्रमुख पाहुणे कम्प्युटर्सचे संचालक लक्ष्मीकांत पाटील, शालेय व्यवस्थापन समिती माजी उपाध्यक्ष सौ. शुभांगी सुरवसे, शिक्षण प्रेमी श्री. दिनेश राठोड, मुख्याध्यापक विक्रम पाचंगे, सहशिक्षक मोहिते रामकृष्ण, श्रीमती सुचिता चव्हाण, सौ. शालुबाई कदम शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेमध्ये उतरणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी पालक शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन विद्यार्थी गुणवत्ता कशी वाढेल. यासाठी प्रयत्नशील राहावे. असे श्री जट्टे यांनी आपले मत व्यक्त केले तर सध्याचे युग हे संगणकाचे युग असून प्रत्येक विद्यार्थ्याने संगणकाच्या माध्यमातून प्रगती करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. असे कॉम्प्युटर्सचे लक्ष्मीकांत पाटील यांनी आपले मत व्यक्त केले. आभार रामकृष्ण मोहिते यांनी मानले.

परळी नगर परिषदेतील रिक्त पदांचा प्रश्न ऐरणीवर!

मनुष्यबळ वाढीसाठी नगरविकास मंत्र्यांसोबत विशेष बैठकीचा पुढाकार आवश्यक!

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

कोणत्याही शहराचा विकास विविध योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सक्षम आणि पुरेसे प्रशासकीय मनुष्यबळ असणेही तितकेच आवश्यक असते. परळी नगर परिषदेतील विविध महत्त्वाच्या संवर्गांतील मंजूर पदे आणि प्रत्यक्ष कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या पाहता मनुष्यबळाची गंभीर कमतरता दिसून येत आहे.

विभागनिहाय पदस्थिती पुढीलप्रमाणे : विभाग,मंजूर पदे,कार्यरत,रिक्त पुढीलप्रमाणे...

स्थापत्य अभियंता मंजूर पदे ६ कार्यरत १ रिक्त ५, लेखापाल व लेखापरीक्षक मंजूर पदे ३, कार्यरत ०,रिक्त ३, पाणीपुरवठा अभियंता मंजूर पदे १ कार्यरत ०, रिक्त १, स्वच्छता निरीक्षक मंजूर पदे ४ कार्यरत १ रिक्त ३, अग्निशमन सेवा मंजूर पदे ४ कार्यरत ० रिक्त ४ केवळ या पाच महत्त्वाच्या संवर्गांचा विचार केला तरी १८ मंजूर पदांपैकी १६ पदे रिक्त असून जवळपास ८९ टक्के पदांवर कर्मचारी उपलब्ध नगर विकास कडून अद्याप भरले गेले नाहीत. याचा परिणाम प्रशासकीय कामकाज, विकासकामे आणि नागरी सुविधांच्या अंमलबजावणीवर होणे स्वाभाविक आहे. त्यातच अलीकडील बदल्यांमुळे मनुष्यबळाचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे.

राज्य शासनाच्या नगर विकास विभागातील २५० संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या अलीकडील बदल्यांमध्ये परळी नगर परिषदेला एकही नवीन कर्मचारी मिळालेला नाही. उलट,संगणक अभियंता श्री.लक्ष्मीकांत देशमुख यांची पाथरी नगर परिषदेत, तर सभा व्यवस्थापन व भांडारपालाची जबाबदारी सांभाळणारे श्री. सत्यजित पिटके यांची गडहिंग्लज नगर परिषदेत बदली झाली आहे. या पार्श्वभूमीवर परळी नगर परिषदेतील रिक्त पदे भरणे, आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी उपलब्ध करून देणे आणि नियमित भरती होईपर्यंत पर्यायी मनुष्यबळाची व्यवस्था करणे, या मागण्यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

शासनस्तरावर पाठपुरावा सुरू!

या सर्व परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत माजी मंत्री तथा आमदार श्री.धनंजय मुंडे साहेब आणि ना.पंकजाताई मुंडे साहेब यांनी उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री ना. एकनाथ शिंदे साहेब यांच्यासोबत परळी नगर परिषदेच्या मनुष्यबळासह विविध प्रशासकीय प्रश्नांवर लवकरच विशेष बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिले आहे. गेल्या दहा महिन्यांत उपलब्ध मनुष्यबळाच्या मर्यादेतही अनेक अधिकारी आणि कर्मचारी शासकीय सुट्टी न बघता वेळ काळ न बघता अतिरिक्त जबाबदारी स्वीकारून नागरिकांना अधिकाधिक सुविधा देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्या कामाचे आणि सेवाभावाचे निश्चितच कौतुक केले पाहिजे. कर्तव्यात कसूर करणाऱ्या किंवा कामात जाणीवपूर्वक दिरंगाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांची जबाबदारी (पान २ वर)

नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह सर्व नगरसेवकांच्या उपस्थितीत वाहनांचे लोकार्पण



परळी वैजनाथ/प्रतिनिधी....

शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्यासह आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज करण्याच्या दृष्टीने परळी नगर परिषदेत नवीन वाहनांची भर पडली आहे. नगर परिषदेकडे सक्शन मशीन, आपत्ती व्यवस्थापनासाठी बोट तसेच बुलेट उपलब्ध झाली असून, या वाहनांचे लोकार्पण नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी आणि सर्व नगरसेवकांच्या उपस्थितीत करण्यात आले.

शहरातील स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन तसेच विविध नागरी सुविधांच्या कामांना गती देण्यासाठी सक्शन मशीन उपयुक्त ठरणार आहे. तर पावसाळ्यात उद्भवणाऱ्या पूरस्थिती अथवा जलमय (पान २ वर)

ब्रम्हा नदीच्या खोलीकरण व रुंदीकरण कामाचा भव्य उद्घाचन सोहळा राजेभाऊ फड यांच्या हस्ते संपन्न!

कन्हेरवाडी/प्रतिनिधी

कन्हेरवाडी आणि आजूबाजूच्या परिसराचा पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीचा पाणीप्रश्न कायमचा मिटवण्यासाठी एक अत्यंत ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आले आहे. ग्लोबल विकास ट्रस्ट यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या एका भव्य कार्यक्रमात, मा. श्री. राजेभाऊ फड यांच्या शुभहस्ते ब्रम्हा नदीच्या खोलीकरण व रुंदीकरण कामाचे विधीवत पूजन करून भव्य उद्घाटन संपन्न झाले. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे कन्हेरवाडी



परिसराच्या जलक्रांतीला नवी दिशा मिळणार आहे.

पहिल्या टप्प्यात ५ किलोमीटरचे काम

याप्रसंगी माध्यमांशी आणि ग्रामस्थांशी बोलताना मा. श्री. राजेभाऊ फड यांनी प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले की, ''कन्हेरवाडी आणि परिसराला बारमाही टंचाईमुक्त करणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे. पहिल्या टप्प्यात (पान २ वर)

पाणीटंचाईच्या नियोजनासह परळीच्या विविध विकासकामांना न.प. च्या सर्वसाधारण सभेत दिशा!

सभागृहात घनकचरा प्रक्रिया प्रकल्प, रस्ते विकास आणि पथविक्रेता आराखड्याबाबत निर्णय; नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांच्या अभिनंदनाचा ठराव

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

ना. पंकजाताई मुंडे व आ.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली परळी शहराचा सर्वांगीण विकास करण्याचा उद्देश घेऊन नगरपरिषद काम करत आहे. आगामी काळात उद्भवू शकणारी पाणीटंचाई, शहरातील पायाभूत सुविधांचा विकास आणि नागरी प्रश्नांच्या निराकरणावर लक्ष केंद्रित करीत परळी वैजनाथ नगर परिषदेच्या



सर्वसाधारण सभेत विविध महत्त्वपूर्ण प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नगर परिषद सभागृहात अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात झालेल्या या सभेत पाणीटंचाई निवारण आराखडा, रस्ते विकास, घनकचरा व्यवस्थापन, पथविक्रेत्यांचे नियोजन आणि निवासी अतिक्रमणांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली दुष्काळी परिस्थितीचा विचार करून संभाव्य पाणीटंचाई व अन्य बाबींसाठी स्वतंत्र टंचाई आराखडा तयार करण्याचा निर्णय सभेत (पान २ वर)

पतसंस्था आणि पोलीस प्रशासन यांच्या समन्वयातून प्रश्न सोडविण्यावर भर

फेडरेशनचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

बीड/प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नागरी सहकारी पतसंस्थांच्या पदाधिकारी व कर्मचाऱ्यांना कर्जवसुलीच्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणींवर सकारात्मक मार्ग काढण्यासाठी तसेच पतसंस्था आणि पोलीस प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक दृढ व्हावा, या उद्देशाने बीड तालुका पतसंस्था फेडरेशनच्या वतीने मा. पोलीस अधीक्षक, बीड यांना निवेदन देण्यात आले.



फेडरेशनचे अध्यक्ष कल्याण आखाडे व उपाध्यक्ष अॅड प्रकाश कवठेकर, शिवाजी देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. पतसंस्था क्षेत्रातील विविध प्रश्न आणि अडचणी सोडविण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून मिळत असलेल्या सहकार्याबद्दल फेडरेशनच्या वतीने समाधान व्यक्त करण्यात आले. पोलीस प्रशासन नेहमीच कायदा व सुव्यवस्था राखण्यासोबतच (पान २ वर)

कपिलधार यात्रेसाठी भाविकांना पिण्याचे पाणी व वाहतूक पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन द्या!

परळी वैजनाथ/प्रतिनिधी



श्रीक्षेत्र कपिलधार येथे संत शिरोमणी शिवयोगी मन्मथ स्वामी यांच्या कार्तिक पौर्णिमा यात्रेनिमित्त महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यातून हजारो भाविक दर्शनासाठी दाखल होत असतात. या यात्रेसाठी महाराष्ट्र व कर्नाटकातून येणाऱ्या ७० हून अधिक पायी दिंड्यांमधील भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेता, भाविकांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पाण्याचे टँकर तसेच वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात यावा, अशी मागणी वीरशैव विकास प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते श्री. शिवकुमार राजेश्वर आप्पा केदारी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.कार्तिक पौर्णिमा यात्रेसाठी दूरवरून पायी येणाऱ्या हजारो भाविकांना प्रवासादरम्यान पिण्याच्या पाण्याची गैरसोय होऊ नये, तसेच यात्रास्थळी गर्दीमुळे वाहतुकीचा प्रश्न निर्माण होऊन भाविकांना अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने वेळीच (पान २ वर)

निराधारांना मदतीचा आधार; माधवतात्या निर्मळ यांच्याकडून किराणा किटचे वाटप

धारूर/अतुल शिनगारे

तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देण्यासाठी नर्मदा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था मर्या. धारूरच्या वतीने विधवा व परित्यक्ता माता-भगिनींना किराणा किटचे वाटप करण्यात आले. माजलगाव मतदारसंघाचे नेते तथा संस्थेचे अध्यक्ष माधवतात्या निर्मळ यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे गरजू महिलांची दिवाळी गोड होण्यास मदत झाली आहे.

दिवाळी हा आनंद, प्रकाश आणि आपुलकीचा सण आहे. समाजातील प्रत्येक घटकाला या सणाचा आनंद घेता यावा, या भावनेतून संस्थेने हा सामाजिक उपक्रम राबविला. दुष्काळामुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटाच्या काळात गरजू माता-भगिनींना दिलासा देण्याचा प्रयत्न यानिमित्ताने करण्यात आला.यावेळी माधवतात्या निर्मळ म्हणाले, ''यंदाचा दुष्काळ १९७२ च्या दुष्काळापेक्षाही अधिक कठीण आहे. अशा परिस्थितीत सर्वांच्या घरात दिवाळीचा आनंद निर्माण व्हावा, या उद्देशाने संस्थेच्या माध्यमातून मदतीचे कार्य हाती घेतले आहे. यापुढेही हे सामाजिक



कार्य सातत्याने सुरू राहील.'' वाटप करण्यात आलेल्या किराणा किटमध्ये खाद्यतेल, साखर, गूळ, डाळ, मैदा यांसह इतर जीवनावश्यक वस्तूंचा समावेश होता.या प्रसंगी ज्येष्ठ मार्गदर्शक रामचंद्र निर्मळ, जिल्हा भाजपा सरचिटणीस अॅड. बालासाहेब चोले, लालासाहेब तिडके, बाळासाहेब गायकवाड , संजीत कोमटवार, शिवाजीराव काळे, रामप्रभू मुंडे, देवाशेठ लोंढे, काशिनाथ आप्पा आकुसकर, अनिलशेठ शेळके, पत्रकार मनोज भैय्या जगताप यांच्यासह पदाधिकारी व माता-भगिनी उपस्थित होत्या.सामाजिक बांधिलकी जपत निराधारांच्या जीवनात आनंदाचा दीप उजळविणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



मराठवाडा पदवीधर मतदारसंघ नवनिर्वाचित आमदार मा.डॉ.प्रतापसिंह वेद प्रकाश पाटील यांची माझ्या निवासस्थानी सदिच्छा भेटी प्रसंगी सत्कार करताना सोबत सन्माननीय संस्थाचालक मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यामध्ये प्रामुख्याने प्रा.चंद्रकांत गायकवाड, वाल्मीक सुरासे, पांडुरंग तांगडे पाटील, प्राध्यापक शाम सरकटे एडवोकेट विशाल कदम भीमराव हत्तीआंबिरे एस.पी.जवळकर, अरुण नवले, प्रा.अनिल सुरडकर, पुंडलिकराव डहाके, हिरालाल गतखणे, आनंद भाऊ खरात, भास्करराव म्हस्के, विलासराव जाधव, गणपतराव गायकवाड, डॉ.भागवत नाईकवाडे, अनिल देशमुख, मुख्याध्यापक बी. एम. हजारे, निलेश गायकवाड, धैर्यशील केरे, राजीव राठोड आसाराम शेळके, अरुण शिंदे, विजय निकम, संदीप शिंदे, विठ्ठल चव्हाण, प्रदीप देशमुख, अरुणराव गायकवाड, ॲड.पी.डी.देशमुख, रवींद्र शिंदे, जगदीश गोंडे, गणेश बोर्डे, शिवनारायण जाधव, एच.डी.पाटील, शेख पाशुभाई, सुभाष मगर भाऊसाहेब मगरे बद्रीनाथ साबळे, मधुकर त्रिभुवन, गजानन राठोड, गजानन काटकर, नितीन देशमुख आदी उपस्थित होते.

शतकपूर्ती वर्षानिमित्त ज्येष्ठ श्रेष्ठ मन्मथआप्पा हालगे यांचा सन्मान!

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी येथील वीरशैव-लिंगायत समाजातील आदरणीय ज्येष्ठ-श्रेष्ठ मन्मथप्पा वैजनाथप्पा हालगे यांच्या आयुष्यातील शतकपूर्ती वर्षास आश्विन शुद्ध अष्टमीपासून प्रारंभ झाला आहे. त्यांच्या या शतकपूर्ती वर्षाचे औचित्य साधून त्यांच्या प्रदीर्घ जीवनकार्याचा, समाजाप्रती असलेल्या योगदानाचा, गुरुभक्तीचा आणि सेवाभावाचा गौरव करण्यासाठी परळी वीरशैव-लिंगायत समाज व वीरशैव विकास प्रतिष्ठान, परळी वैजनाथ यांच्या वतीने त्यांच्या बसवेश्वर कॉलनी येथील निवासस्थानी जाऊन त्यांचा सन्मान (पान २ वर)



ओंकार साखर कारखान्यामार्फत शेतक-यांची दिवाळी गोड मोफत साखर वाटप व रु १००/- चा उस बिलाचा हप्ता देणार

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

ओंकार साखर कारखाना प्रा. लि. युनिट नं. ८. पांगरी कारखान्याचे धोरणानुसार दीपावली सणानिमित्त शेतक-यांना मोफत साखर वाटप करण्याचा शुभारंभ कारखान्याचे चेअरमन श्री बाबूरावजी बोत्रे पाटील साहेब यांचे शुभहस्ते कारखाना साईटवर करण्यात आला. यावेळी ओंकार शुगर ग्रुपच्या मुख्य कार्यकारी आधिकारी तेजस्विनीताई बर्गे या उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे उद्घाटनप्रसंगी साखर बॅगचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचा



सत्कार व गाळप हंगाम २०२५ -२६ मध्ये ऊस पुरवठा केलेल्या शेतक-यांना मा. श्री बाबूरावजी बोत्रे पाटील साहेब यांचे हस्ते मोफत साखर वाटप करण्यात आली.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना ओंकार शुगर ग्रुप युनिट नंबर १ ते २७ चे चेअरमन श्री बाबूरावजी बोत्रे पाटील यांनी सर्व शेतकरी बांधव , कारखान्याचे कर्मचारी व तोडणी-वाहतूक ठेकेदार यांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. तसेच येत्या २ दिवसात मागील गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये ऊस पुरवठा केलेल्या शेतक-यांचा रु १००/- चा उस बिलाचा हप्ता वर्ग केला जाईल असे सांगितले. हा कारखाना म्हणजे लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे (पान २ वर)

महेश सिनियर सिटीझन ग्रुपच्या वतीने गरजू विद्यार्थ्याला लॅपटॉप चे वितरण



परळी वैजनाथ/प्रतिनिधी

महेश सिनियर सिटीझन ग्रुपच्या वतीने दिपावली नंतर कर्नाटक मधील पिठापुर यात्रा संबंधी विचार विनिमय करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीची सुरुवात नेहमीप्रमाणे सुंदरकांड पारायण पठणाने करण्यात आली होती. तत्पश्चात बैठकीचे इतिवृत्त आणि यात्रेचे स्वरूप या बद्दल ग्रुप चे अध्यक्ष श्री पांडुरंगजी सोनी यांनी माहिती सांगितली. प्रवासादरम्यान येणाऱ्या अडचणी बद्दल काही सुचना (पान २ वर)

कर्मचाऱ्यांसमोर शेर आणि प्रत्यक्ष सभागृहात ढेर!

१६ नगरसेवक कर्मचाऱ्यांसमोर आक्रमक, मग सर्वसाधारण सभेत मौन का?-नगरसेवकांच्या भूमिकेवर सय्यद बहादूरभाई यांचा सवाल

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी नगर परिषदेमध्ये कर्मचाऱ्यांच्या शिस्तीचा आणि प्रशासनातील कारभाराचा मुद्दा उपस्थित करत 'नगर परिषदेत चालतंय तरी काय?' या उपक्रमाच्या माध्यमातून री-लद्वारे भूमिका मांडणाऱ्या १६ नगरसेवकांनी आजच्या सर्वसाधारण सभेत मात्र याच विषयावर ठाम भूमिका का घेतली नाही, कर्मचाऱ्यांसमोर शेर आणि प्रत्यक्ष सभागृहात ढेर का झाले? असा सवाल काँग्रेसचे बीड जिल्हा उपाध्यक्ष सय्यद हनीफ उर्फ बहादूरभाई यांनी उपस्थित केला आहे.

नगर परिषदेत कर्मचाऱ्यांच्या शिस्तीचा प्रश्न उपस्थित करत सोशल मीडियावर आक्रमक भूमिका मांडणारे नगरसेवक प्रत्यक्ष सर्वसाधारण सभेत या विषयावर का बोलले नाहीत? कर्मचाऱ्यांसमोर आक्रमक भूमिका आणि प्रत्यक्ष निर्णय करायचा सभागृहात मात्र मौन, अशी भूमिका का दिसून आली?, असा प्रश्न बहादूरभाई यांनी उपस्थित केला. कर्मचाऱ्यांच्या कामकाजातील शिस्त, नगरसेवकांची प्रलंबित कामे आणि प्रशासनाकडून मिळणारी माहिती या मुद्द्यांवर सभागृहात ठोस चर्चा होणे अपेक्षित होते. मात्र कर्मचाऱ्यांच्या बाबतीतील आक्रमक भूमिकेचे प्रतिबिंब सभेतील चर्चेत दिसले का, याचे उत्तर संबंधित नगरसेवकांनी द्यावे, असे आव्हानही त्यांनी दिले. सोशल मीडियावर व्यक्त केलेली नाराजी आणि प्रत्यक्ष सभागृहातील भूमिका यामध्ये तफावत असल्याचा आरोप करत, नगरसेवकांनी केवळ रीलपुरती आक्रमकता न दाखवता शहराच्या प्रश्नांवर सभागृहातही ठामपणे आवाज उठवावा, अशी अपेक्षा सय्यद हनीफ उर्फ बहादूरभाई यांनी व्यक्त केली आहे.कर्मचाऱ्यांसमोर शेर आणि सभागृहात ढेर?'' अशी अवस्था झाल्याचा बोचरा सवाल उपस्थित करत बहादूरभाईंनी या नगरसेवकांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.





जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740).

नोव्हेंबर / November
गुरुवार / Thursday
दि.०५/ Dt. 05
२०२६ / 2026
jagmitra2010@gmail.com

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ४ पाने Pages 4

३ किंमत रुपये Price 3 rupees

www.jagmitra.com

नांदेड / Nanded • वर्ष १ / Year 1 • अंक २८४ / Issue 284 • RNI.No.MAHMAR/2011/38814

जिल्हाधिकारी कार्यालयातील गौण खनिज विभागाच्या भ्रष्ट कारभाराचा पर्दाफाश होणार?

वाळू माफियांशी संगनमत करणाऱ्या कर्मचाऱ्याचे CCTV फुटेज देण्याचे राज्य माहिती आयुक्तांचे आदेश

नांदेड । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालयातील गौण खनिज विभागातून हदगाव तहसील कार्यालयात बदली झाल्यानंतरही वाळू माफियांशी आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी संबंधित विभागात तासनतास बसणाऱ्या व सध्या हदगाव मंडळ अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या विजय महाजन या कर्मचाऱ्याचे सीसीटीव्ही फुटेज आणि माहिती देण्यास टाळाटाळ करणाऱ्या माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांना राज्य माहिती आयुक्तांनी चांगलीच चपराक लगावली आहे. या प्रकरणात येत्या पंधरा दिवसात संबंधित माहिती द्यावी अन्यथा कारवाईस सामोरे जावे असेही मकरंद रानडे यांनी स्पष्ट केले आहे. अपिलार्थीने मागितलेले सीसीटीव्ही फुटेज देण्यास कोणतीही हरकत नसून सदर माहिती जनहिताची असल्याचा स्पष्ट निर्वाळा देत ती माहिती १५ दिवसांत देण्याचे आदेश छत्रपती संभाजीनगर खंडपीठाचे राज्य माहिती आयुक्त मकरंद रानडे यांनी २९ ऑक्टोबर रोजी दिले आहेत. या निर्णयामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात एकच खळबळ उडाली आहे. नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयातील गौण खनिज विभागातून हदगाव येथे बदली झाल्यानंतरही विजय महाजन हा कर्मचारी कोणताही रजेचा अर्ज न देता किंवा वरिष्ठांना न कळवता नांदेडच्या गौण खनिज विभागात तासनतास बसत होता. वाळू माफियांशी आर्थिक लाभापोटी चर्चा करण्यासाठी तो तिथे बसत असल्याचा संशय होता. त्या विभागाशी त्याचा कोणताही संबंध नसताना तो कोणाच्या सांगण्यावरून तिथे बसतो, याबाबतची माहिती आणि संबंधित काळातील सीसीटीव्ही फुटेज मिळावे, अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते शेख एजाज यांनी माहिती अधिकाराखाली केली होती.

मात्र, माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी संबंधित कर्मचाऱ्याला वाचविण्याच्या हेतूने माहिती देण्यास टाळाटाळ केली आणि जनहित साध्य होत नसल्याचे कारण देत अर्ज निकाली काढला. या गंभीर प्रकरणी अपिलार्थी शेख एजाज यांनी छत्रपती संभाजीनगर येथील राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. तब्बल एक वर्षानंतर सुनावणी होऊन राज्य माहिती आयुक्त प्रकाश इंदलकर आणि आता मकरंद रानडे यांनी मागितलेली माहिती ही जनहित साध्य करणारी असल्याचे आयोगाच्या निदर्शनास येत आहे, त्यामुळे सदर माहिती देण्यास हरकत नाही, असा शेरा मारत माहिती देण्याचे आदेश दिले.

माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी १५ दिवसांत सदर माहिती अपिलार्थीला द्यावी आणि तसा अहवाल आयोगाला कळवावा, असेही आदेशात म्हटले आहे. या आदेशामुळे नायब तहसीलदार आणि तहसीलदार (सर्वसाधारण) यांना चांगलीच चपराक बसली असून, दि. ५ जुलै २०२५ ते १५ जुलै २०२५ दरम्यानचे सीसीटीव्ही फुटेज आता कोणत्याही परिस्थितीत द्यावे लागणार आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणावर बंधनकारक असून, त्यानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. आदेशाचे पालन न केल्यास जन माहिती अधिकाऱ्याविरुद्ध अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल, तसेच जिल्हाधिकारी, नांदेड यांना आदेशाच्या अंमलबजावणीसाठी प्राधिकृत करण्यात आले आहे.

मुदखेड रेल्वे जंक्शनच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ४ वर सुविधांचा अभाव; रस्ते, पार्किंग, प्रकाश व्यवस्था अन् बंद तिकीट खिडकीकडे रेल्वे प्रशासनाचे दुर्लक्ष!

मुदखेड । प्रतिनिधी

दक्षिण मध्य रेल्वेच्या महत्त्वाच्या जंक्शनपैकी एक असलेल्या मुदखेड रेल्वे स्थानकावर सध्या कायाकल्प योजनेअंतर्गत विकासकामे सुरू आहेत. मात्र, याच स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ४ परिसरात प्रवाशांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांचा अभाव अद्याप कायम आहे. एकीकडे स्थानकाच्या विकासाची कामे सुरू असताना दुसरीकडे उत्तर दिशेकडील या भागातील प्रवाशांना साध्या सुविधांसाठीही संघर्ष करावा लागत असल्याने रेल्वे प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

प्लॅटफॉर्म क्रमांक ४ कडे जाणाऱ्या रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब असून, प्रवाशांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वाहनांसाठी पुरेशी



पार्किंग व्यवस्था उपलब्ध नाही. तसेच परिसरातील अनेक ठिकाणी पुरेशी प्रकाशव्यवस्था नसल्याने रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य निर्माण होते. परिणामी ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले तसेच सामानासह प्रवास करणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. अपुऱ्या प्रकाशव्यवस्थेमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या परिसरातील सर्वाधिक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे बंद असलेली रेल्वे तिकीट खिडकी. काही वर्षांपूर्वी उत्तर दिशेकडून येणाऱ्या प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी प्लॅटफॉर्म क्रमांक ४ च्या बाजूला तिकीट खिडकी सुरू करण्यात आली होती. मात्र, कालांतराने ही खिडकी बंद करण्यात आली. ही तिकीट खिडकी नेमकी कोणत्या कारणामुळे बंद करण्यात आली? ती पुन्हा सुरू करण्यासाठी कोणत्या अडचणी आहेत? तसेच ती सुरू करण्याबाबत रेल्वे प्रशासनाची भूमिका काय आहे? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. तिकीट खिडकी बंद असल्यामुळे या बाजूने येणाऱ्या प्रवाशांना तिकीट काढण्यासाठी स्थानकाच्या दुसऱ्या बाजूला जावे लागते. त्यामुळे विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अधिक त्रास सहन करावा लागत आहे. स्थानकाच्या एका बाजूला सुविधा उपलब्ध असताना दुसऱ्या बाजूला मात्र मूलभूत सोयीसुविधांचा अभाव का, असा रास्त सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

मुदखेड हे महत्त्वाचे रेल्वे जंक्शन असल्याने येथे दिवसरात्र रेल्वे गाड्यांची ये-जा सुरू असते. अशा महत्त्वाच्या स्थानकावर प्रवाशांना सुरक्षित रस्ते, पुरेशी प्रकाशव्यवस्था, वाहनांसाठी पार्किंग आणि सुलभ तिकीट सुविधा उपलब्ध असणे ही केवळ अपेक्षा नसून मूलभूत गरज आहे. विकासकामांच्या घोषणांबरोबरच प्रवाशांच्या दैनंदिन अडचणी दूर करण्यालाही रेल्वे प्रशासनाने प्राधान्य देणे आवश्यक आहे.

दरम्यान, रेल्वे प्रशासनाने या समस्यांची गांभीर्याने दखल घेऊन प्लॅटफॉर्म क्रमांक ४ परिसरातील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, पुरेशी प्रकाशव्यवस्था उभारावी, वाहनांसाठी नियोजनबद्ध पार्किंगची सुविधा उपलब्ध करून द्यावी आणि बंद असलेली तिकीट खिडकी पुन्हा सुरू करण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे. याशिवाय या परिसरातील प्रस्तावित विकासकामांचे नियोजन, सद्यस्थिती आणि कामे पूर्ण होण्याची संभाव्य कालमर्यादा याबाबत रेल्वे प्रशासनाने अधिकृत माहिती जाहीर करावी, अशीही अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

परभणी मनपाच्या आरोग्य समितीचे १९ विषय मंजूर; ६० बेडचे रुग्णालय सुरू करण्यावर भर

परभणी । प्रतिनिधी

परभणी शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय व आरोग्य सहाय्य समितीच्या बैठकीत शहरातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने १९ महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आले. आरोग्य सभापती डॉ. अबोली कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली ४ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता झालेल्या या बैठकीत ६० बेडचे रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी आवश्यक उपकरणांची खरेदी, आरोग्य केंद्रांची सुरक्षा, दुरुस्ती आणि महिलांच्या आरोग्यविषयक उपक्रमांवर भर देण्यात आला. बैठकीस आरोग्य अधिकारी डॉ. कल्पना सावंत, प्रभारी सचिव भगवान यादव, सहाय्यक आयुक्त गजानन जाधव, लेखा अधिकारी अमोल काठोके तसेच समितीचे सदस्य उपस्थित होते.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मंजूर नागरी सामुदायिक आरोग्य केंद्रातील ६० बेडचे रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी आवश्यक उपकरणे व साहित्य खरेदीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे (ओझऊ) सादर करण्यास मंजुरी देण्यात आली. मिलिंद घागरमाळे यांनी ठरावाला अनुमोदन दिले, तर डॉ. केदार खटींग यांनी



नागरिकांना रुग्णालयाची सुविधा लवकर उपलब्ध करून देण्याची मागणी केली. शहरातील सर्व आरोग्य संस्थांचे फायर ऑडिट करून आवश्यक अग्निसुरक्षा यंत्रणा बसविणे व दुरुस्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच कर्मचारी महिलांच्या आणि इमारतींच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याबाबत नदीम इनामदार यांनी मागणी केली. आरोग्य संस्थांची दुरुस्ती, पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवेल, पाइपलाइन आणि सांडपाणी व्यवस्थेची कामे करण्यासही मंजुरी देण्यात आली.

आरोग्य संस्थांच्या संरक्षणासाठी संरक्षक भिंत, गेट व बॅरिकेड्स उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. खानापूर, खंडोबा, रहमतनगर, इनायतनगर, साखला प्लॉट आणि दर्गा येथील सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर दिवसा सुरक्षा रक्षक व रात्री वॉचमन नियुक्त करण्यास मंजुरी देण्यात आली. ६० बेडच्या रुग्णालयासाठी मुख्य रस्ता, जन्म-मृत्यू विभागासाठी स्वतंत्र इमारत व गेट, तसेच डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांसाठी निवास व्यवस्था उभारण्याबाबत चर्चा झाली. निधीसाठी आयुक्त आरोग्य सेवा, महाराष्ट्र यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

महिलांसाठी आरोग्य तपासणी, जनजागृती आणि योगासन शिबिरे आयोजित करण्यास मंजुरी देण्यात आली. सर्व दवाखान्यांतील विद्युत दुरुस्तीची कामे तातडीने करण्याचे आदेशही देण्यात आले.शहरातील आरोग्य सुविधा, सुरक्षा आणि नागरिकांना दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी हे निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

नांदेडमधील आत्महत्या प्रकरणाचा तपास गुन्हे अन्वेषण विभागाकडे!

नांदेड । प्रतिनिधी

गर्भवती पत्नीचा खून करणाऱ्या आरोपीने नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्याच्या प्रसाधनगृहात (शौचालय) गळफास घेऊन आत्महत्या केल्यानंतर या प्रकरणाचा तपास त्वरेने राज्य गुन्हे अन्वेषण (सीआयडी) विभागाकडे देण्यात आला आहे. त्यानंतर या विभागाचे छत्रपती संभाजीनगर येथील पोलिस अधीक्षक यशवंत काळे तातडीने येथे दाखल झाले.

सोमवारी नांदेडमध्ये दोन वेगवेगळ्या घडामोडींमुळे पोलीस यंत्रणेतील बहुतांश अधिकारी त्यामध्ये गुंतले होते. नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका मंगल कार्यालयात मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या कार्यक्रमानिमित्त ग्रामीण पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी तेथील बंदोबस्तामध्ये असताना दुपारी सव्वाचारच्या सुमारास या पोलीस ठाण्याच्या परिसरातील जुन्या इमारतीतल्या शौचालयात सुशील महाजन हैबते (वय ३८) या आरोपीने गळफास घेतल्याची माहिती पो. नि. अशोक जाधव यांना प्राप्त झाली.

गुन्हे अन्वेषण विश् उखऊ महाराष्ट्र पोलीस या शौचालयातील खिडकीच्या गजास वायरची एक बाजू बांधून आरोपीने दुसरी बाजू गळ्याभोवती अडकवली. शौचालयातील बादली उलटी करून त्यावर तो उभा राहिला व नंतर त्याने बादली सरकावल्यामुळे फास आवळला गेला. त्यात तो मरण पावल्यामुळे एकच खळबळ उडाली.

शेतकऱ्यांनी ऑर्डर देऊन पाठ फिरवली; रायखोडचे रोपवाटिका चालक सुरेश बिल्लेवाड यांचे लाखोंचे नुकसान!

भोकर । एजास कुरेशी

भोकर तालुक्यातील रायखोड येथील तरुण किसान रोपवाटिका चालक सुरेश बिल्लेवाड शेकडो शेतकऱ्यांनी आगाऊ ऑर्डर देऊनही ऐनवेळी तयार रोपे न नेल्यामुळे प्रचंड आर्थिक संकटात सापडले आहेत. पावसाने मारलेली दडी आणि पाण्याअभावी हतबल झालेल्या शेतकऱ्यांनी रोपे नेण्यास असमर्थता दर्शवली आहे. परिणामी, सुरेश बिल्लेवाड यांच्या नर्सरीमधील भाजीपाला आणि फळबागांची लाखोंची दर्जेदार रोपे जागेवरच सुकली असून मातीमोल झाली आहेत.

लाखोंची रोपे जागेवरच खराब; नियोजन कोलमडले

सुरेश बिल्लेवाड यांनी परिसरातील शेतकऱ्यांच्या मागणीनुसार आणि त्यांनी दिलेल्या आगाऊ नोंदणी (ऑर्डर) नुसार मोठ्या आशेने नर्सरीमध्ये लाखो रुपये खर्चून रोपे तयार केली होती. टोमॅटो, मिरची, कोबी, वांगी यांसारख्या भाजीपाल्याच्या पिकांची आणि आंबा, पेरू, लिंबू अशा फळझाडांची लागवडीयोग्य उत्तम रोपे वेळेत तयार झाली होती. मात्र, पावसाअभावी विहिरी आणि बोअरवेल कोरड्या पडल्यामुळे शेतकऱ्यांपुढे पाण्याचे भीषण संकट उभे राहिले. स्वतःकडे पाणीच नसल्यामुळे शेतकऱ्यांनी आधी दिलेली ऑर्डर रद्द केली आणि नर्सरीतून रोपे नेण्यास नकार दिला. नर्सरीमध्ये तयार झालेली रोपे ठराविक दिवसांत शेतात न लावल्यास ती निकामी होतात. शेतकऱ्यांनी पाठ फिरवल्यामुळे सुरेश बिल्लेवाड यांच्या डोळ्यांदेखत ही लाखोंची कोवळी रोपे सुकून खराब झाली आहेत.

दुहेरी खर्चाचा फटका आणि भांडवल बुडाले

शेतकऱ्यांनी रोपे नेली नसली, तरी ती जिवंत ठेवण्यासाठी सुरेश बिल्लेवाड यांना टँकरने महागडे पाणी विकत घ्यावे लागले. रोपे वाचवण्याच्या धडपडीत देखभालीचा व पाण्याचा खर्च दुप्पट झाला, मात्र अखेर पाणीटंचाई आणि कोरड्या हवामानापुढे ही रोपे तग धरू शकली नाहीत. यामुळे बियाणे, खते, मजुरी आणि पाण्याचा खर्च असा एकूण लाखोंचा फटका सुरेश बिल्लेवाड यांना बसला असून त्यांचे मूळ भांडवलही पूर्णपणे बुडाले आहे.

बँकेच्या कर्जाचा बोजा; शासनाकडून तातडीच्या आर्थिक मदतीची अपेक्षा

बँकेकडून मोठे कर्ज काढून सुरेश बिल्लेवाड यांनी हा व्यवसाय उभा केला होता. या हंगामातील नफ्यातून कर्जाचे हप्ते फेडण्याचे त्यांचे नियोजन होते, परंतु ऑर्डर रद्द झाल्याने त्यांच्यावर कर्जाचा डोंगर तसाच राहिला आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे कृषीपूरक व्यवसाय करणारे तरुण पूर्णपणे उद्ध्वस्त झाले असून, आता शासनाकडूनच त्यांना मोठ्या मदतीची अपेक्षा आहे. शेतकऱ्यांनी विश्वासाने ऑर्डर दिली म्हणून आम्ही अहोरात्र कष्ट करून रोपे तयार केली. पण निसर्गाने घात केला. शेतकरी तरी कुठून पैसे आणि पाणी आणणार? अशा कठीण परिस्थितीत शासनाने केवळ कोरडवाहू दुष्काळाचे जाहीर वाचन न करता, आमच्यासारख्या नर्सरी चालकांचे झालेले नुकसान लक्षात घेऊन तातडीने विशेष आर्थिक पॅकेज किंवा नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी आर्त हाक सुरेश बिल्लेवाड यांनी प्रशासनाला दिली आहे. या गंभीर आर्थिक संकटातून सावरण्यासाठी सरकारने बँकांच्या कर्जाला स्थगिती देऊन व्याजमाफी द्यावी आणि महसूल विभागाने तातडीने प्रत्यक्ष जागेवर येऊन पंचनामे करावेत, अशी तीव्र मागणी रायखोड परिसरातील सुजाण नागरिकांमधून व शेतकरी वर्गातून केली जात आहे.

कुंडलवाडी पोलिसांची फायरिंगमध्ये बाजी: शिंदे प्रथम, मांजरमकर द्वितीय

कुंडलवाडी । प्रतिनिधी

नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या वतीने आयोजित फायरिंग



प्रशिक्षणात कुंडलवाडी पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्याने दमदार कामगिरी केली आहे. ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी अचूक नेमबाजी करत प्रथम क्रमांक पटकावला, तर याच ठाण्यातील पोलीस उप निरीक्षक गजेंद्र मांजरमकर यांनी द्वितीय क्रमांक पटकावत कुंडलवाडीचे नाव उंचावले.


पोलीस मुख्यालय, नांदेड येथे दि.३० व ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी फायरिंग प्रशिक्षण सत्र क्र.५४ आयोजित करण्यात आले होते. यात पोलीस अधिकारी गटात सपोनि शिंदे यांनी प्रथम क्रमांक मिळवला. तर दि.०२ व ०३ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित फायरिंग प्रशिक्षण सत्र क्र.५५ मध्ये गजेंद्र मांजरमकर यांनी पोलीस अधिकारी गटात द्वितीय क्रमांक मिळवला. या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहण (भा.पो.से.) यांनी दोघांनाही प्रशस्तीपत्र देऊन गौरविले आहे. या यशाबद्दल कुंडलवाडी शहर व परिसरातून सपोनि शिंदे व पो उपनि मांजरमकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पालकमंत्री अतुल सावे यांचा दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी एक कोटींचा मदतनिधी

नांदेड । प्रतिनिधी

राज्यातील दुष्काळी परिस्थितीची जाणीव ठेवून नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी आपल्या चिरंजीवाच्या विवाहावरील खर्च टाळून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीत एक कोटी रुपयांची देणगी दिली आहे. या रकमेचा धनादेश त्यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी मंत्री सावे यांचे आभार मानले.

मंत्री अतुल सावे यांचे धाकटे चिरंजीव तथा उद्योजक अनुराग सावे यांचा विवाह छत्रपती संभाजीनगर येथील उद्योजक अजित मुळे यांची कन्या ईशा यांच्याशी दि.२५ नोव्हेंबर रोजी नियोजित आहे.



मात्र, सध्या महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट असून विशेषतः मराठवाड्यातील शेतकरी शेतीच्या नुकसानीमुळे कठीण परिस्थितीचा सामना करीत आहेत. अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर विवाह सोहळा साजरा करणे उचित नसल्याची भूमिका दोन्ही परिवारांनी घेतली. विवाह सोहळ्यासाठी नियोजित असलेला खर्च टाळून ही रक्कम शेतकऱ्यांच्या मदतीसाठी देण्याचा संवेदनशील निर्णय त्यांनी घेतला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासन शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी विविध उपाययोजना राबवत आहे. या प्रयत्नांना हातभार लावण्याच्या भावनेतून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ही एक कोटी रुपयांची देणगी समर्पित करण्यात आली आहे. यावेळी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

दिवाळीचा आनंद लुटा, पण घराच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष नको!

नांदेड पोलीसांनी दिल्या महत्त्वाची सूचना; घरफोडी रोखण्यासाठी पोलीस अधीक्षक, नांदेड यांचे नागरिकांना आवाहन

नांदेड । प्रतिनिधी

दिवाळी सणानिमित्त आणि शाळांच्या सुट्ट्यांमुळे अनेक नागरिक आपल्या कुटुंबासह मूळ गावी किंवा पर्यटनासाठी बाहेरगावी जातात. या काळात बंद घरांची रेकी करून चोरट्यांकडून घरफोडी आणि चोरीचे प्रकार घडण्याची शक्यता असते. नागरिकांचा दिवाळीचा आनंद अबाधित राहावा आणि त्यांच्या मालमत्तेचे रक्षण व्हावे, या उद्देशाने नांदेड जिल्हा पोलीस दलातर्फे विशेष गस्त वाढवण्यात आली असून, नागरिकांनीही स्वतःच्या घराच्या सुरक्षिततेसाठी सतर्क राहावे, असे आवाहन डॉ. नीलाभ रोहन, पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्यावतीने करण्यात आले आहे.

सुट्टीच्या काळात बंद घरे हे चोरट्यांचे मुख्य लक्ष्य असतात. अनेकदा घराबाहेर साचलेली वर्तमानपत्रे, कुलूप दिसणारे दरवाजे किंवा सोशल मीडियावर टाकलेले प्रवासाचे फोटो यावरून चोरट्यांना घर बंद असल्याची माहिती मिळते. अशा घटना टाळण्यासाठी नागरिकांनी खालील सुरक्षा उपायांचा अवलंब करणे गरजेचे आहे.१) मौल्यवान वस्तू बँक लॉकरमध्ये ठेवा:- गावी जाताना घरातील सोन्या-चांदीचे दागिने आणि मोठी रोख रक्कम घरात न ठेवता बँकेच्या लॉकरमध्ये किंवा सुरक्षित ठिकाणी ठेवावी.

२) कुलूप दिसणार नाही याची काळजी घ्या: दरवाजाला बाहेरून कुलूप लावल्यास घर बंद असल्याचे लगेच लक्षात येते. त्यामुळे मजबूत सेंट्रल लॉक किंवा इंटरलॉक सिस्टीमचा वापर करावा, अथवा कुलपावर पडदा राहील अशी व्यवस्था करावी. ३) शेजारी आणि पोलिसांना कल्पना द्या: बाहेरगावी जाताना आपल्या विश्वासू शेजाऱ्यांना, सोसायटीच्या वॉचमनला आणि जवळच्या पोलीस ठाण्यात किंवा बीट मार्शलला आपल्या प्रवासाची माहिती द्यावी, जेणेकरून त्या भागात पोलिसांची विशेष गस्त ठेवता येईल. ४) घरातील दिवे आणि वर्तमानपत्रे: रात्रीच्या वेळी घर पूर्णपणे अंधारात ठेवू नये. रात्री घरात पूर्ण अंधार ठेवू नका, हॉल किंवा पोर्चमधील एक दिवा सुरू ठेवा तसेच घराच्या बाहेर रात्रीच्या वेळी पुर्ण प्रकाश राहिल, याची दक्षता घ्यावी तसेच, गावी जाण्यापूर्वी दूध आणि वर्तमानपत्र टाकणाऱ्याला वितरण बंद करण्यास सांगावे, जेणेकरून दरवाजाबाहेर वस्तू साचून घर बंद असल्याचा संशय येणार नाही. ५) सोशल मीडियावर माहिती टाकणे टाळा: आपण कुटुंबासह बाहेरगावी गेलो आहोत, याचे फोटो, 'चेक-इन' किंवा स्टेटस घरी परत येईपर्यंत सोशल मीडियावर शेअर करू नयेत.

६) सीसीटीव्ही आणि अलार्म सिस्टीम: घराबाहेर व सोसायटीच्या परिसरात लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे सुस्थितीत व सुरू असल्याची खात्री करावी. त्याचा एक्सेस स्वतःच्या मोबाईलवर ठेवावा. ७) अनोळखी व्यक्तींवर नजर ठेवा: आपल्या कॉलनीत किंवा अपार्टमेंटमध्ये दिवसा विनाकारण फिरणारे अनोळखी लोक, फेरीवाले किंवा संशयास्पद व्यक्ती आढळल्यास तात्काळ पोलिसांना कळवावे. नांदेड जिल्हा पोलीस दल नागरिकांच्या सुरक्षेसाठी २४ तास सज्ज असून, रात्रीची गस्त आणि नाकाबंदी अधिक कडक करण्यात आली आहे. तरी नागरिकांनीही या सूचनांचे पालन करून पोलिसांना सहकार्य करावे. कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ डायल ११२ किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. नीलाभ रोहन, पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्यातर्फे करण्यात येत आहे.

दैनिक जगमित्र कार्यालय, ९-२-३४६, बिलाल नगर, दैगलूर नाका, इतवारा, नांदेड

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

शेख मौला शेख उस्मान (नांदेड जिल्हा प्रतिनिधी)
मो.9766664949 PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — गुरुवार दि.०५ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ४

सासरी अपमानाने व्यथित तरुणाने संपवले जीवन; पत्नी, सासू-सासऱ्यांसह चौघांवर गुन्हा

उमरखेड । प्रतिनिधी

पत्नी, सासू-सासरे आणि पत्नीच्या कथित प्रियकराकडून होत असलेल्या मानसिक छळाला कंटाळून २४ वर्षीय विवाहित तरुणाने गळफास घेऊन आपले जीवन संपवलले. उमरखेड तालुक्यातील धानोरा (साचलदेव) येथे ही घटना घडली.

जीवन संपवण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत सासरी अपमान व छळाचे आरोप केल्याच्या तक्रारीवरून उमरखेड पोलिसांनी पत्नी, सासू-सासरे आणि अन्य एका व्यक्तीविरुद्ध जीवन संपवण्यास प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

गजानन दत्ता पुरी असे मृत तरुणाचे नाव आहे. त्याचे सुमारे दोन वर्षांपूर्वी नांदेड जिल्ह्यातील कृष्णूर येथील ऐश्वर्या हिच्याशी लग्न झाले होते. लग्नानंतर पती-पत्नीत किरकोळ कारणांवरून वाद होत असल्याचे आणि पत्नीला माहेरून आणण्यासाठी गेलेल्या गजाननचा अपमान करून तिला परत पाठविले जात असल्याचे तक्रारीत नमूद आहे. पत्नी माहेरी गेल्यानंतरही गजाननला मानसिक त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पत्नी चार महिन्यांची गर्भवती असताना तिला दवाखान्यात नेण्यासाठी गजानन कृष्णूर येथे गेला होता. तेथून परतल्यानंतर १ नोव्हेंबर रोजी झालेल्या कौटुंबिक वादानंतर त्याने पत्नीच्या कथित अपमानास्पद वागणुकीबाबतची माहिती आई-वडिलांना दिली. पत्नी व सासरच्या मंडळींकडून मानसिक छळ आणि अपमान होत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या त्रासाला कंटाळून गजानने १ नोव्हेंबरच्या रात्री गळफास घेतला. दुसऱ्या दिवशी सकाळी साडेसातच्या सुमारास आईने त्याला उठविण्याचा प्रयत्न केला; मात्र प्रतिसाद मिळाला नाही. दरवाजा उघडून पाहिले असता, तो घरातील पंख्याच्या लोखंडी रॉडला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. शेजाऱ्यांच्या मदतीने त्याला खाली उतरविण्यात आले.

गजानने लिहिलेल्या चिठ्ठीत पत्नीच्या त्रासाचा उल्लेख असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी उमरखेड पोलिसांनी पत्नी ऐश्वर्या पुरी, सासू सुमन अशोक गिरी, सासरे अशोक काशिनाथ गिरी आणि मारोती जाधव यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८ व ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास उमरखेड पोलीस करीत आहेत.

गाळाने घटली नागझरी जलाशयाची क्षमता; पाण्याचा अपव्यय सुरूच!

किनवट । प्रतिनिधी

शहराच्या पाणीपुरवठ्यासह पुरवठ्यासह परिसरातील शेतीच्या सिंचनासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या नागझरी मध्यम प्रकल्पातील जलसाठ्याची क्षमता गाळ साचल्याने वर्षागणिक घटत असताना, दुसरीकडे सांडव्यातील भगदाडांतून पाण्याचा सतत विसर्ग होत असल्याची स्थिती आहे. जलाशयाच्या भिंतीवरील झाडाझुडपांच्या मुळांमुळे बांधकामाला धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत असून, या प्रकल्पाची तातडीने दुरुस्ती, गाळमुक्ती आणि कालव्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

१९७२ च्या भीषण दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर नागझरी जलाशयाची उभारणी करण्यात आली. साधारणतः १९८३ मध्ये प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर परिसरातील शेतीला सिंचनासाठी पाणी उपलब्ध होऊ लागले. मात्र, गेल्या चार दशकांहून अधिक काळात जलाशयातील गाळ काढण्याचे काम झाले नसल्याने पावसाळ्यात वाहून येणारा गाळ साठत गेला. परिणामी, मूळ जलसाठवण क्षमतेवर परिणाम होऊन सिंचनासाठी उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे प्रमाणही कमी होत असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे.

त्यातच जलाशयाच्या आतील भिंतीवर आणि सांडव्याच्या परिसरात मोठ्या प्रमाणात झाडेझुडपे वाढली आहेत. त्यांच्या मुळांमुळे बांधकामाच्या ठिकाणी पोकळ्या व भगदाडे निर्माण झाल्याचे दिसत असून, त्यातून पाणी बाहेर पडत आहे.

सध्या सुरू असलेला हा विसर्ग केवळ पाण्याचा अपव्यय करणारा नसून, भगदाडांचा आकार वाढल्यास विशेष म्हणजे, किनवट शहराच्या सुमारे २८ हजार लोकसंख्येच्या पाणीपुरवठ्याची भिस्तही याच जलाशयावर आहे. शहराचा विस्तार आणि लोकसंख्येतील वाढ लक्षात घेता भविष्यातील पाण्याची गरज भागविण्यासाठी उपलब्ध जलसाठ्याचे योग्य व्यवस्थापन आवश्यक आहे. त्यामुळे नागझरी जलाशयाच्या सद्यस्थितीची तांत्रिक तपासणी करून गाळमुक्ती, सांडव्याची दुरुस्ती, जलसाठवण क्षमता वाढविणे आणि कालव्यांचे काँक्रिटीकरण यासाठी जलसंपदा विभागाने कालबद्ध कृती आराखडा तयार करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

जलाशयाच्या संरचनेच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे संबंधित यंत्रणेने तातडीने तांत्रिक पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. जलाशयातील पाण्याच्या अपव्ययाबरोबरच सिंचनासाठीच्या कालव्यांची अवस्थाही चिंताजनक असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. कालव्यांमध्ये गाळ साचल्याने पाणीवहन क्षमतेवर मर्यादा येत आहेत. शिवाय कच्च्या कालव्यांतून पाणी जमिनीत मुरत असल्याने शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचण्यात अडचणी येतात.

त्यामुळे कालव्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण केल्यास पाण्याची गळती रोखण्यासह सिंचन क्षेत्र वाढविण्यास मदत होऊ शकते. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून नागझरी जलाशयातील गाळ काढण्याची कामे हाती घेणे शक्य आहे. त्यातून स्थानिक मजुरांना रोजगार मिळण्याबरोबरच जलसाठवण क्षमता वाढविण्याची संधी उपलब्ध होऊ शकते. जलाशयाची आणि सांडव्याची उंची वाढविण्याच्या मागणीचाही तांत्रिक व व्यवहार्यतेच्या दृष्टीने विचार करण्याची गरज आहे.



मुख्याध्यापक गणेश सोनवणे यांना स्वाभिमानी लेखनीचा गौरव पुरस्काराने सन्मानित

उस्माननगर । प्रतिनिधी

स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य संचलित स्वाभिमानी लेखणीचा गौरव पुरस्कार वितरण समारंभ २०२५-२०२६ चा पहिलाच भव्यदिव्य स्वरूपातील पुरस्कार दि.३१ ऑक्टोबर २०२६ रोज पुणे येथील मराठा चेंबर ऑफ कॉमर्स हॉल स्वारगेट पुणे येथे स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य संचलित व महाराष्ट्रातील अग्रगण्य आणि नाव लौकिक आसलेले दै.चालु वार्ता परिवाराकडून पुरस्कार शांत व मित्तभाषी, विद्यार्थी प्रेमी व विद्यार्थ्यां विषयी तळमळ असणारे आणि शिक्षकांचा व्यवसाय नसून धर्म आहे हे ब्रीदवाक्य समजून संपूर्ण आयुष्य शिक्षकी धर्माशी एकनिष्ठ राहून सेवा करणारे, विद्यार्थी व पालकांशी मैत्री जुळवून, विद्यादानाचे पवित्र कार्य चालू ठेवणारे समता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय उस्माननगर (मोठीलाठी) ता.कंधार येथील मुख्याध्यापक गणेश रंगनाथराव सोनवणे यांच्या २०२५ - २०२६ मध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांच्या कार्याची दखल घेऊन स्वाभिमानी लेखणीचा गौरव हा पुरस्कार समितीचे मुख्य आयोजक तथा स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य व दै.चालु वार्ताचे मुख्य संपादक डी.एस. लोखंडे पाटील यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले.



उस्माननगर येथील समता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथील मुख्याध्यापक गणेश सोनवणे हे १९९३ पासून या शाळेत शिक्षक म्हणून रूजू झाले आहेत. ते ३० वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या सहवासात आहेत. त्याच्या आवडीचे गणित हे विषय आहे. त्यांच्या गणित विषयात अनेक विद्यार्थ्यीं मोठ्या पदावर गेले आहेत. यासाठीच पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार लक्ष्मण हाके (ओबीसी नेते महाराष्ट्र), नामदेवराव जाधव (लेखक व्याख्याते आणि प्रेरक वक्ता (महाराष्ट्र राज्य), दै.चालु वार्ताचे मुख्य संपादक डी.एस. लोखंडे पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत मुख्याध्यापक गणेश रंगनाथराव सोनवणे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल शामसुंदर जहागीरदार गुरूजी (माजी मुख्याध्यापक) पुरूषोत्तमराव देशपाडे, बालमुकुंद कुलकर्णी, तु.शं.वारकड गुरूजी, प्रदिप देशमुख, अनिरूद्ध सिरसाळकर यांच्यासह राजीव अंबेकर (पर्यवेक्षक), प्रशांत पवनेकर, परशुराम लामदाडे, साहेबराव राठोड, गणेश बोगेवार, लक्ष्मण सुरकुतवेलू, बाजीराव पाटील, मन्मथ डांगे, सौ.गौतमी कुलकर्णी, सौ.वर्षा देशमुख, नवसागरे बालाजी, तुंबरफळे यु.बी., अमीलकंठवार जी.जे., कटकमवार ए.एस., काळम पी.डी., पाटील संजयश्री, प्रतिक देशमुख, शिवचंद्र वारकड, जहागीरदार, संतोष सोनटक्के व बालाजी भिसे, रामराव पवार, मारोती गोरे, कचरू मुंगल हे शाळेतील कर्मचारी व संस्थेतील पदाधिकिरी यांनी व गावातील प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार व नातेवाईक, मित्र परिवार यांच्यासह अनेकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा व अभिनंदन केले आहे.

परभणी मनपा वर्धापन दिनानिमित्त महिला कर्मचाऱ्यांसाठी 'होम मिनिस्टर'चा रंगतदार सोहळा

परभणी । प्रतिनिधी

परभणी शहर महानगरपालिकेच्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त महिला कर्मचारी आणि अधिकारी यांच्यासाठी आयोजित करण्यात आलेला 'होम मिनिस्टर' हा मनोरंजक कार्यक्रम उत्साहात पार पडला. मंगळवारी (दि.३ नोव्हेंबर) सायंकाळी ४ वाजता बी. रघुनाथ सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात महिला कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आनंदाचा माहोल निर्माण केला. विविध खेळ, मनोरंजन आणि पैठणीच्या बक्षिसांमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.



या कार्यक्रमाचे उद्घाटन महिला व बालकल्याण सभापती सौ. अश्विनी अमोल जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मनपा आरोग्य अधिकारी डॉ. कल्पना सावंत, सहायक आयुक्त गजानन जाधव आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख राजकुमार जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांसाठी आयोजित या कार्यक्रमात सहभागी महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. वर्धापन दिनाच्या निमित्ताने कामाच्या धावपळीतून विरंगुळा मिळावा, महिला कर्मचाऱ्यांमध्ये संवाद आणि आनंदाचे वातावरण निर्माण व्हावे, या उद्देशाने 'होम मिनिस्टर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमातील विविध उपक्रमांमुळे सभागृहात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. कार्यक्रमात विजेत्या महिलांसाठी महानगरपालिकेच्या वतीने मानाच्या पैठणीचे बक्षीस ठेवण्यात आले होते. पहिल्या क्रमांकाची मानाची पैठणी सौ. सूर्यकांता तिडके यांनी पटकावली. द्वितीय क्रमांकाची पैठणी राणी गौतम भालेराव यांना, तर तृतीय क्रमांकाची पैठणी शिलाताई भदर्गे यांना मिळाली. उत्तेजनार्थ बक्षिसांमध्ये ज्योती मोरे आणि त्रितीया देशमुख यांनी बाजी मारली.

विजेत्या महिलांना महिला व बालकल्याण सभापती सौ. अश्विनी जाधव, आरोग्य अधिकारी डॉ. कल्पना सावंत, सहायक आयुक्त गजानन जाधव आणि आस्थापना विभागाच्या मंगल धस यांच्या हस्ते पैठण्या प्रदान करून सन्मानित करण्यात आले. बक्षीस वितरणावेळी विजेत्या महिलांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख राजकुमार जाधव, कैलास काकडे, चंद्रकांत पुंडगे आणि सय्यद सादेक यांनी विशेष परिश्रम घेतले. महिला कर्मचाऱ्यांच्या सहभागामुळे आणि आयोजकांच्या नियोजनामुळे महानगरपालिकेचा १५ वा वर्धापन दिन आनंददायी वातावरणात साजरा झाला.

परभणीत ६ नोव्हेंबर रोजी स्वरमय दिवाळी पहाट सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

परभणी । प्रतिनिधी

दिवाळीच्या सणानिमित्त परभणी शहर महानगरपालिकेच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने दिवाळी सांज आणि दिवाळी पहाट या दोन सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता स्थानिक कलावंतांचा दिवाळी सांज कार्यक्रम, तर शुक्रवार, ६ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता 'बाबुजी आणि मी' या संकल्पनेवर आधारित श्रीधर सुधीर फडके यांचा स्वरमय दिवाळी पहाट कार्यक्रम राजगोपालचारी उद्यान येथे होणार आहे.



या कार्यक्रमांना महापौर सय्यद इकबाल, उपमहापौर गणेश देशमुख, महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर, उपआयुक्त प्रज्ञावंत कांबळे, तुकाराम कदम, स्थायी समिती सभापती प्रतिभाताई अतुल सरोदे आणि सभागृह नेते सय्यद समी उर्फ माजुलाला यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. गुरुवार, ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित दिवाळी सांज कार्यक्रमात परभणीतील स्थानिक कलावंत आपली कला सादर करणार आहेत. यामध्ये अमजद खान, राहुल वहिवाळ, अनिकेत सराफ, ओवी राजू काजे, मिलिंद जोशी, प्राचार्य नितीन लोहट, शुभम मस्के, धीरज पोळ, अनुष्का शहाणे, राजेश शाह, प्रा. कृष्णराज लव्हेकर, सौ. रुपाली लव्हेकर आणि योगेश पेडगावकर यांचा सहभाग राहणार आहे.

शुक्रवार, ६ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता 'बाबुजी आणि मी' या स्वरमय दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सुप्रसिद्ध गायक श्रीधर सुधीर फडके, गायिका शेफाली कुलकर्णी साकुरीकर आणि आसावरी बोधनकर यांच्यासह तबलावादक तुषार आग्रे, बासरीवादक आदित्य गोगटे, तालवाद्य कलाकार नीलेश पाठक आणि निवेदिका सुकन्या जोशी यांची उपस्थिती राहणार आहे.

याशिवाय प्रभाग समिती सभापती रईस खान, मुसद्दीक खान, तबस्सुम वसीम शेख, समाजकल्याण समिती सभापती राजेश रणखांबे, महिला व बालकल्याण समिती सभापती अश्विनी अमोल जाधव, बांधकाम समिती सभापती सायरा बेगम अलीमोहीन, आरोग्य समिती सभापती अबोली कांबळे, विधी व अर्थ समिती सभापती रुखसाना बेगम हमीद जहागीरदार, शहर सुधार समिती सभापती शुभांगी शुभम पाष्टे आणि शिक्षण समिती सभापती शमशाद बेगम सय्यद इलाही उपस्थित राहणार आहेत. या दोन्ही सांस्कृतिक कार्यक्रमांचा परभणीकरांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर सय्यद इकबाल, उपमहापौर गणेश देशमुख, आयुक्त नितीन नार्वेकर, स्थायी समिती सभापती प्रतिभाताई अतुल सरोदे आणि उपआयुक्त प्रज्ञावंत कांबळे व तुकाराम कदम यांनी केले आहे.

आयडॉल शिक्षिका श्रीमती आर.एस. गायकवाड यांचा सत्कार

कुंडलवाडी । प्रतिनिधी

बिलोली तालुक्यातील अर्जापूर येथील जि. प. प्राथमिक शाळेच्या उपक्रमशील शिक्षिका तथा मुख्याध्यापीका श्रीमती रत्नमाला गायकवाड यांची शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणेतर्फे 'आयडॉल शिक्षक' म्हणून निवड झाली. याबद्दल शाळेच्यावतीने छोटेखानी कार्यक्रम घेवून त्यांचा यथोचित सन्मान सत्कार करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख काळे जे.एस, माजी मुख्याध्यापक शेख सलीम सर यांनी आपले विचार मांडणार. श्रीमती गायकवाड यांच्या आयडॉल शिक्षिका श्रीमती आर.एस. गायकवाड यांनी आपल्या शैक्षणिक कार्यात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, नवनवीन उपक्रम आणि गुणवत्तावाढीसाठीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे त्यांनी शाळेची वेगळी ओळख निर्माण केली आहे. या शाळेने 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' स्पर्धेत तालुका पातळीवर दुसरा क्रमांक पटकावला होता. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक सुरेश दुगमोड सर, कोपीरगेवार सर, मोहम्मद सर परिश्रम घेतले. यावेळी मोठ्याप्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.



जाहिर प्रगटन

मौजे बेंद्री, ता. भोकर, जि. नांदेड येथील गट क्र. १५८, १६०, १६१, १६२, १६३, १६४ व १६५ मधील शेतजमीन खरेदी-विक्री व्यवहाराबाबत सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकार तनिष्क स्टील्स लि. कंपनी पत्ता: प्लॉट नं: ७०, सौजन्य कॉलनी, न्यू बोवनपल्ली, सिकंदराबाद तेलंगणा राज्य-५०००११ हे

१. **मौजे बेंद्री, ता. भोकर, जि. नांदेड येथील गट क्र. १५८ मधील**
अ. शेषराव मोतीराम राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०० हे. १९ गुंठे
आ. कलावतीबाई शेषराव राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०१ हे. २२ गुंठे
इ. मिराबाई दशरथ राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०० हे. ८१ गुंठे
ई. अकोश शेषराव राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०१ हे. ०० गुंठे
उ. बालाजी शेषराव राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०१ हे. ०० गुंठे

२. **मौजे बेंद्री, ता. भोकर, जि. नांदेड येथील गट क्र. १६० मधील**
अ. पारूबाई दशरथ राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०० हे. ६० गुंठे
आ. सुखदेव प्रेमसिंग राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०० हे. ६१ गुंठे
इ. कैलास लच्छीराम जाधव यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०० हे. ७८ गुंठे
ई. श्रीनिवास लचिराम जाधव यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०१ हे. १९ गुंठे
उ. लताताई प्रल्हाद राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०० हे. ४० गुंठे

३. **मौजे बेंद्री, ता. भोकर, जि. नांदेड येथील गट क्र. १६१ मधील**
अ. विमुताई गजानन राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०० हे. ८८ गुंठे
आ. गजानन मोतीराम राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०० हे. ६६ गुंठे
इ. शामराव हरीलाल राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०० हे. ६६ गुंठे
ई. शेषराव मोतीराम राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०० हे. ९१ गुंठे
उ. सकूबाई गोविंद राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०१ हे. ५४ गुंठे
ऊ. संगीताबाई भगवान राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०१ हे. ०० गुंठे
ऋ. सुमनबाई पुंडलीक राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०० हे. ७० गुंठे
. धिरज भगवान राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०० हे. ९१ गुंठे
ऍं. सहदेव दशरथ राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०० हे. ७० गुंठे

४. **मौजे बेंद्री, ता. भोकर, जि. नांदेड येथील गट क्र. १६२ मधील**
अ. गोविंद तुळसिराम जाधव यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०२ हे. ०० गुंठे
आ. गोविंद तुळसिराम जाधव, बालाजी तुळसिराम जाधव, रुखमाबाई तुळसिराम जाधव व आनंदराव तुळसिराम जाधव यांच्या नावे असलेली सामाईक शेतजमीन क्षेत्र. ०१ हे. ०३ गुंठे.
इ. मीराबाई आनंद जाधव यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०० हे. ४० गुंठे
ई. सामकाबाई गोविंद जाधव यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०० हे. ९० गुंठे
उ. आनंदराव तुळसिराम जाधव यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०२ हे. ०० गुंठे

५. **मौजे बेंद्री, ता. भोकर, जि. नांदेड येथील गट क्र. १६३ मधील**
अ. साईनाथ पुंडलीक जाधव यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०१ हे. ३१ गुंठे
आ. नंदू गणपत जाधव यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०१ हे. ३१ गुंठे
इ. निर्मलाबाई शंकर जाधव यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०१ हे. ५३ गुंठे
ई. शांताबाई विठ्ठल जाधव यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०१ हे. १० गुंठे

६. **मौजे बेंद्री, ता. भोकर, जि. नांदेड येथील गट क्र. १६४ मधील**
अ. विठ्ठल गणपत जाधव यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०१ हे. ६९ गुंठे
आ. शंकर गणपत जाधव यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०१ हे. ६२ गुंठे
इ. बालाजी तुळसीराम जाधव यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०२ हे. ०० गुंठे
ई. एकनाथ पुंडलीक जाधव यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०० हे. ८० गुंठे

७. **मौजे बेंद्री, ता. भोकर, जि. नांदेड येथील गट क्र. १६४ मधील**
अ. विमुताई गजानन राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०० हे. ७२ गुंठे
आ. दशरथ मोतीराम राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०१ हे. ७५ गुंठे
इ. शामराव हरीलाल राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०० हे. ५६ गुंठे
ई. भगवान मोतीराम राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०१ हे. ७३ गुंठे
उ. सुमनबाई पुंडलीक राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०० हे. ६० गुंठे
अ. दिपक गजानन राठोड यांच्या नावे असलेली शेतजमीन क्षेत्र. ०१ हे. ४० गुंठे.

यांच्याकडुन कायमस्वरूपी खरेदी करण्याचा करार केला असून; मोबदला रक्कम खरेदीखताच्या वेळी देण्याचे ठरलेले आहे. तसेच सदर व्यक्तींनी माझ्या पक्षकारास असा विश्वास दाखवीला आहे की, सदरील शेतजमीनी ह्या निर्विवाद व बोजारहित आहेत. म्हणून माझे पक्षकार या जाहिर प्रगटनाव्दारे जाहिर आव्हान करतात की, सदर शेतजमीनींवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व संबंध असल्यास व तसेच पतसंस्था, सहकारी संस्था, राष्ट्रीयकृत बँक, खाजगी बँक, सावकार इत्यादी यांचे सदरील विक्री शेतजमीनींवर कर्जबोजा, गहाण, तारण, बक्षीस, न्यायालयीन कार्यवाही किंवा कोणत्याही प्रकारे हक्क व संबंध असल्यास त्यांनी सर्व मुळ कागदपत्रासह माझे कार्यालयात आपला लेखी आक्षेप सदरील जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात (०७) दिवसाच्या आत त्या आक्षेपास धरून सिध्द करावा, मुदतीमध्ये कोणताही आक्षेप प्राप्त न झाल्यास माझे पक्षकार असे ग्रहीत धरतील की, सदरील विक्री करार शेतजमीनी ह्या निर्विवाद व बोजारहित आहेत. सदरील मुदतीनंतर माझे पक्षकार विक्री करार शेतजमीनींची नोंदणीकृत खरेदीखताची कार्यवाही पुर्ण करतील. नंतर येणारे आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

जाहिर प्रगटन देणार
ॲड. मोहम्मद सलीमोद्दीन अलीमोद्दीन
कार्यालयीन पत्ता:- तहसील कार्यालयाजवळ, भोकर, ता. भोकर, जि. नांदेड-४३१८०१.
मो.क्र. ९९७०६१६६६७.

भोकर येथील आरोग्य उपकेंद्राची इमारत २-३ वर्षांपासून उद्घाटनाच्या प्रतीक्षेत; परिचारक नसल्याने अस्वच्छता, वीजपुरवठ्याअभावी सर्वत्र अंधार

भोकर । एजास कुरेशी

भोकर तालुक्यातील डौर येथील आरोग्य उपकेंद्राची नूतन इमारत बांधून पूर्ण झाली असली, तरी गेल्या दोन ते तीन वर्षांपासून ती उद्घाटनाअभावी धूळ खात पडून आहे. प्रशासनाच्या या उदासीनतेमुळे स्थानिक नागरिकांना आरोग्य सुविधांपासून वंचित राहावे लागत असून, त्यांचे अतोनात हाल होत आहेत. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी भोकर कृ.उ.बा.चे संचालक इंजि विश्वाभंर पवार यांच्या उपस्तिथीत युवासेना भोकर तालुका अध्यक्ष दर्शन पाटील डुरे यांनी राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांना थेट निवेदन देऊन उपकेंद्र तात्काळ सुरू करण्याची मागणी केली.

लोकांचे अतोनात हाल; परिचारक नसल्याने अस्वच्छता आणि सर्वत्र अंधार!



डौर आणि परिसरातील ग्रामस्थांना छोट्या-मोठ्या उपचारांसाठी आणि वैद्यकीय मदतीसाठी मैलोन्मैल पायपीट करावी लागत आहे. गावात आरोग्य उपकेंद्राची हक्काची इमारत उभी असूनही, केवळ अधिकृत शुभारंभ न झाल्याने ती कुलूपबंद आहे. देखभालीसाठी परिचारक व संबंधित कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्याने या नूतन इमारतीच्या परिसरात मोठ्या प्रमाणात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. त्यातच वीजपुरवठाही खंडित असल्याने संध्याकाळच्या वेळी संपूर्ण आरोग्य केंद्र परिसरात कमालीचा अंधार दाटून राहतो. २-३ वर्षांचा प्रदीर्घ काळ उलटूनही स्थानिक प्रशासनाने या दुरवस्थेकडे गांभीर्याने पाहिले नसल्याने आता नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

लोकार्पण झाले नसले तरी १३ सुविधा देत आहोत; संबंधितांचा दावा

एकीकडे ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधींकडून उपकेंद्र बंद असल्याचा आरोप होत असताना, दुसरीकडे इमारतीचे अधिकृत लोकार्पण (उद्घाटन) झाले नसले तरीही आम्ही स्थानिक नागरिकांना प्राथमिक स्तरावरील १३ प्रकारच्या आरोग्य सुविधा पुरवत आहोत, असा दावा संबंधित आरोग्य प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केला आहे. प्रशासनाच्या या दाव्यामुळे कागदपत्रांवरील सुविधा आणि प्रत्यक्षातील अस्वच्छता व अंधाराची वस्तूस्थिती यातील तफावत आता चव्हाट्यावर आली आहे.

युवासेनेचे आरोग्यमंत्र्यांना साकडे

या पार्श्वभूमीवर, युवासेना तालुकाप्रमुख दर्शन माधवराव पाटील डुरे यांनी १ नोव्हेंबर रोजी राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाशजी आबिटकर साहेब यांना अधिकृत विनंती पत्र सादर केले आहे. या पत्राद्वारे त्यांनी डौर येथील आरोग्य उपकेंद्राची इमारत पूर्ण होऊनही ती तशीच पडून असल्यामुळे जनतेची होणारी गैरसोय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. आरोग्यमंत्र्यांनी या विषयात स्वतः जातीने लक्ष घालावे, इमारतीचे रखडलेले उद्घाटन करून तसेच आवश्यक कर्मचारी व विजेची सोय करून येथील आरोग्य सेवा तात्काळ पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करावी, अशी नम्र आणि आग्रही विनंती दर्शन पाटील डुरे यांनी केली आहे. आता या पत्राची दखल घेऊन आरोग्य मंत्रालय डौर येथील आरोग्य उपकेंद्रातील अंधार आणि अस्वच्छता दूर करून ते कधी सुरू करते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक इलासाहे जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, ९-२-३४६, बिलाल नगर, देगलूर नाका, इतवारा, नांदेड महाराष्ट्र ४३१६०४ येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.* पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील. Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

Jagmitra, this newspaper, is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, 9-2-346, Bilal Nagar, Deglur Naka, Itwara, Nanded, MAHARASHTRA - 431604. (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. *According to the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

बद्रीनारायण घुगे (पुणे जिल्हा प्रतिनिधी)
मो.9922476927 PRGI.No.- MHMAR/26/A4099

पुणे जिल्हा आवृत्ती — गुरुवार दि.०५ नोव्हेंबर २०२६ — पान नं. २

दिवाळी काळात भोसरी एमआयडीसी परिसरातील कंपन्यांची सुरक्षा वाढवावी : अध्यक्ष अभय भोर

पिंपरी । प्रतिनिधी

दिवाळीच्या सणानिमित्त भोसरी एमआयडीसी परिसरातील अनेक कंपन्या सलग सहा ते सात दिवस बंद राहणार आहेत. या कालावधीत औद्योगिक परिसरात चोरीच्या घटनांची शक्यता वाढत असल्याने उद्योजकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये एमआयडीसी परिसरातील अनेक ठिकाणी मद्यपींचे अड्डे तयार होतात. तसेच अमली पदार्थांचे सेवन करून काही समाजकंटक कंपन्यांच्या रखवालदारांना दमदाटी करतात आणि चोरीच्या घटना घडवून आणतात. दिवाळीच्या काळात औद्योगिक परिसरात सर्वत्र शांतता आणि वर्दळ कमी असल्याचा फायदा चोरट्यांकडून घेतला जातो. त्यामुळे कंपन्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

या पार्श्वभूमीवर फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनचे चे अध्यक्ष श्री. अभय भोर यांनी पोलीस प्रशासनाकडे दिवाळीच्या काळात भोसरी एमआयडीसी परिसरात वाढीव पोलीस मनुष्यबळ तैनात करावे, रात्रीच्या वेळेस सातत्याने गस्त घालावी तसेच संशयास्पद हालचालींवर विशेष लक्ष ठेवावे, अशी मागणी केली आहे.

औद्योगिक परिसरातील मद्यपींचे अड्डे आणि अमली पदार्थांच्या सेवनाला आळा घालण्यासाठी पोलीस विभागाने तत्परतेने उपाययोजना कराव्यात. कंपन्यांचे नुकसान टाळण्यासाठी तसेच उद्योजक, सुरक्षारक्षक आणि कामगारांना सुरक्षित वातावरण निर्माण करून देण्यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी. दिवाळीच्या काळात कंपन्या बंद असल्याने औद्योगिक परिसरातील सुरक्षेची जबाबदारी अधिक महत्त्वाची ठरते. पोलीस प्रशासनाने तातडीने विशेष सुरक्षा व्यवस्था आणि नियमित गस्त सुरू करून उद्योजकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे, असे इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष श्री. अभय भोर यांनी आज प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले.

‘स्वच्छ, सुंदर, शून्य कचरा शाळा’ उपक्रम शहराला शून्य कचऱ्याच्या दिशेने नेणारे महत्त्वाचे पाऊल ठरेल : आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

थेरगाव येथील यशवंतराव चव्हाण प्राथमिक शून्य कचरा शाळा प्रकल्पाचे उद्घाटन

पिंपरी । प्रतिनिधी

शून्य कचरा संकल्पना म्हणजे ज्या ठिकाणी कचरा निर्माण होतो, त्याच ठिकाणी त्याचे योग्य व्यवस्थापन करून त्या परिसरातून कचरा बाहेर जाणार नाही, अशी व्यवस्था निर्माण करणे होय. शाळेत निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन शाळेतच करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेला ‘स्वच्छ, सुंदर, शून्य कचरा शाळा’ हा उपक्रम पुढे शून्य कचरा प्रभाग ते संपूर्ण पिंपरी चिंचवड शहर शून्य कचरा करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरेल, असा विश्वास महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी व्यक्त केला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव येथील यशवंतराव चव्हाण प्राथमिक शाळेत स्वच्छ, सुंदर, शून्य कचरा शाळा प्रकल्पाचे उद्घाटन आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे, शिक्षण समितीच्या सभापती रवीना आंगोळकर, शिक्षण समिती सदस्या तथा नगरसदस्या रिटा सानप, योगिता बारणे, नगरसदस्य तानाजी बारणे यांच्यासह क्षेत्रीय अधिकारी मुकेश कोळप, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, आरोग्य अधिकारी अतुल सोनवणे, बाबासाहेब राठोड, पर्यवेक्षिका अर्चना कांडेकर, ज्योती तापकीर, शून्य कचरा शाळा मार्गदर्शक अर्चना मोरे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

नगरसदस्या योगिता बारणे यांच्या पुढाकारातून थेरगाव शाळेत शून्य कचरा प्रकल्प सुरू करण्यात आला असून या प्रकल्पाचा शुभारंभ केल्यानंतर विद्यार्थ्यांना शून्य कचरा रिसायकल बॅग तसेच शून्य कचरा किटचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



आयुक्त डॉ. सूर्यवंशी म्हणाले, शाळेत निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन शाळेतच झाले पाहिजे. ही शून्य कचरा शाळेची संकल्पना आहे. ही संकल्पना शाळेत यशस्वीपणे राबवण्याचे नियोजन महापालिका करीत आहे. या उपक्रमांतर्गत शाळेत ‘शून्य कचरा मॉनिटर’ ही संकल्पना राबविण्यात येत आहे. या मॉनिटरचे काम शाळेत कोणीही कचरा टाकत असेल, तर त्याला समजावून सांगणे आणि शाळेचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी लक्ष देणे असेल. संपूर्ण शहर कचरामुक्त करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा ठरू शकतो. यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग तर आवश्यक आहेच; पण विद्यार्थ्यांनी त्यांच्या पालकांनादेखील या मोहिमेत सहभागी होण्यासाठी आग्रह धरावा. घरातील स्वच्छता, कचऱ्याचे वर्गीकरण आणि योग्य विल्हेवाट याबाबत त्यांनाही जागरूक करावे. ही संकल्पना आणखी किती शाळांमध्ये राबवता येईल, यादृष्टीनेदेखील नियोजन सुरू आहे. थेरगावच्या शाळेत हा पायलट प्रोजेक्ट म्हणून राबवून विद्यार्थ्यांचा सहभाग, त्यांचा प्रतिसाद आणि या उपक्रमाचे परिणाम यांचा अभ्यास करून त्यानंतर इतर शाळांमध्येही हा उपक्रम कशा पद्धतीने राबवता येईल, याबाबत निर्णय घेता येईल, असेदेखील डॉ. सूर्यवंशी यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना योगिता बारणे यांनी शून्य कचरा प्रकल्प सुरू करण्यामागील भूमिका विषद केली. तर आभार प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी मानले.

पुस्तक वाचून मला नक्की फोन करा!

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना ‘स्वच्छता के सुपरहीरोज’ या पुस्तकाचे वाटप केले. यावेळी ते म्हणाले की, ‘स्वच्छ, सुंदर, शून्य कचरा शाळा’ या प्रकल्पात सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याने हे पुस्तक वाचावे. या शाळेतील प्रत्येक विद्यार्थी हा स्वच्छतेचा सुपरहिरो बनला पाहिजे. स्वच्छतेची सुरुवात स्वतःपासून करा, आपल्या घरापर्यंत पोहोचवा आणि आपल्या शाळेतून संपूर्ण शहरात हा संदेश पोहोचवा. जसे आपण आपले घर स्वच्छ ठेवतो, तसे आपले शहरही स्वच्छ ठेवले पाहिजे. तसेच ‘स्वच्छता के सुपरहीरोज’ हे पुस्तक वाचल्यानंतर त्यातून तुम्हाला काय समजले, काय नवीन शिकायला मिळाले, हे मला नक्की फोन करून सांगा. पुस्तक वाचल्यानंतर तुम्हाला नेमका काय अनुभव आला, हे मला तुमच्याकडून जाणून घ्यायला नक्की आवडेल. कारण विद्यार्थ्यांनी स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी मोबाईलपेक्षा पुस्तक वाचन, खेळ आणि चांगल्या सवयी यांना अधिक महत्त्व दिले पाहिजे, असेदेखील आयुक्त डॉ. सूर्यवंशी म्हणाले.

पीएम श्री माध्यमिक शाळेतील आधुनिक सुविधांची आयुक्तांकडून पाहणी

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी यावेळी थेरगाव येथील पीएम श्री माध्यमिक शाळेला भेट देऊन शाळेतील विविध शैक्षणिक सुविधा आणि उपक्रमांची पाहणी केली. यावेळी त्यांनी शाळेतील ॲस्ट्रोनॉमी लॅब, टिंकरिंग लॅब, रायफल शूटिंग प्रशिक्षण केंद्र तसेच सीसीटीव्ही यंत्रणेची पाहणी करून त्याबाबत सविस्तर माहिती घेतली. विद्यार्थ्यांना विज्ञान, तंत्रज्ञान आणि विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या या सुविधांची त्यांनी माहिती घेतली. तसेच शाळेच्या परिसरातील भिंतीवर विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या आकर्षक वारली चित्रांची पाहणी करून त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले.

अमली पदार्थविरोधी जनजागृतीच्या लढ्यात एसएसपी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या चिखली येथील गणेश इंटरनॅशनल स्कूलची दमदार बाजी!

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा मान!

पिंपरी । प्रतिनिधी

चिखली : केवळ शिक्षणातूनच नव्हे, तर सामाजिक जाणीव आणि जबाबदारीच्या भानातूनही आदर्श नागरिक घडविण्याचा ध्यास घेतलेल्या गणेश इंटरनॅशनल स्कूल, चिखलीने आपल्या कर्तृत्वाची पुन्हा एकदा दिमाखदार छाप उमटवली आहे. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने आयोजित अमली पदार्थविरोधी जनजागृती स्पर्धेत विद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावत यशाचा मानाचा तुरा आपल्या शिरपेचात खोवला!

या स्पर्धेत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या कल्पकतेला, कलागुणांना आणि सामाजिक बांधिलकीला प्रभावी अभिव्यक्ती दिली. अमली पदार्थांच्या विळख्याचे भयावह परिणाम, व्यसनाधीनतेमुळे उद्ध्वस्त होणारे आयुष्य, कुटुंबव्यवस्थेवर होणारे दुष्परिणाम आणि व्यसनमुक्त समाजनिर्मितीची गरज या गंभीर विषयांवर विद्यार्थ्यांनी अत्यंत प्रभावीपणे प्रकाश टाकला. त्यांच्या सशक्त सादरीकरणातून 'व्यसनाला नकार, जीवनाला होकार!' हा संदेश समाजापर्यंत पोहोचला.



पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या पुढाकाराने आयोजित या उपक्रमातील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती सुनेत्राताई अजित पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते झालेला हा गौरव विद्यालयाच्या शैक्षणिक आणि सामाजिक वाटचालीतील एक अविस्मरणीय क्षण ठरला. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष एस.बी. पाटील, सचिव चंद्रशेखर प्रभू पाटील, खजिनदार गणेश पाटील, सहसंचालक सुनील शेवाळे, प्राचार्या डॉ. आभा सिंह तसेच सर्व समन्वयकांनी सहभागी विद्यार्थी आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

हे यश केवळ एका स्पर्धेतील विजय नसून विद्यार्थ्यांच्या जिद्दीचे, शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे आणि शाळेच्या सामाजिक बांधिलकीचे प्रतीक आहे. कारण गणेश इंटरनॅशनल स्कूलचा विश्वास केवळ गुणवंत विद्यार्थी घडविण्यात नाही, तर सजग, संवेदनशील आणि समाजासाठी सकारात्मक योगदान देणारे जबाबदार नागरिक घडविण्यात आहे! विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाला सलाम! मार्गदर्शकांच्या प्रयत्नांना मानाचा मुजरा! आणि गणेशइंटरनॅशनल स्कूलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा !

भिगवण ग्रामपंचायतीचा कारभार रामभरोसे?

ग्रामसेवक रजेवर, प्रशासक ग्रामपंचायतीकडे फिरकेना; सात गावांचा कारभार एकाच प्रशासकाकडे, नागरिकांची मात्र गैरसोय

भिगवण । प्रतिनिधी

भिगवण ग्रामपंचायतीचा कारभार सध्या अक्षरशः रामभरोसे सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक रजेवर असल्याने दैनंदिन कामकाजावर परिणाम होत आहे, तर दुसरीकडे प्रशासकही ग्रामपंचायत कार्यालयाकडे नियमितपणे फिरकत नसल्याने नागरिकांना विविध कामांसाठी हेलपाटे मारावे लागत आहेत. त्यामुळे भिगवण ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत नागरिकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

भिगवण हे परिसरातील महत्त्वाचे गाव असून ग्रामपंचायतीच्या माध्यमातून नागरिकांची विविध शासकीय व प्रशासकीय कामे केली जातात. जन्म-मृत्यू दाखले, विविध प्रकारचे उतारे, घरपट्टी, पाणीपट्टी, बांधकाम परवानगी तसेच इतर महत्त्वाच्या कामांसाठी दररोज नागरिक ग्रामपंचायत कार्यालयात येत असतात. मात्र, ग्रामसेवक रजेवर असल्याने आणि प्रशासक कार्यालयात उपलब्ध नसल्याने अनेक कामे रखडत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे संबंधित प्रशासक यांच्याकडे भिगवणसह तब्बल सात गावांचा प्रशासकीय कारभार असल्याची माहिती आहे. त्यामुळे सर्वच गावांना पुरेसा वेळ देताना अडचणी येत आहेत का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. मात्र, या प्रशासकीय व्यवस्थेचा फटका सामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे. एखाद्या कामासाठी ग्रामपंचायतीत गेल्यानंतर संबंधित अधिकारी उपलब्ध नसल्यास नागरिकांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. ग्रामपंचायत ही गावाच्या दैनंदिन प्रशासनाचा महत्त्वाचा केंद्रबिंदू असताना कार्यालयीन कामकाजासाठी जबाबदार अधिकारी उपलब्ध नसणे ही गंभीर बाब मानली जात आहे. ग्रामपंचायत कार्यालयात नागरिकांना नियमित सेवा मिळावी, यासाठी पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे. प्रशासक सात गावांचा कारभार सांभाळत असले तरी भिगवणसारख्या महत्त्वाच्या गावातील नागरिकांची कामे प्रलंबित राहू नयेत, याची जबाबदारी प्रशासनाने घेणे गरजेचे आहे.

ग्रामसेवकांचा बदलीसाठी अर्ज

दत्तात्रय परदेशी (ग्रा.पं.अधिकारी) यांनी भिगवणहून इतरत्र बदलीसाठी जून महिन्यात अर्ज सादर केला असून, कामाचा व्याप आणि तक्रारी यामुळे मानसिक संतुलन बिघडत आहे, आणि कामामुळे ग्रामपंचायत कार्यालयामधील अनुपस्थिती यामुळे तक्रारी येत असल्याने बदली करण्यात यावी अशी मागणी त्यांनी गटविकास अधिकारी, इंदापूर यांच्याकडे केली आहे. परंतु या अर्जावर अद्याप कोणतीही कारवाई झाली नसल्याचे समजत आहे.

भिगवन ग्रामपंचायतचे ग्रामसेवक वारंवार गैरहजर राहत असतात तसेच कार्यालयात आल्यावर देखील पूर्णवेळ ग्रामपंचायत मध्ये उपलब्ध नसतात असे अनेक वेळा झालेले आहे त्यामुळे भिगवन ग्रामपंचायतला प्रशासनाने पूर्णवेळ ग्रामसेवकाची नियुक्ती करावी.
- मुमताज शेख, मा.उपसरपंच भिगवण

भिगवनचे ग्रामसेवक आजारी असल्याने ते रजेवर आहेत ग्रामस्थांची कामे असल्यास त्यांनी ग्रा.प. मध्ये अर्ज करावा.
- संजीवकुमार मारकड, प्रशासक ग्रा.पं.भिगवण

श्री ज्ञानेश्वर विद्यालयात अमली पदार्थ विरोधी जनजागृती व शपथ कार्यक्रम उत्साहात

आळंदी देवाची । प्रतिनिधी

तरुण पिढीला अमली पदार्थांच्या दुष्परिणामांपासून दूर ठेवून व्यसनमुक्त, सुरक्षित आणि सुदृढ समाजनिर्मिती करण्याच्या उद्देशाने श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्यु. कॉलेज, आळंदी देवाची आणि पोलीस उपआयुक्त, गुन्हे शाखा, पिंपरी-चिंचवड, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अमली पदार्थ विरोधी जनजागृती व शपथ कार्यक्रम' उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी आळंदी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक तुकाराम खडके, पोलीस हवालदार फुले, पोलीस अंमलदार खोत मॅडम, विद्यालयाचे प्राचार्य किसन राठोड, उपप्राचार्य प्रशांत सोनवणे, पर्यवेक्षिका अनुजायिनी राजहंस तसेच ज्युनिअर कॉलेजचे सर्व शिक्षक उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पोलीस उपनिरीक्षक तुकाराम खडके यांनी अमली पदार्थांचे दुष्परिणाम, सायबर गुन्हे, डिजिटल फसवणूक आणि सोशल मीडियाच्या वाढत्या गैरवापराबाबत सविस्तर प्रबोधन केले. इन्स्टाग्राम आणि फेसबुकसारख्या सोशल मीडिया माध्यमांतून काही काळ मनोरंजन मिळत असले, तरी त्यात अति वेळ घालविण्यापेक्षा अभ्यास, ज्ञान आणि व्यक्तिमत्त्व विकासाला प्राधान्य द्यावे, असे त्यांनी आवर्जून सांगितले.



'विसाव्या वर्षापर्यंत विद्या आणि तिशीपर्यंत धन!' या विचारातून विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या वयात कठोर परिश्रम करून ज्ञान संपादन करावे, असे आवाहन त्यांनी केले. इन्स्टाग्राम, व्हॉट्सप आणि इतर ऑनलाइन माध्यमांद्वारे होणारी आर्थिक फसवणूक, फ्रॉड तसेच सायबर गुन्ह्यांच्या विविध प्रकारांची माहिती देत विद्यार्थ्यांनी अशा आमिषांना बळी पडू नये, याबाबत त्यांनी सावध केले. मेहनत, चिकाटी, आत्मविश्वास आणि स्वतःमधील वेगळेपण ओळखण्याची वृत्ती या यशाच्या गुरुकिल्ल्या आहेत. आपली क्षमता ओळखून निश्चित ध्येय समोर ठेवले, तर अल्पावधीतही मोठे यश संपादन करून अधिकारी पदापर्यंत पोहोचता येते, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी ऑनलाइन माध्यमातून विद्यार्थ्यांना अमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही बेकायदेशीर अमली पदार्थांचे सेवन करणार नाही. आम्ही अमली पदार्थांपासून दूर राहू आणि सुखी आयुष्य जगू, अशी सामूहिक शपथ घेतली. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन संस्था सचिव अजित वडगावकर तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिवले सर यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

पालकमंत्री पंकजा मुंडे यांची भाजप युवा कार्यकर्ते प्रकाश जायभाये यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

जालना । त्रिसिंग जायभाये



राज्याच्या पालकमंत्री तथा भाजपच्या ज्येष्ठ नेत्या पंकजा मुंडे यांनी जालना येथील भाजपचे युवा कार्यकर्ते प्रकाश अण्णासाहेब जायभाये यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. त्यांच्या या आगमनाने जायभाये कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी जायभाये कुटुंबीयांच्या वतीने पालकमंत्री पंकजा मुंडे यांचे उत्साहात स्वागत व सत्कार करण्यात आला. या सदिच्छा भेटीदरम्यान पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी प्रकाश जायभाये व त्यांच्या कुटुंबीयांशी आस्थेने संवाद साधला. तसेच विविध सामाजिक, राजकीय आणि स्थानिक विषयांवर अनौपचारिक चर्चा करण्यात आली. या भेटीमुळे स्थानिक भाजप कार्यकर्त्यांमध्येही उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

याप्रसंगी जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत, महापालिका आयुक्त अंजली शर्मा, पाणीपुरवठा सभापती पुनम स्वामी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी आपल्या व्यस्त दौऱ्यातून वेळ काढून निवासस्थानी सदिच्छा भेट दिल्याने प्रकाश अण्णासाहेब जायभाये व जायभाये कुटुंबीयांनी समाधान व आनंद व्यक्त केला. या भेटीच्या निमित्ताने उपस्थित मान्यवरांमध्ये स्नेहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

हिल्टी कंपनीतर्फे रयत संकुलातील विद्यार्थ्यांना ३००० पाण्याच्या बाटल्यांचे वाटप

देहू । प्रतिनिधी

हिल्टी कंपनीच्या सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या देहू संकुलातील संत जिजाबाई कन्या विद्यालय आणि संत तुकाराम विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना तीन हजार पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची आणि पिण्याच्या पाण्याच्या सुविधेची काळजी घेत कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हा स्तुत्य उपक्रम राबविला. यापूर्वीही हिल्टी कंपनीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे (सॅक) तसेच शूज चे वाटप करण्यात आले होते.



या कार्यक्रमासाठी हिल्टी कंपनीच्या अधिकारी अर्चना देशमुख, श्वेता पाटील, ज्ञानसी मढवी, प्रांजल राठी, सुमित मस्के, आदिती सोनटक्के, विनोद शिंदे, पवन निगर, अर्चना पाटील, गजानन धाम, कोंडवार, प्रतीक्षा माने, पृथ्वी मूर्ती, मोहित अग्रवाल, नेहा लोमटे, अमित कुंचमवार, सचिन पोरे उपस्थित होते. तसेच संत तुकाराम विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विद्या कांबळे, संत जिजाबाई कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निवेदिता पासलकर, पर्यवेक्षिका मनीषा निकम व गुरुकुल प्रकल्पप्रमुख शिवराज तांबे उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापिका निवेदिता पासलकर म्हणाल्या की, रयत संकुलामध्ये अनेक गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना ज्या उदात्त हेतूने केली, त्याच सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून हिल्टी कंपनी कार्य करत आहे. कंपनीच्या या योगदानाचा विद्यार्थ्यांना निश्चितच मोठा लाभ होईल. कार्यक्रमाचे नियोजन गुरुकुल प्रकल्पप्रमुख शिवराज तांबे यांनी केले. सूत्रसंचालन सुनील घुमटकर यांनी केले, तर चंद्रकांत मगर यांनी आभार मानले. हिल्टी कंपनीने शैक्षणिक साहित्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजांचाही विचार करून केलेले हे सहकार्य रयत संकुलासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरले.

स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत विविध विकासकामांना मंजुरी

पिंपरी । प्रतिनिधी

महानगरपालिकेच्या मा. स्थायी समितीची साप्ताहिक सभा स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली आज महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात संपन्न झाली. या सभेत विविध विभागांशी संबंधित विकासकामे, क्रीडा, आरोग्य सेवा, रस्ते, नागरी सुविधा तसेच पायाभूत सुविधांच्या विषयांना मंजुरी देण्यात आली.

क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक विभाग

कु. प्रांशु सदाशिव सूर्यवंशी या खेळाडूला इजिप्त येथे आयोजित ‘गींपळी थींश्रव र्ङीं’ स्पर्धेत सहभागी होण्यासाठी महानगरपालिकेच्या क्रीडा धोरणानुसार प्रवास खर्च, प्रवेश शुल्क, निवास व भोजनासाठी आर्थिक साहाय्य मंजूर करण्यात आले. साजिद करीम तांबोळी व अन्वर मुक्तार अन्सारी या खेळाडूंना सिंगापूर येथील आंतरराष्ट्रीय दिव्यांग क्रिकेट स्पर्धेत सहभागी होण्यासाठी महानगरपालिकेच्या क्रीडा धोरणानुसार आर्थिक साहाय्य व क्रीडा शिष्यवृत्ती देण्यास मान्यता देण्यात आली. प्रणीत गणेश आढाव या खेळाडूला हाँगकाँग येथे आयोजित आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी, तर स्नेहा एस. कमलदिन्नी हिला आशियाई पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी महानगरपालिकेच्या क्रीडा धोरणानुसार आर्थिक साहाय्य देण्यास मंजुरी देण्यात आली. प्रगती गायकवाड या खेळाडूच्या क्रीडा प्रमाणपत्राची क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडून पडताळणी पूर्ण झाल्यानंतर ‘हिंद केसरी’ स्पर्धेत सहभागी होण्यासाठी धोरणानुसार आर्थिक साहाय्य देण्यास मंजुरी देण्यात आली.


आरोग्य व शैक्षणिक पायाभूत सुविधा

महानगरपालिकेच्या रुग्णालयांसाठी अत्याधुनिक वॉशिंग मशीन खरेदी करण्यासाठी ऱ्ड्ढ्ढ्च् पोर्टलवर प्राप्त निविदेला मंजुरी देण्यात आली. महानगरपालिका कार्यक्षेत्रात सीएसआर व सीइआरउपक्रम राबविण्यासाठी नियुक्त "Individual Consultant' यांच्या नेमणुकीस पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास तसेच करारास मंजुरी देण्यात आली. नागरी सेवा (UPSC) परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन करण्यासाठी सावित्रीबाई फुले अकादमी (वाकड) येथील संचालक पदावर करार पद्धतीने पुढील कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास व मासिक मानधन अदा करण्यास मान्यता देण्यात आली.

नागरी सुधारणा व स्थापत्य विकासकामे

प्रभाग क्रमांक १० मधील एम्पायर इस्टेट नाल्याच्या दुरुस्तीविषयक कामांच्या निविदेला मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्रमांक ५ मधील रस्त्यांवरील ट्रेंचेस व चर डब्लुबीएम, बीसी आणि कोल्ड मिक्स पद्धतीने दुरुस्त करण्याच्या निविदेला मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्रमांक ३ मधील चऱ्होली, वडमुखवाडी व चोविसावाडी येथील महानगरपालिका इमारती व स्वच्छतागृहांची दुरुस्ती, स्टॉर्म वॉटर लाईन व चेंबरची दुरुस्ती तसेच सेवा वाहिन्यांसाठी खोदलेले चर दुरुस्त करण्याच्या निविदांना मान्यता देण्यात आली. प्रभाग क्रमांक ३ मधील चऱ्होली परिसरात आवश्यक ठिकाणी स्थापत्यविषयक दुरुस्ती व देखभालीची कामे करण्यास तसेच मोशी, डुडुळगाव व इतर परिसरातील स्थापत्यविषयक कामांच्या दुरुस्तीच्या निविदांना मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्रमांक ९ मधील खराळवाडी, कामगारनगर तसेच यशवंतनगर, उद्यमनगर व इतर परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या निविदांना मंजुरी देण्यात आली.

नागरी सुविधा व प्रभाग विकासकामे



‘ब’ प्रभागांतर्गत गणपती विसर्जन सोहळा व इतर महानगरपालिका कार्यक्रमांसाठी आवश्यक मंडप व्यवस्था करण्याच्या निविदेला मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्रमांक १७ मधील विविध भागांत आवश्यकतेनुसार स्थापत्यविषयक दुरुस्तीची कामे करण्यास तसेच प्रेमलोक पार्क, दळवीनगर व इंदिरानगर परिसरातील उर्वरित डांबरी रस्त्यांची हॉटमिक्स पद्धतीने दुरुस्ती करण्याच्या निविदांना मान्यता देण्यात आली. प्रभाग क्रमांक १ मधील चिखली येथील मोरेवस्ती परिसरातील अंतर्गत रस्त्यांची अहवालानुसार सुधारणा करण्यास तसेच आवश्यक ठिकाणी स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे व इतर अनुषंगिक कामांच्या निविदांना मंजुरी देण्यात आली. चिखली सेक्टर क्रमांक १७ व १९ येथील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या (एथड) गृहप्रकल्पातील उर्वरित सीमाभिंत बांधण्याच्या कामास तसेच प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत इमारतीतील उर्वरित दुरुस्तीची कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. आरोग्य विभागामार्फत शहरातील १०० गणेश विसर्जन स्थळांवर निर्माल्य संकलनासाठी कलश खरेदी व वितरणाच्या आदेशाला कार्योत्तर मंजुरी देण्यात आली. जुनी सांगवी येथील इंद्रप्रस्थजवळील नाल्याच्या प्रवाहाची दिशा बदलणे व घाट परिसराचे सुशोभीकरण करण्याच्या निविदेला मंजुरी देण्यात आली. ‘ब’ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध विद्युतविषयक कामांसाठी कुशल व अकुशल कर्मचारी पुरविणे व अनुषंगिक कामे करण्याच्या निविदेला मान्यता देण्यात आली.

प्रभागनिहाय रस्ते व स्टॉर्म वॉटर कामे

प्रभाग क्रमांक १२ मध्ये रोड फर्निचर, नामफलक बसविणे, पेव्हिंग ब्लॉक दुरुस्ती, पाथवे काँक्रिटीकरण तसेच तळवडे स्मशानभूमीची स्थापत्यविषयक देखभाल-दुरुस्ती करण्याच्या निविदेला मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्रमांक १ मधील चिखली परिसरातील विविध रस्त्यांची अहवालानुसार सुधारणा करण्याच्या निविदेला मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्रमांक ६ मधील धावडेवस्ती, गुळवेवस्ती, भगतवस्ती व परिसरातील रस्त्यांची देखभाल-दुरुस्ती करण्याच्या निविदेला मान्यता देण्यात आली. प्रभाग क्रमांक ६ मधील चक्रपाणी वसाहत, सद्गुरुनगर, लांडगेवस्ती व परिसरातील रस्त्यांचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करण्यास तसेच देवकरवस्ती, महादेवनगर व परिसरातील रस्त्यांची देखभाल-दुरुस्ती करण्याच्या निविदांना मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्रमांक ६ मधील चक्रपाणी वसाहत, सद्गुरुनगर, लांडगेवस्ती व परिसरातील रस्त्यांच्या देखभाल-दुरुस्तीविषयक कामांच्या निविदेलाही मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्रमांक ८ मधील सेक्टर क्रमांक ३, ४, ६, जलवायु विहार सोसायटी, डिस्ट्रिक्ट सेंटर व इतर परिसरातील रस्त्यांचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करण्याच्या निविदेला मान्यता देण्यात आली.

आरोग्य सेवा, तांत्रिक दुरुस्ती व जलवाहिनी महाप्रकल्प

नवीन भोसरी व जिजामाता रुग्णालयातील NBEMS-DNB अभ्यासक्रमाच्या विविध शाखांतील विद्यार्थ्यांसाठी ७८ प्रकारची वैद्यकीय पुस्तके थेट पद्धतीने तातडीने खरेदी करण्यास मंजुरी देण्यात आली. मुख्य लेखापरीक्षण विभागातील कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रपत्र ‘अ’ मध्ये नमूद केल्याप्रमाणे रजा मंजुरीच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. जिजामाता रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभागातील ‘किरण सी आर्म व एक्स-रे मशीनचे निकामी झालेले सॉफ्टवेअर बदलून यंत्रणा तातडीने कार्यान्वित करण्यास मंजुरी देण्यात आली. सन २०२१ मध्ये मंजूर झालेल्या निविदेअंतर्गत शहरात ‘ब्रांझचे म्युरल्स, पुतळे व संबंधित कलाकृती तयार करण्याच्या कामात धातूच्या दरातील वाढीमुळे निर्माण झालेल्या फरकाची रक्कम निश्चित करून मान्यता देण्यास शिफारस करण्यात आली. डांगे चौक ते आदित्य बिर्ला हॉस्पिटल मार्गावरील फूटपाथवरील डेकोरेटिव्ह पोलकरिता नवीन वीजमीटर बसवून वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या प्रशासकीय खर्चाचे अवलोकन करण्यात आले. प्रभाग क्रमांक १५ मधील निगडी प्राधिकरण व इतर परिसरात आवश्यकतेनुसार मंडपविषयक कामे करण्याच्या निविदेला मान्यता देण्यात आली.